Bharat itihas samsodhak swiya granthmala No. 73

भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७३

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक ग्रंथमाला क्र. २

Pethe - daptar

# पेठे–दप्तर

Part 1

## भाग १ ला

संपादक

श्री. विष्णु सिताराम चितळे,

एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन)

edited by Vishnu Sitaram Chitle

CATALOGUED

श. १८७० ]   मूल्य ३ रुपये   [ इ. १९४८

भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७३

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक ग्रंथमाला क्र. २

# पेठे–दप्तर

## भाग १ ला

MR
954.792
C 448.I P

MR
954.792
C 448.I P

वि. सि. चितळे

# शिवचरित्रकार्यालयाचे शिवचरित्रविषयक ग्रंथ

ह्या तीनहि ग्रंथांत इंग्रजी, डच, पोर्तुगीज, फारसी तसेंच संस्कृत, कानडी, हिंदी ह्या भाषांतील श. १३४८ ते श. १६०४ (इ. १६८२ एप्रील) अखेरपर्यंत पत्रांचा राजकीयदृष्ट्या विस्तृतपणें मराठींत काढलेला सारांश दिलेला आहे. अर्थातच मराठी पत्रें ह्यांत घेतलेलीं आहेत हें सांगणें नको. इ. १९३७ पर्यंत जेवढीं ह्या ७१८ भाषां-मधन इतस्ततः पत्रें म्हणून प्रसिद्ध झालीं त्यांचा सारांश कालानुक्रमानें ह्या भागांतून प्रसिद्ध झाला आहे. पत्रें व तीं कालानुक्रमानें लावलेलीं असणें ह्याहून इतिहासअभ्या-सकास दुसरी महत्त्वाची गोष्ट नाहीं. अशीं पत्रें ह्या तिन्ही भागांत अंदाजें तीन सहस्र आलीं आहेत. शिवाय तिसऱ्या भागांत अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब ह्या बादशहाच्या कारकीर्दीचीं **जुलूस-वर्षें** म्हणजे त्यांच्या कारकीर्दीच्या प्रत्येक वर्षाचा प्रारंभकाल मुसलमानी व इंग्रजी वर्ष, महिना, तारीख असा दिला आहे. ह्या सर्वांपेक्षा **शिवकालीन शकावली** पृष्ठें सुमारें १५० दिली आहे. पृष्ठसंख्या ९७०. किं. भाग १, २ प्रत्येकीं रु. ३॥, भाग ३ रु. २॥.

**शिवचरित्र निबंधावली**—ह्या ग्रंथांत श्री. द. वि. आपटे, प्रो. पटवर्धन, प्रो. कुंभारे, प्रो. देशपांडे, प्रो. ओतुरकर, श्री. दि. वि. काळे, श्री. शं. ना. जोशी, श्री. वा. सि. बेंद्रे, रा. सा. गं. के. देशपांडे ह्यांचे मुख्यतः तत्कालीन पत्रांचे आधारें शिवचरित्रांतील प्रसंगावर लिहिलेले निबंध आले आहेत. पृ. ४१२, किं. रु. ३॥

**शिवाजी निबंधावली भाग १**—ह्या ग्रंथांत प्रो. काणे, प्रो. पेंडसे, श्री. रा. राजोपाध्ये, प्रो. सरदेसाई, श्री. य. खु. देशपांडे, श्री. बा. आ. देशप्रभू पेडणेकर, श्री. ज. स. करंदीकर, म. म. गौरीशंकर ओझा, प्रो. दांडेकर, चं. प्रो. पुणतांबेकर, श्री. भट, श्री. शि. का. ओक—धार ह्यांचे शिवकालीन संस्कृति व धर्म, गागाभट्ट, शिवाजीची कौटुंबिक माहिती, राजनीति, संतांची कामगिरी, शिवजन्मदिननिर्णय, श्रीसमर्थ रामदास, शिवकालीन विदर्भ, शिवाजीचे कुलोपाध्याय, ( शिवकालीन सिंहस्थ निजामशाही व आदिलशाही सुलतान परिशिष्ट ) इत्यादि निबंध आले आहेत. पृ. ३००, किं. रु. ३॥

**शिवाजी निबंधावली भा. २** मध्यें प्रो. आगा हैदर हसन—अलीन मा; दा. वि. गोखले—शिवकालीन प्रवासी पिटर डेला व्हॅले; प्रो. कुलकर्णी—शिवकालीन भाषा; प्रो. देशपांडे—मोडी लिपी; श्री. चिं. वि. वैद्य— मराठ्याच्या ९६ कुळांच्या याद्या, मराठे व रजपूत; श्री. ग. ह. खरे—शिवकालीन राजपत्रलेखन; श्री. बेंद्रे -जंजिरेकर शिद्दी; श्री. मा. ह. घोरपडे—शिवाजी व तत्कालीन मराठे प्रतिस्पर्धी; श्री. शि. ग. पवार—शिव-कालीन ज्योतिर्गणित; प्रो. भानू—प्रतापगड युद्ध; प्रो. माटे—शिवकालीन समाजस्थिति; प्रो. पोतदार—अणाजी दत्तो वंशावळ हे निबंध आले असून प्रो. भूयान ( गोहत्ती )—'आसामी ऐ. साधन व शिवाजी महाराज,' प्रो. श्रीनिवासाचार्य ( मद्रास )—शिवाजीची दक्षिणेकडील स्वारीची भूमिका, रा. ब. डॉ. अयंगार ( मद्रास ) दक्षिणेंतील मराठी सत्तेचा उदय, प्रो. रामचंद्र दीक्षितार ( मद्रास ) शिवाजीविषयीं कांहीं नवीन साधनें, प्रो. वर्मा—मुहमदनामा हे लेख इंग्रजींत आले आहेत. पृ. ३००; किं. रु. ३.

प्रकाशक
रा. रा. चिं. ग. कर्वे, R.R. C.G. Karve
चिटणीस भा. इ. सं. मंडळ,
सदाशिव पेठ ३१३ अ, पुणें २.

MR
954.792
C448.I P

INDIAN INSTITUTE OF ADVANCED STUDY
Acc. No. 8984
Date 19.3.66
SIMLA

Library IIAS, Shimla
MR 954.792 C 448.I P-C 448 II
00008984

मुद्रक
रा. रा. विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण प्रेस, ९१५।१
शिवाजीनगर, पुणें ४.



श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर

# पेठे-दप्तर भाग १ ला

## निवेदन

त्रिंबकरावमामा पेठे यांच्या चरित्र-ग्रंथाची जुळवाजुळव करीत असतां जुनीं अस्सल कागदपत्रें मिळविण्यासाठीं मी पुण्यांत व पुण्याबाहेरही अनेक ठिकाणीं हिंडलों व अनेक सद्‌गृहस्थांच्या घरीं कागदपत्र असल्याचें कळल्यानें, तीं मिळविण्याकरितां त्यांच्याजवळ याचना केली. माझे व माझ्यासाठीं झीज सोसणारांचे या कामीं केलेले प्रयत्न वांया गेले; तरी कांहीं ठिकाणचीं कागदपत्रें मिळतील अशीं आश्वासनें मिळत आहेत. या सर्व उठाठेवी करीत असतां सुमारें हजार-दीड हजार कागद माझ्या हस्तगत झाले. ते सर्व पेठ्यांसंबंधींच होते किंवा ते सर्व महत्त्वाचे होते असें नाहीं. तेव्हां मिळालेल्या कागदांपैकीं त्रिंबकरावाच्या चरित्राशीं ज्यांचा थोडा फार संबंध येतो असे कागद निवडून बाजूस काढून, बाकीचे नीट गुंडाळून ठेविले. निवडलेल्या कागदांच्या मीं स्वतः नकला तयार केल्या, मित्रांच्या साहाय्यानें त्या मूळ कागदांशीं रुजू पाहिल्या. जे कागद मला लागले नाहींत ते मुरब्बी संशोधकांस त्रास देऊन त्यांच्याकडून वाचून घेतले व मग कागदाचा संदर्भ लक्षांत घेऊन प्रत्येक कागदाच्या तारखा नक्की करण्याचें किचकट पण अत्यंत महत्त्वाचें काम अंगावर घेतलें. या शेवटच्या बाबतींत मी अगदींच अनभ्यस्त; त्यामुळें प्रथम प्रथम मी अनेक ठिकाणीं ठेचाळलों, परंतु कंटाळा न करतां त्या कामांत सतत लक्ष घातल्यानें, पुढें पुढें त्याही कामांत मला बरेचसें यश मिळत गेलें. अखेर त्रिंबकरावमामाच्या चरित्र-लेखनाचें काम थोड्याच वेळांत मला हातावेगळें करतां आलें.

त्रिंबकरावाच्या चरित्र-लेखनाचें काम पुरें झाल्यावर जवळ असलेल्या कागदांस पुन्हां एकदां चाळणी लावून महत्त्वाच्या दृष्टीनें त्यांची प्रतवारी ठरवून सर्व कागद नीट ठेवून दिले; परंतु ते ज्यांच्याकडून मीं आणले त्यांनीं ते परत मागित-ल्यानें ज्याचे त्यांस ते परत करणें भाग पडलें. त्यामुळें बरेचसे कागद माझ्याजवळून गेले व त्यांच्या नकलाच फक्त शिल्लक राहिल्या. कांहीं अस्सल कागद व या नकला माझ्या घरीं पडून राहण्यापेक्षां त्या छापून टाकल्या तर बरें, असें मला अनेक वेळां वाटलें; परंतु तसें करणें आर्थिक दृष्टीनें मला अशक्य होतें. अशा स्थितींत भा. इ. सं. मंडळाचे एक तरुण व उत्साही चिटणीस डॉ. मो. गं. दीक्षित यांनीं माझ्या-जवळील कागद मंडळातर्फे छापण्याचें मला आश्वासन दिल्यानें मला हुरूप आला. लगेच मी या ग्रंथाच्या जुळवाजुळवीस लागलों व थोड्याच दिवसांत त्याची

हस्तलिखित प्रत तयार करून 'पेठे दफ्तरा'चा हा भाग तयार करून तो डॉ. दीक्षितांच्या स्वाधीन केला.

या ग्रंथाला मी, 'पेठे दप्तर' असें नांव दिलेलें असल्यानें या ग्रंथांतील सर्वच कागद पेठ्यांच्या दफ्तरांतील असले पाहिजेत असा कोणाचाही ग्रह होण्याचा संभव आहे; परंतु श्री. सर. बाळासाहेब पेठ्यांच्या नाशिकच्या घरीं मला सनदापत्रेंच पुष्कळ मिळालीं व चिटणिशी कागद फारच थोडे मिळाले. सर्व सनदांचा अंतर्भाव या ग्रंथांत मीं केलेला नाहीं; केवळ ज्यांच्या ज्यांच्या वाचनानें ऐतिहासिक ज्ञानांत थोडीफार भर पडेल असें मला वाटलें, अशा सनदांचाच समावेश या ग्रंथांत मीं केलेला आहे. पुण्याच्या पेशवा-दफ्तरांतून मला पुष्कळ कागदपत्रें मिळालीं. त्यांचाच या ग्रंथाला मोठा आधार आहे. पुण्यांतील **सरदार श्रीमंत कृष्णराव केशव ऊर्फ बाळासाहेब पारसनीस** यांच्या कृपेनें त्यांच्या मोठ्या संग्रहांतूनही मला कांहीं कागद मिळाले. त्यांतील अत्यंत महत्त्वाचे कागद या ग्रंथांत मी सादर केले आहेत. त्याचप्रमाणें पुण्यांतील दुसरे एक सरदार श्रीमंत **रायरीकर** यांच्याकडील सर्व कागद–पत्रसंग्रह ( श्री. विश्वनाथ राजवाडे यांनी निवडून उरलेला ) माझ्या हातीं आला. त्यांतील पुष्कळ कागद मीं या ग्रंथांत दाखल केले आहेत. श्री. **शंकरराव** वैद्य यांनींहि आपल्याजवळील कागदपत्रांचा संग्रह माझ्या हवालीं केला व त्यांतिल अनेक कागद मला आस्थापूर्वक दिले. त्यांपैकीं कांहींचा समावेश या ग्रंथांत मीं केलेला आहे. **भा. इ. सं. मंडळाच्या** ताब्यांतील श्री. शं. ना. जोशी यांनी संग्रहित केलेल्या दीक्षित पटवर्धन यांच्या कीर्दी व इतर कागदपत्रें मला वाचण्यास सांपडलीं. त्यांतील कांहीं येथें घेतलीं आहेत. इ. कॉ. रि. इं. च्या संग्रहीं असलेल्या पारसनीस संग्रहांतील थोडे कागदही मी येथें घेऊं शकलों. श्री. शंकरराव जोशांनीं मद्रासकडीलही कागद माझ्याकरितां मिळविले. अशा रीतीनें त्रिंबकरावाच्या चरित्रासाठीं जेथून जेथून साधनसामुग्री मिळवितां येणें शक्य झालें तेथून तेथून ती मिळविण्याची खटपट मी केली व हा साधनग्रंथ मला तयार करतां आला. तेव्हां पेठ्यांसंबंधाचेच बहुतेक कागद या ग्रंथांत असल्यानें या ग्रंथाला मी 'पेठे–दप्तर' असें नांव दिलेलें आहे. पेठे–दप्तराचा हा ग्रंथ सजविण्यास उपरिनिर्दिष्ट सर्व सद्‌गृहस्थांनीं व संस्थांनीं अत्यंत उदारपणें मला मदत केली त्याबद्दल मी त्या सर्वांचे अत्यंत मनःपूर्वक आभार मानितों.

प्रस्तुत ग्रंथाच्या पुढें येणाऱ्या भाग २ मध्यें पेशव्यांच्या रोजकीर्दींतील उताऱ्यांचें व म्हैसूरच्या युद्धांतील त्रिंबकरावाच्या मुक्कामांचें प्राप्तिस्थळ म्हणजे पुण्याचें पेशवा–दप्तर हें होय.

या संग्रहांतील बरेचसे कागदपत्र मिळविण्याचे कामीं मुंबईचे हिऱ्यामोत्यांचे व्यापारी श्री. **गणेश हरि ऊर्फ भाऊसाहेब पेठे** यांचें मला साहाय्य झालें.

पदरमोड करूनहि ते माझ्यासाठीं स्वतः अनेक ठिकाणीं हिंडले. त्यांच्या या स्वार्थ-निरपेक्ष कामाबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. कागद मिळाल्यावर ते वाचून लावणें व कांहींच्या तारखा ठरविणें या कामीं प्रा. त्र्य. शं. शेजवलकर, रियासतकार रावबहादुर गो. स. उर्फ नानासाहेब सरदेसाई व महामहोपाध्याय प्रा. दत्तोपंत पोतदार वगैरे मंडळींनीं मला बहुमोल मदत केली आहे. त्या सर्वांचें ऋणही माझ्या शिरावर आहेच. कागद रुजू पाहण्याचे कामीं माझे स्नेही श्री. शि. आ. आंबेडकर व श्री. शंकरराव जोशी यांनीं मला ऋणी केलेले आहे. श्री. ग. ह. खरे यांनींही कांहीं फारशी कागदाचे मराठी तर्जुमे मला करून दिले, त्याबद्दही मी त्यांचा आभारी आहे. भा. इ. सं. मंडळाच्या चिटणिसांनीं ऐतिहासिक वाङ्मयाच्या एका नव्या दालनांत मला हातीं धरून सोडून दिलें आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानणेंही जरूर आहे.

छपाईचे सोयीसाठीं ह्या कागदपत्रांचे पहिला व दुसरा असे दोन भाग योजणें प्राप्त झालें. पैकीं हा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. उर्वरित कागद पुढील भागांत देऊन तेथेंच त्रिंबकराव मामा पेठे यांचे मुक्काम, दोन्ही खंडांची व्यक्तिस्थलसूची, आणि पेठेशकावली देण्याचा हेतु आहे. आशा वाटते कीं, भा. इ. सं. मं च्या आश्रयानें ह्याप्रमाणेंच तोहि खंड लवकरच प्रसिद्ध होईल. कोणत्या दप्तरांतून कोणता कागद मिळाला हें कळावें म्हणून प्रत्येक लेखांकाच्या पुढें कंसांत त्या त्या दप्तराचा निर्देश केला आहे. असो.

वाचकांस विनंती इतकीच कीं, कितीहि श्रम केले तरी अनभ्यस्त माणसाकडून चुका होणारच, हें समजून त्यांनीं या ग्रंथांकडे थोड्या प्रेमळ अंतःकरणानें पहावें व कांहीं चुका आढळल्यास त्या माझ्या नजरेस आणून देण्याची कृपा करावी.

पुणें
ता. २५।१०।१९४८

वि. सि. चितळे

# प्रस्तावना

कै. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक ग्रंथमालेंत हें दुसरें पुष्प भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे ओंवलें जात आहे. स्मारक समितीनें मंडळाच्या सूचनेप्रमाणें गुदस्तापासून दरसाल एकेक अस्सल अप्रसिद्ध ऐतिहासिक साधनांचा संग्रह प्रसिद्ध करण्यास कांहीं मदत देण्याचें ठरविल्यामुळें स्मारकसमिति आणि मंडळ या दोघांचींहि उद्दिष्टें सहकार्यानें पार पडत आहेत. स्मारक ग्रंथमालेंतलें पहिलें पुष्प श्री. ग. ह. खरे संपादित 'हिंगणें दप्तर' (भाग २ रा.) हें जसें महत्त्वाचें व संशोधकांना अभ्यसनीय असें प्रकाशन होतें तसेंच श्री. वि. सि. चितळे संपादित प्रस्तुत 'पेठे दप्तर' (भाग १ ला) हेंहि वाटेल यांत शंका नाहीं. श्री. चितळे यांनीं एम्. ए. पदवी घेण्यासाठीं 'त्रिंबकराव मामा पेठे' हा प्रबंध विषय निवडला व त्यासाठीं जी साधनांची जमवाजमव केली तींतील 'पेठेदप्तर' हा एक महत्त्वाचा भाग आहे. या दप्तरांत पेठे, पटवर्धन, वैद्य, रायरीकर, पारसनीस या घराण्यांचे पत्रसंग्रह व पेशवे दप्तर आणि चिंचवड दप्तर यांतील इ. स. १७२२ ते १७७४ या ५२ वर्षांतील पेठे घराण्याशीं इतिहाससंबद्ध असलेले निवडक कागद दिलेले दिसतील. त्रिंबकराव मामांचे वडील विसाजी कृष्ण यांना पुणें प्रांत हवेली तालुका यांतील किवळे गांवची मिळालेली (इ. स. १७२२ तील) सनद पेठे घराण्याचा नागपूरकर भोसल्याशीं असलेला सेवासंबंध तोडून तो पेशव्याशीं जोडण्याचा इरादा दर्शविते. पुढें १७४२ त "राजश्री त्र्यंबक विश्वनाथ यांनीं वऱ्हाड प्रांते येऊन नानाप्रकारें मुलकास उपद्रव केल्या"ची रघोजी भोसल्याची तक्रार नमूदच आहे (ले. ५). मामाचें पारिपत्य करण्यास भोसल्यानें त्यास धरलें असतां शाहू छत्रपतींच्या आज्ञेवरून नाखुषीनें त्यांना सातान्यास रवाना केलें (ले. ६). अशा तऱ्हेनें मामांच्या कर्तबगारीला प्रारंभ होतो. त्यांनीं १७५५ च्या सुमारास नाशकास घर बांधून सुंदरनारायणाजवळ नदींकिनारीं बाग केला. त्यांचे नाशिकचे उपाध्ये खरे (शारंगपाणी) आडनांवाचे होते. माधवरावाच्या कारकीर्दीत मामा कर्नाटकाच्या मोहिमांत प्रामुख्यानें झळकले. सुप्रसिद्ध मोतीतलावाच्या लढाईची सविस्तर माहिती त्यांनीं पेशव्यांस १० मार्च १७७१ च्या पत्रांत जी धाडली आहे तीवरून हैदरचे डावपेंच व मराठ्यांची शिस्तीची वागणूक यांवर चांगला प्रकाश पडेल. या अभिमानास्पद विजयासंबंधी खुद्द माधवराव पेशवे विसाजी कृष्ण बिनीवाले यांस लिहितात, "राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांणीं हैदरनाइकास लुटून परत केल्याचे वृत्त लेहून पाठविलें

आहे सांप्रत काळी उत्तर व दक्षिणेस दोन्ही कर्मे वाडिलाचे पुण्य प्रतापे महायश प्राप्त जाले." उत्तरेकडे विनीवाले, शिंदे व होळकर यांनीं " रोहिल्याचे पारपत्य केले धन्याचा नक्षा नामुष हिंदुस्थानात वृद्धिंगत केला." माधवरावाला साहाजिकच जुनी आठवण झाली: " तीर्थस्वरूप कैलासवासी आप्पासाहेबी दयाबहादूर सुभा उज्जनीचा...... बुडविला व वसईचा फिरंगी नस्तनाबूद केला त्याप्रमाणें " या सरदारांनीं उत्कृष्ट पराक्रम केले. पण दादाच्या पक्षाकडील लोक मामांना 'कंस' असें संबोधीत. बारभाईच्या कारकीर्दीत मामांचा प्रारंभींच पहिला बळी पडला. तेव्हां त्या अमदानींतील फारशी माहिती या खंडांत नाहीं. यांत राघोबादादाच्या हातचीं व त्यानें धाडलेलीं बरींच पत्रें त्याचा चंचल स्वभाव दर्शविणारीं आढळतील. चिंतो विठ्ठल रायरीकर हा त्याच्या अगदीं विश्वासांतला, नानाफडणिसाशीं मिळून घेण्यास तो रायरीकराला उपदेश करतांना दिसेल ( ले. २३ ) तर " शिक्याचे पेटीची किली देखील पाठविली आहे आपले जानव्यास बांधून ठेवावी आलस सहसा न करणे " म्हणून बजावील ( ले. २४ ). त्याला अग्निहोत्र होतें असेंहि दिसतें ( ले. २५ ). तोफखान्याचा तिसरा कारखाना काढण्याची त्याची योजना होती ( ले. ३९ ). " उत्तर धान्येश भौम आहे यास्तव येवज प्रो दाहा हजाराचा गला हरभरे व गहू व शालू खरीद करून नाशिकात ठेवावा " ही सूचना फलज्योतिषावरची त्याची श्रद्धा दाखविते ( ले. ४१ ).

सखाराम बापूच्या चिकित्सक स्वभावाचें एक दृश्य पाहा: " आपणाकडील पत्रे येतात तीं तीन वेल बापू वाचितात येका येकाक्षराचा अर्थ नानाप्रकारे कल्पना घेऊन करितात यास्तव सन्निध मोर्च्यांत बापूच्याच वाडियात नेहमी राहिलो सवा महिना लिहिणे राहिले उपाये काय " ( ले. ३० ).

याप्रमाणें प्रस्तुत पेठे दप्तराचा थोडासा परिचय दिला आहे. दुसऱ्या भागांत श्री. चितळे यांनीं निवडलेले उरलेले कागद देऊन शेवटी शकावलीहि प्रसिद्ध करण्यांत येईल. ग्रंथ वाढून खर्च डोईजड झाला असतां म्हणून १२६ पत्रेंच या भागांत घेतलीं आहेत.

श्री. चितळे यांनीं आपल्या 'निवेदनां'त व्यापकार्थाच्या नांवाबद्दल खुलासा केलाच आहे.

श्री. चितळे यांनी मुद्दाम संशोधनाचा व्यासंग आपल्यामागें लावून घेतला आहे व त्यापायीं ते बरेच कष्ट व खर्चहि करतात. त्यांनीं प्रसिद्ध केलेलीं शालेय इतिहासाचीं पुस्तकें अद्ययावत् संशोधक माहितीनें भरलेलीं व आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें रचलेलीं अशींच आढळतील. तेव्हां त्यांच्यासारख्या प्राध्यापकानें जुन्या

मोडी कागदांच्या अभ्यासास लागावें ही खरोखरीच अभिनंदनीय व अनुकरणीय गोष्ट आहे. असो.

या पेठे दप्तराच्या प्रकाशनानें एक नवीन 'ठेवा' इतिहासज्ञांस मिळत आहे हें खरें. यापुढेंहि स्मारकग्रंथमालेंत अशाच अपूर्व भर पडत जाईल असें भा. इ. सं. मंडळातर्फे आश्वासन देण्यास मला हरकत वाटत नाहीं. संशोधक अहमहमिकेनें आपलीं बाडें घेऊन पुढें येत आहेत; तेव्हां काळजी कसली?

श्री. चितळे व कै. बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक–समिति यांचे आभार मानतों.

मिति आश्विन वा ४ }
शके १८७० }

चिंतामण गणेश कर्वे
चिटणीस
भा. इ. सं. मंडळ, पुणें

# पेठे-दफ्तर भाग १ ला

**लेखांक १** ( पेठे )

शक १६४४ कार्तिक वद्य ५
इ. स. १७२२ नोव्हेंबर १७

श्रीशंकर

राजश्री छत्रपति-
तीन बंद

च्यकनामा मोथल इनाम राजेश्री **विसाजी कृष्ण** उपनाम पेठे वासिष्ठ गोत्र आपस्तंब तैत्रीय शाखा वास्तव्य कसबे गोहागर प्रांत सुभा दाभोल सुहूर सन सलास अशरीन मया व आलफ बा। सनद राजश्री——स्वामि स्वस्तिश्री राज्याभिशक शके ४९ शुभकृतनाम संवछरे कार्तिक बहुल पंचमी भृगवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामि याणि राजश्री विसाजी कृष्ण उपनाम पेठे यासी दिधले इनामपत्र येसी जे तुम्ही स्वामीच्या राज्यांतील पुरातन सेवक तुमचे चालवणे स्वामिस आवश्यक जाणोन स्वामि तुम्हावरी कृपाळू होऊन मौजे किवले ता। हवेली प्रांत पुणे येथे इनाम जमीन खालसा पडपैकीं अवल दूम सीम तीन प्रतीची जमीन चावर १ येक कुलबाब कानु देखील हालीपटी व पेस्तर पटी खेरीज हकदार तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करून दिधला आहे तरी तुम्ही मौजे मा।र पैकीं सदरहूप्रो जमीन चावर १ येक चतुःसीमापूर्वक आपले दुमाले करून घेऊन तुम्ही व तुमचे वंशपरंपरेने इनाम अनभऊन सुखरूप राहणे म्हणून मुख्य इनामपत्र मा।रनुइलेच्या नावे सादर आहे याचप्रमाणें पत्रे देशाधिकारी व लेखक प्रांत पुणें व देशमुख व देशपांडे प्रांत पुणें व मोकादम मौजे किवले प्रांत मा।र यासी पत्रे सादर आहेत कीं मा।रनुइलेस इनाम मौजे किवले प्रांत मजकूर येथील इनाम जमीन अवल दूम सीम तीन प्रतीची चावर १ येक दिधली आहे तरी तुम्ही यास थल नेमून च्यकनामा करून देणे म्हणून आज्ञापत्रे सादर आहेत त्यावरून मौजे मजकुरास जाऊन थले नेमून दिधली असे जिराइत कास[1] रुके[2] ।॥- चोवीस येकूण चावर १ येक ता। जेल[3]

---

१ पिकाऊ जमीन. २ रुका हें जमीन मोजण्याचें एक माप. ३ जेल = खालीं दिल्याप्रो.

थळ जांबूळ सेत पटिया २ येकून कास रुके ·।~ येकून चावर ·॥·

लांबी दक्षिण उत्तर १ — रुंदी पूर्व पश्चिम

१ उत्तरेस पेडोला सेत घोटी टिके — १ पूर्वेस वोढा वोहळाचा पेडोळा

१ दक्षिणेस पेडोळा सेत गायमुख — १ पश्चिमेस सेत गायमुखाचा पेडोळा

२ — २

थळ भेगुर्डी जमीन कास रुके ·॥· चोवीस पैकी महादेवाची पाटी कास रुके ८५ याा बिघे ·।·

येकूण जमीन कास रुके ·।।· चोवीस पैकी चावर १ येक रास च्यक नामा करून दिधला असे तुमी व तुमचे वांडेलाचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने कीर्दी* करून सुखरूप खाणे हा च्यकनामा लिहिला सही

गोही

मोकदम मौजे मजकूर

१ त्रिंबकजी बीन आवाजी तरास मोाद्म

१ येसजी बीन आंतोजी मातले मुाा

१ सटवोजी बिन संडोजी रुजु भिमाजी बिन सुभानजी दांगट गुाा राणोजी दांगट मोा निशाणी नांगर बिकलम

३

बोप माळी व लहा माळी बिन राम माळी मेहेतरे मौजे माार निशाणी खुरपे

हाा मोरो सारंगधर कुलकर्णी जोशी मौजे माार बावाजी पाा कासीद काा इंद्रोरी प्रांत चाकण मौजे भांबोडे ताा हवेली प्रांां मजकूर सयाजी पाा बहिरट बाजी पाा बहिरट राजजी पाा बहिरट

बलुते मौजे मजकूर

१ गंगाजी बीन ताऊजी सुतार

१ परसु बीन परीट

१ मोल्याजी बीन भिवोजी कुंभार

१ सतु बीन धपु न्हावी

१ सुभानां बीन मल्हार पाा गुरव

१ दामनाक बीन हीरनाक महार

सिदोजी प्राा ब्यामाो मौजे पिसाळे ताा हवेली प्रांत पुणे

( पत्राच्या बाजूस खालीलप्रमाणे शेरे आहेत व मागे जोडावर अडबोजी मकोजीचा शिका आहे. )

---

* वहिवाट.

१ छा मालजी नरसिंगराऊ व अडबोजी नाईक सितोले देशमूख प्रा पुणे

( अडबोजी मकोजीचा शिका. ) ( शिक्यामध्यें नांगर. )

१ दग होनप देशपांडिये प्रा मजकूर मो। येक चावर नवीन रास

१ शाहिदी रघोजी नाईकराउ घारे देशमूख तर्फ पोनमाल

तेरीख ५ रविलावल (1) ११३२.

---

**लेखांक २** ( पेठे ) { शक १६४४ कार्तिक वा ७ / इ. सन १७२२ नोव्हेंबर १९ }

श्री

* स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृत संवत्सरे कार्तिक वद्य सप्तमी रविवासरे क्षत्रीय-कुलावतंस **श्री राजा शाहु छत्रपती** स्वामी याणी मोकादमानी मौजे किंवले ता। हवेली प्रांत पुर्णे यासी आज्ञा केली ऐसी जे राजश्री **विसाजी कृष्ण** उपनाम पेठे हे पुरातन राज्यांतील सेवक याचे चालविर्णे स्वामीस अवश्य जाणून मौजे मजकुरी खालसा पड जमीन पैकी अवल दूम सीम जमीन १ चावर येक कुलबाब कुलकानु देसील हालिपटी व पेस्तरपटी खेरिज हकदार यास व याच्या पुत्र पौत्रादी वौषपरंपरेने

(श्री राजा शाहू छत्रपति हर्षनिधान बाजीराव बल्लाळ प्रधान) (श्री आई आदि पुरुष श्री राजा शाहु छत्रपति स्वामी कृपानिधी तस्य श्रीनिवास परशुराम प्रतिनिधि)

---

* किवळ्यासंबंधीं पेठ्यास आणखी सनदा मिळाल्या त्या अशा—

१ ता. १६ मार्च १७४७ सेरी १ चावर मिळाल्याची सनद.

२ ता. ५ डिसेंबर १७४८ किवळें इनाम मिळाल्याची.

३ ता. ८ मार्च १७४९ शंभू छत्रपतींची सनद ( लेखांक ८ पहा ).

४ ता. २३ ऑगस्ट १७५१ किवळ्याची सरपाटिलकीची सनद त्रिंबकराव दाभाड्यानें दिली.

इनाम दिला असे तरी तुम्ही सदरहू येक चावर जमीन मोजून याच्या दुमाला करून वौषपरंपरेनें चालविणे या पत्राची तालिक लेहून घेऊन असल पत्र भोगवट्यास देणें वर्षास नूतन पत्राचा आक्षेप न करणें जाणिजे लेखनालंकार ( मर्यादेयं राजते )

तेरीख २० सफर सुरा सलास अशरीन मया व अलफ

---

**लेखांक ३** ( पटवर्धन ) { शक १६५१ भाद्रपद शुा ११ | इ. स. १७२९ ऑगस्ट २३ }

श्री

* श्रीमंत राजमान्य राजश्री **त्रिंबकराव** सुभेदार प्रांत खानदेश स्वामीचे सेवेसी विनंती सेवक शामजी संभाजी बहिरे साष्टांग नमस्कार विनंती सुरा सलासेन मया आलफ साल मजकुरी प्रा लसंग येथील जकातीबाबतचा इजारा खेरीज सिबंदी इा छ १ सफर सन मजकूर ताा अखेर मोहरम पेस्तर साल बारामाही रुा १४०० आपण कबूल केले पैकी रोख रसद ६०० खासे दिल्हे बाकी रुपये ८०० राहिले हे येणेप्रो झाडा करून अखेर माघमासी ४०० रु. अखेर जेष्टमासी रु. ४०० येकूण आटसे देऊन मुदतीस अंतर पडले तर दुहोत्राप्रो व्याज देऊन हे लिहिले सही बाा ३० छ ९ सफर हे विनंती साक्ष पत्राप्रमाणे आवजी गणेश रानडे

---

**लेखांक ४** ( रायरीकर ) { शक १६५४ वैशाख शुा १३ | इ. स. १७३२ एप्रिल २६ }

नकल

श्री

श्रीशके १६५४ परिधाविनाम सवत्छरे वैशाख सुध्ध १३ बुधवार ते दिवसी राजश्री **बाजीराव पंडित प्रधान** यास हेगोजी बिन हंसाजी मैराल व रामजी बिन सुभानजी बाबर व समस्त प्रानसारे चौत्रा नवलाख उबेर सुा इसने सलासीन मया व आलफ सन हजार ११४१कारणे लेहोन दिल्हे ऐसी जे आपला हक चौत्रे मजकुरी दर वेळी रुके ०३ तीन खुदामन चालत आहे त्यापैकी आपले खुषरजावंदीने निमे

---

* सन १७२८ मध्यें विसाजी कृष्ण मृत्यु पावल्यावर त्रिंबकराव खानदेशाचा बाबती कमाविसदार झाला ( पे. द. ३०, ३१६ ) व पुढें सुभेदार झाला.

रुका ८१॥ दीड रुका तुम्हास देऊन माफ केले असे तर आपला हक जमा होईल त्यापैकी निमे तुम्ही घेत जाणे निमे आम्ही घेत जाऊ याखेरीज वाणियापासून भीक वोहणी चाकरीमुले येईल ते आपण घेत जाऊन तुम्हास निमे···क सापिका दिल्हा आहे यास आपला भाऊचंद कोण्ही हिला हरकत करावयास उभा राहिला तर आपण वारून तुम्हासी निसबत नाही तुम्ही लेकराचे लेकरी निमे हकाचा भोगवटा घेऊन आमचे चालवीत जाणे वतनसंमंधे दिवणची पडखड पडेल त्यापैकी निमे तुम्ही देत जाणे निमे आम्ही देत जाऊन सदरहू लिहिल्याप्रमाणे आपण आपले वौशपरंपरेने वर्तणूक करून यास जो कोण्ही हिला हरकत करील त्यास आपल्या कुळश्वामीची व पूर्वजाची शफत असे हे लेहोन दिल्हे सही छ ११ जिल्काद

निा सलई

हा। गोपाल राम देशपाडे प्रां। पुणे

---

**लेखांक ५** (वैद्य)

शक १६६४ वैशाख शुद्ध ११
इ. सन १७४२ मे ४

( रघोजी भोसल्याचें बाळंभट व विश्वनाथभट वैद्य यास पत्र. या पत्रांतील प्रथमचा बराच मजकूर गैरलागू म्हणून गाळला आहे. )

···वरकड राजश्री **त्र्यंबक विश्वनाथ** यांनी **वऱ्हाड** प्रांते येऊन नानाप्रकारे मुलकास उपद्रव केला तो पत्री काये लिहावा व त्याकडे आमचे मामलियापैकी बाकी साकीचा हिशेब येणे त्याचा निर्गम न करिता उलटे प्रांतास उपद्रव केला या निमित्य त्याचे पारपत्य करणे अगत्य जाह्ले तुम्ही आपणाकडील वर्तमान सविस्तर वरचेवर लिहीत असिले पाहिजे रा। छ १० माहे रविलावल

---

**लेखांक ६** (वैद्य)

शक १६६४ श्रावण शुा ३
इ. स. १७४२ जुलै २३

( राजश्री बाळंभट व विश्वनाथ भट वैद्य यास रघोजी भोसल्याचें पत्र )

···आम्ही **बंगाल** प्रांते जाते समई चिरंजीव राजश्री **जानोजी भोसले** यासी **वराड** प्रांती ( ठेऊन ) गेलो मागें राजश्री **त्रिंबक विश्वनाथ** याणी **वराडामधे** येऊन बहुतच उपसर्ग आरंभिला याजकरितां आमच्या लोकासीं व मारनिल्हेसी हर्षांमर्ष होऊन कजिया वाढला त्यामुळें मारनिले धरिले गेले त्यास न्यावयाबद्दल राजश्री—— स्वामीची आज्ञा घेऊन हुजरे आले त्यास मारनिलेकडे आमचा हिसेब मागील येणे त्याचा निकाल स्वाणी हा कालवर केला नाहीं त्याजकडे गुंता तैसाच राहिला वास्तव

याणी ठेऊन घेतले तो आमचे येणे **नागपुरास** जाले हुजरे याणी **त्रिंबक विश्वनाथ** यासी हुजूर न्यावयाचा अतीशय केला हिशेबाच्या गुंत्याकरिंनीं त्यास ठेऊन हुजूर न पाठवावे तरी राजश्री——स्वामीची आज्ञा उलंघवत नाहीं याजकरिता **त्रिबंक विश्वनाथ** यासी हुजरेया समागमे दऊन हुजूर रवाना केले आहेत परंतु हिशेबाचा गुंता त्याजकडे तैसाच राहिला आहे त्याचा निकाल करावा हे त्याचे चित्तात येत नाही तरी मारनिल्हे हुजूर पावलियावर राजश्री स्वामीस विनंती करून मारनिल्हेस मागती आम्हाकडे रवाना करणें हिशेबाचा गुंता आमचा उरकोन देऊन त्यांणी मनमाने तेथे राहिल्यास आम्हाकडील उपसर्ग लागणार नाहीं

---

**लेखांक ७** ( वैद्य ) { शक १६६४ भाद्रपद इ. स. १७४२ ऑगष्ट

( शंकर गोविंद परांजपे याचे उमरखेड प्रांत वराड येथून श्री. बाळंभट वैद्य यास पत्र. पहिला पुष्कळ मजकूर गाळून मुद्द्यापुरता खालीं घेतला आहे. )

यानंतर राजश्री **त्रिंबक विश्वनाथ** तो आम्ही येथे आलो तेव्हांच वर्तमान आइकलें की तो **बऱ्हाणपुरावरून सातारेस** गेला आम्हास रुपये १० देविले होतें......

---

श्री

**लेखांक ८** ( पेठे ) { शक १६७१ चैत्र शुा १ सौम्यवासर इ. सन १७४९ मार्च ८

श्री

( छत्रपती संभाजी कोल्हापूरकर यांचा शिक्का )

* स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ७५ शुक्लनाम संवत्सरे चैत्र शुध प्रतिपदा सौम्यवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री **राजा शंभु छत्रपति** स्वामी याणी राजश्री

* शाहूच्या मरणोत्तर कोल्हापूरकर संभाजी सातारच्या गादीवर येणार असें घाटत होतें; म्हणून त्याच्या सनदा मराठेशाहींतील सरदार करून घेत असत. त्यांतीलच हा प्रकार दिसतो. नाहींतर त्रिंबकरावास किवळ्याची सनद शाहू व पेशवे यांच्याकडून मिळालेली असतां या सनदेची आवश्यकता कोणती ?

**त्र्यंबक विश्वनाथ** उपनाम **पेठे** गोत्र वासिष्ठ सूत्र हिरण्यकेसी हली वस्ती **पुणें** यासी दिल्हे इनामपत्र ऐसी जे तुम्ही **करवीरचे** मुकामी स्वामी संनिध विनंति केली की आपण महाराजांच्या राज्यांत सेवा करीत आहो योगक्षेम चालिला पाहिजे याकरितां आपणास राजश्री राव प्रधान याणी मौजे **किवले** ना। हवेली प्रांत पुर्णे हा

( शिका मुख्यप्रधान) (शिव छत्रपती शिका रामचंद्र )

गाव इनाम दिला आहे त्याप्रो इनाम चालत आहे परंतु भोगवटियासी महाराजांची पत्रे असावी यास्तव नवीन पत्रे करून द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणून विदित केले व राजश्री **बालाजी बाजीराव प्रधान** यांचेहि पत्र हवे ते निवेदन केलें त्यावरून मनास आणिता तुम्ही स्वामींच्या राज्यात कष्ट मेहनत करून बहुत निष्ठेनें सेवा केली याजकरितां तुमचे चालवणे स्वामीस आवश्यक यास्तव स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुम्हास गाव मारनिले याणी मौजे **किवले** ना। हवेली सुभा प्रांत पुणें हा गांव इनाम दिल्हा आहे त्या प्रो हली स्वामींनी मौजे मजकूर नूतन इनाम कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तर पटी जलतरु काष्ट पाशाण निधि निक्षेपसहिन खेरीज हकदार व इनामदार करून देहाय येक स्वराज्य व मोंगलाई दुतर्फा देखील इनाम तिजाई व सरदेशमुखी व साहोत्रा व सरपाटिलकी इनाम दिल्हा असे तरी तुम्ही सदरहू मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रो चतुःसीमा आपलें स्वाधीन करून घेणे आणि इनाम मौजे मजकूर तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनभऊन सुखरूप राहाणे आणि स्वकीय सेवा निष्ठेनें करीत जाणें निदेश समक्ष मर्यादेयं विराजते

सा। सा।

रूजू मंत्री सरकार

तारीख २९ रविलावल सु॥ तिसा आर्बैन

चार सुरु सुध चार समत सुद बार

---

**लेखांक ९** ( पेठे )

{ शक १६७६ ज्येष्ठ शु॥ १
{ इ. सन १७५४ मे २३

श्री नकल

श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव** साहेबाचे सेवेसी मोकादम समस्त दाहीजण मौजे कोयली पा। सरकार जुन्नर सेवेसी लेहून दिल्हे ऐसी जे साहेबास श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांनीं मौजे मजकुरीं सेतजमीन चाहूर येक येकून खंडी तीन दिल्ही त्यास

आपण मान्य करून तुम्हास सेत पानसपाठये तीन येकून सेत तीन संडी दिल्हे असे त्यास हद भीमा उत्तर दिसेस श्रीभीमा पूर्वं दिसेस श्रीभीमा पश्चिम दिसेस माळ दाक्षिण दिसेस उभी पटी सेजारी देउजी पि ( मि ) साल याप्रो हद जागा सेताची आसे आपण सेतात आवत घालून सेत वाहणे हे लेहून दिल्हे सही सन हजार ११५५ जेष्ट शुा १ प्रतीपदा

गोही
भिवजी पाा कोकरे मौजे खुा गांव
प्रांत चांभारगोंदे हली वस्ती मौजे मजकूर

निा नांगर
( नांगर चिन्ह )

दाा विठल रघुनाथ कुलकर्णी
मौजे मजकूर

---

**लेखांक १०** ( पेठे )

शक १६७६ फाल्गुन सुध १५
इं. सन १७५५ फब्रुवारी २६

शके १६७६ भावानाम संवतसरे माहे फाल्गुन सुध १५ ते दिवशी **त्रिंबकराऊ** वलद **विस्वनाथपंत** हा **कुस्नाजीपंत** पेठे साा कसबे **नासीक** यासी **जगजीवनराऊ** वलद **मलोजी पवार** मोकदम व **विठू** पाा वलद **रगोजी** पाा **कोठवले** कसबे मजकूर मामले **गुलसनाबाद** सरकार संगमनेर सुबे सोजस्ते बुनीयाद सुहूर सन हजार ११६४ कारणे तुमचे विशयी **बाबे देवजी** गुमास्ते मोकदम मजकूर येऊन सांगितले कीं **राऊसाहेबी** घर **मातबरपुरियांत** बांधले परंतु हेत आहे कीं गंगेच्या काठीं येखादी खाली जमीन दिधल्या बाग व गवत लाकूड काटे यास उपसान्यास जागा करू त्याजवरून खाली जमीन सेत बाा माहालाया कुनबी वाहत होता व आनसी यासही लावणी करीत होता त्याउपर **भास्कर दिनकरही** वाहत होता ते सेत तुम्ही सरकारची आज्ञा घेऊन त्याजपासून घेतले नजीक **गंगाकिनारा सुंदरनारायेन** व टेकडी व सेतात समाध होती ते सेत तुम्हास दरोबस्त बदल बाग व उपसन्यास दिधले असे त्याची बिघावन इलाही बिघे होते बिाा

पूर्वपश्चिमे बिघे हेडी इलाही ३।

उत्तर दाक्षिने हेडी इलाही ३।

——— ६॥ सदरहू जमीन मोकरा बिघे इलाही साडे साहा याचे हमशाही पूर्वेस वाट गंगेस जायाची पलीकडे बाग बालाजीपंत तु क पश्चिमेस सेत लक्षेकरी इनामदार उत्तरेस वाट पलीकडे गंगा

किनारा दक्षिणेस सेत येणे प्रमाणें तुम्हास हद महमूद करून दिधली असे सुखे तुमचे मनास मानेल तेथे विहीर करून सेतात टेकाड आहे ते समान करून तुलसी पुस्प बाग झाडझाडोरा व उपसाऱ्यास घर करून लेकराचे लेकरी नांदणें व बागाचा उपभोग घेत जाणे या बाबे कोण्ही हिला हरकत करीत त्यास आपन निवारु तुम्हासी समध नाही हे लिा सही

निा नांगर हस्ते बाबे देवाजी गुमास्ते मोकदम काा मजकूर
(नांगर चिन्ह) धर्मा नागोजी बीन विधो कुलकर्णी
दसखत गंगाधर बलाल कसबे मजकूर
आजहद देशमुख काा नासिक श्री
वाडेश्वर
चरणी तत्पर (वाटोळा शिक्का)
गंगाधर बलाल
निरंतर

---

**लेखांक ११** (पेठे) श्रीगजानन { शक १६७७ फाल्गुन शुा१ / इ. सन १७५६ मार्च २ }

(फारशी शिक्का)

वतनपत्र स्वस्ति श्री **राऊल उदेसिंग**राजे संस्थान **वासदे** याही राजश्री—— त्रिंबकराउ वीस्वनाथ पेंठे यासी सके १६७७युवा नाम संवत्छरे माहे फाल्गुण सुध्य १ रोज प्रतीपदा ते दिवसी लेहून दिधल ऐस जे सस्थान मजकुरी घरकलहो होता म्हणोन आपण श्रीमंत पंतप्रधान याच्या दरबारी येऊन विनंती केली त्याशी धर्मन्याये विचारून श्रीमंतास विनंती करून सस्थान मजकुरी आपली स्थापना केली आपल्यापासून कांही सेवा श्वामीची घडावी व स्वामीने कृपालु असावे म्हणून प्रगणे **वसदे** तर्फ हवेली मौजे **माणकुन्या** हा गाव दरोबस्त कुलबाब कुलकाणु व वौशेपरंपरे जलतरुनिधिनिस्शेप आदीकरून वतन करून दिल्हा असे देखील खंडणी मक्ता व सरदेशमुखी मक्ता व सरकार बाबती बीतपसील मोहतर्फा पटीदार व थळमोड व आबा व ताड व जांबली झाडझुडक येणेंप्रमाणें थळभरित खंड गुनेगारी व निपुत्रिकी व कलह खुटी व हाटबाजार व काना व म्हैस वेरा व स्वदड व थळभरितांचा तपसील व गलयाच्या गाड्यास दर गाड्यास रुपये २॥ अडीच व लाकड व टोकर दर गाडियासी रुपये ॥।- आने तेग व मोहडे सुरती साडीस रुपये येक व काथवड दर चुडास देखील चोथाई आने ।- सा व काथ वईल त्याचे थल भरीन दर पला

रुपये ॥- आणे दाहा व राव हरि सेर राव मौजे मजकुराहून जाईल व येईल त्यास आलमगिरी पैसे दोन व गलयाचे गाडियास आलमगिरी पैसे ८२ दोन व लाकडाचे गाड्यास आलमगिरी पैसा एक व घाटावरून बईल येतील व जातील किराणा दर बइली आलमगिरी पैसा ८॥ अर्धा व भुसार व मीठ दर बइली आलमगिरी पैसा ८। पाव सद्रहू लिहिल्याप्रमाणें मौजे मजकूरचा भोगवटा वौंश परंपरेने आपण घ्यावा आमचे वौंशाने पालावे आणि आपल्या वौंशाने खावे हे वतनपत्र लेहोन दिधले सही सवत १८१२ वर्शे ( मोर्तब सुद )

( मागील बाजूस जोडाचे ठिकाणीं 'मोर्तब सुद'चा शिक्का आहे. )

---

**लेखांक ११** ( पेशवा दफ्तर ) { शक १६७८ पौष—माघ / इ. सन १७५७ जाने. फेब्रु.

* पुरवणी सेवेसी विनंती प्रार्थना ऐसी जे **फिरंगी** याच्या जुंजांत पाडाव तोफा जाहाल्या आहेत त्यांची रवानगी तोफखानेत करणे तैसेच निशाण पाडाव पाठवून देणे म्हणोन पेशजी आज्ञापत्र होते ऐशियास पाडाव तोफापैकीं लहान तोफा तोफखान्यांत न्यावयाचे उपयोगी नव्हत म्हणून राजश्री **त्र्यंबकरावजी** याणी आज्ञा केली त्यावरून मर्दनगडी लहान ठेविल्या येक तोफ लहान व येक थोर ऐशा दोन तोफा लहान येक धारवाडी आणिल्या आहेत तूर्त गाडे तयार करणेस लाविले आहेत गाडे तयार जाल्यावर कोठे रवानगी करावी ते आज्ञा करावी तेणे प्रमाणें रवानगी केली जाईल येक लहान तोफ किलेत ठेवावयासी आज्ञा होईल तरी ठेऊं नाहीतरी दोनही गाडे तयार होताच जेथे आज्ञा होईल तेथे पोचतसे रवानगी केली जाईल................

---

* यासंबंधीं पे. द. ३९, ११५ पत्र पाहावें. मात्र त्या पत्राची तारीख ६-३-१७५७ अशी पाहिजे. शिवाय 'सरदेसाई स्मारक ग्रंथ' पान ३५ वर मर्दनगडावर त्रिंबक विश्वनाथ १७५७ च्या सुरवातीस दोन महिने होता, असा उल्लेख आहे. पे. द. २९, १६४ चे पत्रावरूनही ( या पत्राचीही तारीख १०-२-१७५६ पाहिजे ) त्रिंबकराव सन १७५६ व सन १७५७ मध्यें दक्षिणेमध्यें होता असेंच म्हणावें लागतें. अर्थात् तो त्या वेळीं रघुनाथरावाबरोबर उत्तर हिंदुस्थानांत गेलेला नव्हता. शिवाय याच ग्रंथांतील लेखांक १५ पहा.

**लेखांक १३** ( रायरीकर )

शक १६८० ज्येष्ठ वा। १
इ. सन १७५८ जून २२

नकल

श्री

श्रीमत माहाराज **मातुश्री आईसाहेब** याणी राजमान्य राजश्री **भोंडो माहादेव शनाकर्ते** यासी आज्ञा केली येसी जे तुम्ही राज्यातील पुरातन मातबर शवक तुमचे वडील सखोपंत यानी चिरंजीव कैलासवासी **शाहुबावा**जवल मोगलाईत बहुत श्रम केले यास्तव त्यास शनाकर्तीच पद व थोरले वाडियातील मजमू देऊन तेथील येकत्यारीचा कारभार सांगितला त्याजप्रमाे तुमचे वडील व तुम्ही करीत गेला मधे **विष्णु नरहर** याने साहेबास गैरवाका समजाऊन मजमूची घालमेल कराविली त्याजवरून तुम्ही निघोन गेला त्यास मारनिले सरकारचे नुकसान करून पळून गेला येसीयासी यास तुम्ही पुरातन शेवक इतबारी तुम्हापासून वावगी वर्तणूक व्हावयाची नाही हे समजून साहेब तुम्हावरी कृपाळू होऊन पुर्वतप्रमाे वाडियातील मजमूचा धंदा तुम्हास सांगोन हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही हुजूर मौजे **खेड** ता। वंदन येथील मुकामी येऊन मजमूचे कामकाज करून सुखरूप राहाणे प्राचीन संरंजाम मोकासबाबा देह गाव सात व **पाडे** सा। हवेली प्रां। वाई हा गाव दरोबस्त निमे इनाम व जमीन बिघे पस्तीस व मौजे माहारदरे येथील कुरण व वेतन दोनी जागचे रुपये ५००० पाच हजार व अंस तीन हजार येणेप्रमाे पूर्वी चालत होते त्या प्रमाे करावे तरी सदरहू प्रा। मोकासे व गाव-जमिनी व कुरण व निमे पाडे इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें आनभऊन साहेब शेवा येकनष्टेने करीत जाणे याउपरी दुसरे आज्ञापत्राचा उजूर न करितां हुजूर येणे जाणिजे छ १५ माहे सवाल सुा। तिसा खमसेन मया व आलफ बहुधान्य नाम संवत्सरे बहुत काय लिहिणे

---

**लेखांक १४** ( पेठे )

॥ श्री ॥

शक १६८० श्रावण शु. ११
इ. सन १७५८ ऑगस्ट ४.

श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** व समस्त पेठ्ये मोकदम वगैरे पेठ्ये कसबे **गोहागर** सुभा दाभोल मामले हमजाबाद या प्रति आश्रित समस्त खरे कसबे मजकूर आशीर्वाद विनंति उपरी तुमचे परंपरेने आमचे वडील कुलगुरुत्व उपाध्यपण तुमचे करीत आले त्यास पूर्वीपासून वंशपरंपरेने यजमानाचे चितास येईल

त्यास आमचे वंशांचे कोणी आपले घरी येक दोघे उपाधीक चालवावयासी चितास येतील ते ठेवावे आणि उपाध्यपण येकास अगर दोघास द्यावे ज्यास येजमान देतील त्यानेंच घ्यावे कादाचित येजमानाचे चितानरूप न वर्तल्यास दुसरा चितास येईल तो ठेवावा ज्यास उपाधीक येजमान जितके दिवस देईल तितके दिवस त्याणेच घ्यावे दुसरे कोणास बोलावयास प्रयोजन नाहीं कार्यप्रयोजनास सर्व खरे याणी यजमानाचे घरी जाऊन साहित्य करावे योग्यता पाहून कोणास काहीं पाविणे तर यजमानानें पावावे नाहीं तरी यजमानाच्या घरचे कार्य संतोषे साहित्य करून सर्वांनी संपादावे दिल्हे न दिल्हे तरी कोणास काहीं मागावयासी प्रयोजन नाहीं याप्रमाणे तुमचे आमचे वंशपरंपरेने चालत होते त्यास अलिकडे दहा पंधरा वर्षे जाहाली पुणियात दहा पाच खरे मिलोन राजश्री **सिवभट खरे** याणी तुम्हापासीं रदबदली करून उपाध्यपणाचे उत्पन्न होईल ते चौहु बुडाचे हाजीर असतील तितक्यानी यथाविभागे चतुर्धा विभाग करून वाटून घ्यावे आपले बुडातील आपले विभागांत समजवावे आथवा हाजीर येक दोहो बुडाचे जे असतील त्याणींच सर्वांहि घ्यावे याप्रमाणें केलें आणि यजमानाचे घरीं सर्वांहि जाऊन साहित्य करावें हाजीर नसेल त्यास वाटा देऊ नये येसे पत्र करून तुम्हीं आपली व हाजीर होते खरे त्याची संमति पत्रावरी घातल्या हे मोडील केल्या कराराप्रमाणें न चाले त्यास शफता लिहिल्या येसे असता ती गोष्ट कितेकांचे मनास आली कितेक जणाचे न आली परंतु तुम्ही केली तुम्ही सर्वांस मान्य यामुळे काही दिवस चालिली त्या परी आस्थेने यजमानाचे घरी कोणी राहीनात येसे जाहले परस्परे यजमानउपाध्यात कलह होऊ लागले यजमानाचे घरी सुपारी घेऊन श्रम करून कार्य करील तोवरी कामा गावात फिरेल तो सारिखा वाटा बरोबरी याजमुले अनवस्था जाहाली तेव्हां शके १६७९ ईश्वर नाम नाम संवत्सरे तुमचा व आमचा कलह जाहला कारण की यजमानाचे घरी कार्यप्रयोजनासही त्यास कोणी खरे आले कोणी न आले येसे होऊ लागले वाटा तरी लुटमर्दाईने घेऊ लागले तेव्हां ही गोष्ट उत्तम नाहीं म्हणून बहुत प्रकारे वारंवार तुम्ही सर्वांस आम्हास सांगितले परंतु आम्ही तुमची गोष्ट मान्य केली नाहीं तेव्हा नवा तह उपाध्यपण वाटून घ्यावयाचा जाहला होता तो डिला कलहामुळे उपाधीक वर्षपर्यंत पडिले सेवटीं आमहास **सिवभट खरे** आणि येक दोघे फार प्रवृत्त जाहले तेव्हा तुम्ही बोलिला कीं याउपरी पूर्ववत तुमचे आमचे वडिलावडिलाचे चालत होते त्याप्रमाणें चालाल तर आपण तुम्हास कुलगुरुत्वे पुजू नवा तह काहीं उत्तम जाला नाहीं तो तह आम्हास आनकूल पडत नाही म्हणून साफ सांगितले आहे ते अर्थी तुम्हाकडे अंतर काही नाही आमचे भाऊबंदानी हटात्कार करून अमर्यादा केली यजमान उपाधिक हे परस्परे——चालेल हटाग्रहे चालणार नाही येसे समजोन आम्ही अवघे सिवभट खरे याचे घरी गेलो पदर पसरला पायावरी डोई

ठेविली कीं आजपर्यंत यजमानासी कलह कोणी केला नाहीं तुम्ही आग्रह करिता येणेंकरून वृत्तिछेद होईल एक आग्रही जाहला तरी सर्वांही विचार करून करणे ते करावे येथे बहुत प्रकारे सांगितले परंतु ते काही न आईकत तेव्हा आम्ही सर्वांही विचार करून हे पत्र तुम्हास लिहोन दिले नवा तह जाला होता त्याअगोदर जो प्रकार वडिलापासून चालत आला तोच आम्हास मान्य तुमचे स्वांतरेस येईल त्यास येकास दोघास नेहमीं घरी ठेवणे त्यामध्ये आगर आणिक प्रसंगोपात आमचे वौसीचा चितास येईल त्यास उपाध्यपण देणे आमचा वाटाविसीं कोणाचा कंत्पा ( तंटा ) नाहीं आमचें वौसी पुढे होतील व तुमचे वौसी पुढे होतील त्याणी त्याप्रमाणें चालावे आमचे भाऊबंद कोणी पुढे मागे कलह करितील तरी तो लटिका त्यास पूर्वजाची शफत असे प्रस्तुत सिवदेव खरे व आणिक एक दोघे दुराग्रहास प्रवृत्त होऊन आईकत नाहींत त्यास आम्ही चार गोष्टी सांगोन समजाऊ ते नच ऐकत तरी ते व आम्हीं समजोन घेऊ तुम्हाकडे कोणी गोष्टीचा शब्द नाहीं पूर्वापार चालत होते त्याच अनवये तुम्ही म्हणत असता आम्ही न ऐकू तरी आम्हास ईश्वराचा व आमचे वडिलाचा बोल लागेल येसे आम्हीं समजोन आपले संतोषे हे पत्र तुम्हास सर्वांहीं मिलोन लिहोन दिलें असे शके १६८० बहूलधान्य नाम संवत्सरे श्रावण शुद्ध दशमी सोमवार हे लिहिले सही नावनिसी बी तपसील येणेंप्रमाणें,

| बिकलम | सह्या |
|---|---|
| रामचंद्र केशव कानीटकर महाजन | १ नारायणभट बिन बाळंभट खरे लेकुरभट. |
| मौजे पालसेत व अडूर ता। मजकूर | १ भास्करभट बिन गणेशभट खरे. |
| | १ बोपाजी भट बीन रामभट खरे. |
| सह्या | १ शिवभट बिन रघुनाथभट खरे पुराणिक. |
| १ गोविंदभट बिन महादेवभट खरे शारंगपाणी | १ विश्वनाथभट बिन रामचंद्रभट खरे, शारंगपाणी. |
| | १ गदाधरभट बीन नारायेणभट खरे पुराणिक |
| १ रघुनाथभट बिन विरेश्वर भट खरे. | १ रामभट बिन गणेशभट शारंगपाणी खरे. |
| १ वासुदेवभट बिन रामचंद्र भट खरे. | १ बालंभट बिन बापूभट्ट सारंगपाणी खरे. |
| | १ लक्ष्मुमणभट्ट बिन विस्वनाथभट्ट खरे. |

**लेखांक १५** (वैद्य)

{ शक १६८१
{ इ. सन १७५९।

श्रीशंकर

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री **विश्वनाथ बाबा** स्वामीचे सेवेसी पोष्य **माहादाजी राम दामले** साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम ता। श्रावण व॥ १३ जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण पेसजी लि॥ होते की मौजे सोनगावास येथ आमची बाग आहे तिसा मजकूर लिहून पाठवणे म्हणोन लिहिले त्यास राजश्री **त्रिंबकरावमामानी** ती बाग गडकरी यासी दिल्ही आहे गडकरी यानी सेते केली आहेत त्यास तेथून काही उपाये होय सारिखा नाहीं आपणास कलावे म्हणून लिहिले आहे यानंतर आपण लिहिले की भेटीस अगत्य येणें ........... पंढरीहून आल्यावरी काही शरि(रास)...... समाधान नव्हते हाली काही समाधान वाटो लागले आहे तरी येक दोन रोजी भेटीस येतो भेटीनंतर सविस्तर वर्तमान निवेदन होईल बहुत काय लिहिणे कृपा ...... असो दीजे हे विनंती.

---

**लेखांक १६** (पेठे)

{ शक १६८२ आश्विन शु॥ १५
{ इ. सन १७६० आक्टोबर २४

श्री

छ० रामराजाचा शिक्का

वतनपत्र समस्त राजकीय धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री **बाळाजी पंडित प्रधान** ता॥ **त्र्यंबकराव विश्वनाथ** उपनाम पेठे गोत्र वासिष्ट शाखा तैतिरीय सूत्र हिरण्यकेशी मोकादम कसबे गुहागर ता॥ मजकूर सुभा प्रा॥ दाभोळ सुहुर सन इहिदे सितैन मया व आलफ शक १६८२ विक्रमनाम संवत्सरे दिल्हे वतनपत्र येसे जे तुम्ही हुजूर कसबे पुर्णे येथील मुकामी विदित केले कीं मौजे जगदीशपूर उर्फ जलालपूर प्रा॥ नाशीक मामले गुलसनाबाद सरकार संगमनेर सुभे खुजस्ते बुनियाद येथील पाटील पूर्वी पुण्याचे मुकामी गावचे उस्तवारी करिता हुजूर आले होते ते समई मौजे मजकूरचे दरोबस्त मोकदमीपैकी तिजाई मोकदमी वडीलपण सरकारात देऊन खरीदखत करून दिल्हे होते त्याउपरी येक दोन वर्षांनी सन आरबा खमसेनात मौजे मजकूर हा गाव दरोबस्त सरकारातून आपणास

पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करून दिल्हा ते समई तिजाई मोकदमी सरकारात पेसजी घेतली होती तेही आपणास बक्षीस द्यावी म्हणून विनंती केली त्याजवरून स्वामिनी रुपा करून बक्षीस दिल्ही तिचे बक्षीसपत्रही आपले नावे सरकारातून छ१ जमादिलोवली सन अर्बा समसेनात करून दिल्हे आहे त्याप्रो अनुभवीत आलो त्यास आजोजी वगैरे पाा वायचले व सटवोजी वगैरे पाा नंदन उर्फ अहीर मौजे मजकूर हे समस्त भाऊबंद आपणाकडे गावचे उस्तवारी करिता येऊन बर्जाद जाले कीं मौजे मजकुरी धरणाचा बंधारा नवा पका बांधावा म्हणजे गावची उस्तवारी व आमचे उर्जीत होते त्यास आम्हीच बांधारा बांधावा तरी काम मातबर पैका मचलग लागतो आम्ही कर्जदार नातवान यामुळे ताकद नाहीं ऐशीयास तुम्ही मातबर व आमचे वतन माऊ आहा तुम्हावाचून बांधारियाचे काम होत नाहीं यास्तव आम्हाकडे दोन तक्षिमा मोकदमी राहिली आहे त्यापैकी चौथाई मोकदमी तुम्हास आम्ही आपले खुपरजावंदीने आणखी देऊन पहिली तिजाई मोकदमी सरकारांतून तुम्हास बक्षीस दिल्ही ती तुम्हाकडे चालत आहे ते व नवी दोन तक्षिमापकी चौथाई मिलोन निमे मोकदमी वडीलपण तुम्हास देऊन खरिदीखत करून देतो त्याप्राा वतन अनुभऊन बांधारियाचे काम करून गावची उस्तवारी करावी म्हणोन मिलतमाना करून आमचे गला पडिले त्यावरून आम्ही बांधारीयाचे काम करावयाचे मान्य करून चालीस लाऊन तयार केले त्यास पहिली तिजाई मोकदमी आपणास सरकारातून बक्षीस दिल्हीच आहे तेव्हां पाटिलाकडे दोन तक्षिमा मोकदमी राहिली होती त्यापैकीं चौथाई मोकदमीचें वतन नवे त्याणी दिल्हे एकूण निमे मोकदमी वडीलपण व वडीलपणाचें मानपान व हक उत्पन्न देखील निमे वतनाचे खरीदीखत समस्तानी रजावंदीनें करून दिल्हे ते आपण घेऊन त्या बमोजीच काजी व देशमूख व देशपांडे व हाली मवालियाच्या विद्यमाने महजरही करून घेतला आहे त्याप्रमाणें सरकारची वतनपत्रें भोगवटियास असावी यास्तव स्वामीनी कृपालू होऊन आपणाजवळ खरीदीखत व महजर आहे तो मनास आणून व रुबरू पाटील मजकूर आले आहेत त्यास पुसोन वतनपत्रे भोगवटियास करून द्यावी म्हणोन विनंति केली व खरीदीखत व महजर आणून दाखविला त्याचा मजकूर

खरीदीखत शके १६८२ विक्रम नाम संवछरे जेष्ठ शुद्ध द्वितीया शुक्रवार ते दिवसी श्रीमंत राजश्री त्र्यंबकराव विश्वनाथ हाा रुष्णाजीपंत उपनाम पेठे मोकादम कसबे गुहागर तर्फ मजकूर सुभा दाभोळे यास आजोजी पाटील वलद जावाजी पाटील हाा जावजी पाटील व वालहोजी पाटील वलद वालोजी पाा व भवानजी पाा वलद वाह ग हाा बाबाजी पाटील व येस पाा वलद सांबाजी पाटील हाा त्रिंबक पाटील व गंगाजी पाा व मिवाजी पाा वलद धोंडोजी पाटील हाा सटवाजी पाटील वायचल मोकादम हिसे तीन व ससोजी पाटील व सटवाजी पाा वलद जानोजी पाा हाा

सेठ्याजी पा। व धोंडी पा। वलद अंताजी पा। इा। निंबाजी पाटील व मनुजी पाटील वलद कोंडाजी पाटील इा। निंबाजी पाटील व येस पाटील वलद निंबाजी पा। इा। जावजी पा। व तिमाजी पा। वलद अवचित पा। इा। रंभाजी पाटील व देवाजी पाटील वलद धावजी पाटील इा। कृष्णाजी पा। नंदन ऊर्फ आहीर मोकादम हिस्सा चौथाई मौजे जगदीशपूर ऊर्फ जलालपूर प्रा। नाशिक मामले गुलसनाबाद सरकार संगमनेर सुभे खुजस्ते बुनीयाद सुरुसन सितैन मया व अलफ सन ११६७ कारणें खतदस्त लिहोन दिल्हे ऐसी जे आपला गाव दरोबस्त कुलबाब कुलकानु साहेबास श्रीमंत——साहेबी इनाम दिल्हा साहेबासी येक दोनदा गावास आले होते परंतु आमची उस्तवारीची सोय झाली नाहीं आणि आम्ही नातवान कर्जदार सर्व प्रकारे उर्जीताची व गावचे उस्तवारीची उमेद धरून अर्ज केला कीं पूर्वी पुणेयास गावचे उस्तवारी करिता जाऊन श्रीमंत——साहेबास भेटलों आणि तिजाई मोकादमी श्रीमंतास देऊन आपणास आश्रय केला होता त्या उपरि दरोबस्त गाव साहेबास इनाम श्रीमंती दिल्हा तेव्हा तिजाई पाटिलकी सरकारांत दिल्ही होती ते साहेबी श्रीमंताजवळ अर्ज करून मागोन घेतली आहे त्यास आम्ही साहेबाचे पदरी पडलो बंधारियाचा जीर्णोद्धार जालिया खेरीज आमची उस्तवारी होत नाहीं बांधारियास पैसा मबलक लागतो आमची तर नादारी आम्हामध्यें कांहीं ताकत नाहीं साहेब समर्थ धणी आणि वतनभाऊ जालेत बंधारियाचे काम साहेबावाचून होणार नाहीं म्हणोन सालमजकुरी आपण समस्त भाऊबंद मिलोन साहेबापासी येऊन मिलतनामा करून विनंति केली कीं पहिली तिजाई पाटीलकी साहेबाची आहे व हाली दोन हिसे पाटिलकी आमची राहिली आहे यापैकीं चौथाई हिस्सा आणखी साहेबास आपण आपल्या खुषरजावंदीनें देऊन निमेचे भाऊ वडील करितो तरी साहेबीं चित्तावर धरुन बांधारियाचे काम केले पाहिजे म्हणोन विनंति केली साहेबी आज्ञा केली की पाटीलकीची किंमत काहीं बहुतसी होत नाहीं आणि बंधारियास पैका मबलक लागतो त्यास आपण साहेबास अर्ज केला कीं साहेब समर्थ आहेत आणि धणी वतन भाऊ पाटीलकीची किंमत थोडी म्हणून याजवर नजर न द्यावी बंधारियास जो पैका लागेल तो करून बांधारा बांधला पाहिजे म्हणजे आमची उस्तवारी होते त्याजवरून साहेबी आमच्या गरिबीवर नजर देऊन बांधारा बांधावयाची आज्ञा केली ते उमेद होऊन आम्ही सर्व भाऊ येकचित होऊन मौजे मजकूरची मोकदमी दरोबस्त पैकी निमे मोकदमी आपण आपल्या खुषीनें साहेबास मिरास वतन करून दिल्हे आहे हे निमे मोकदमी वंशपरंपरा पिढी दर पिढी लेकराचे लेकरी अनुभवित गेले पाहिजे निमे मोकदमीची जमीन काली व पांढरी जिराईत व बागाईत मले व थले व पाट बंधारे व माल व दरडी व आंबा आबली वगैरे झाडे झाडोरा निमे गावचा दिल्हा असे

व मोकद्मीचे वडीलपणाचे मान नाव नागर सिरपाव टिळा विडा होलीची पोळी व पोलियाचे बैल व दसरेयाचा हेला व दिवाळीचे वाजंत्री वाजवणें वगैरे दरोबस्त व मान वडीलपणाचे दिल्हे असेत मुकादमीचे हक्क आदावआडे (!) व पासोडी व शेला व वाटी व तेल्यापासून तेलधार व चांभारापासून जोडा व मोहरक्या व राबते पाडेवारी व उसाच्या कित्यास गुळाची भेली येक व शेवसबाजी वगैरे मोकादमी संबंधे जे हक्क सुदामत आहेत ते निमे अर्धे तुम्हास द्यावे मग निमे आपण घेऊ व गावामध्ये पांढरीवर मोकादमीचे घरठाणें वाडे आमचे आहेत त्यापैकीं निमे ठाणे घर वडील-वाटा उजवेकडील साहेबास दिल्हा आहे तेथे मन मानेल तैसी इमारत बांधोन लेकराचे लेकरी नांदावे सद्रहू निमे मोकादमी दिल्ही आहे याजविसी आपला कोणी भाऊबंद दाईज गोत्रज आथवा हर कोण्ही नादिगर करील त्यास कुलस्वामीची व गंगेची व पूर्वजांची शफत असे हर कोणी उजूर केलिया आपण समजाउ तुम्हाकडे कोणे गोष्टीचा गुंता नाहीं हे खरेदखत लिहून दिल्हे सही तारीख छ १ माहे सवाल

वालोजी पा वाईचल बि॥ नागर १ धोंडी पाटील उर्फ अहीरजीपं ॥१ चिकलम अंबादास बापुजी कुलकर्णी मौजे मजकूर

गोही

विश्वनाथ पाटील व त्रिंबक पाटील सबले मौजे चादसी पा॥ नि॥ नांगर १ बाचाजी पा बहीरोजी पा॥ मौजे मजकूर दिंडोरी निशाण नांगर १

( वगैरे २६ जणांच्या सह्या आहेत )

किता साक्षी दसकिते हरेकु लि॥ आहेत

( सुमारे १२ लोकांच्या सह्या आहेत )

ई महजर सुरत मजलस बहादुर शारियत पन्हा व मुतसद्दीयानी व देशमुखानी व देशपांडियानी व हालि मवालि दार कचेरी पा॥ नासिक मामले गुलसनाबाद सरकार संगमनेर सुभे खुजस्ते बुनियाद सुहुर सन सितेन मया व आलफ सन ११६९ कारणे महजर केला ऐसा जे आजोजी पाटील वलद् बाचाजी पाटील इ॥ जावजी पा॥ व वाल्होजी पा॥ वीहालोजी पा॥ व भवान पा॥ वलद् (!) पाटील इ॥ बावाजी व येस पा॥ वलद् साबाजी पा॥ इ॥ त्रिंबकजी पा॥ गंगाजी पा॥ व सिवाजी पा॥ वलद् धोंडजी पा॥ इ॥ सटवाजी पा॥ वायचल मोकादम हिसे तीन व सटवोजी पा॥ व सटवाजी पा॥ वलद् जानोजी पा॥ ई॥ सेव्याजी पा॥ व धोंडजी पा॥ वलद् अंताजी पा॥ ई॥ निंबाजी पा॥ व मल पा॥ वलद कोंडाजी पा॥ येचोन निंबाजी पा॥ व येस पाटील वलद् निंबाजी पाटील येचीन जावजी पा॥ व निमाजीचा वलद् अवचित पा॥ ई॥ संभाजी पा॥ व देवजी पाटील वलद् धावजी पा॥ ई॥ कृष्णाजी पा॥ नंदन उर्फ अहीर मोकादम हिसा चौथा मौजे जगदीशपूर उर्फ जलालपूर पा॥ मजकूर याही

येऊन हाजीर मज्यालस जाहीर केले कीं आपला गाव दरोबस्त .कुलबाब कुलकानु श्रीमंत——साहेबी राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांा कृष्णाजीपंत उपनाम पेठे मोकादम कसबे गुहागर ताा मजकूर सुभा प्रांत दाभोळ यास इनाम पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने दिल्हा आहे त्यास राजश्री——रावसाहेब येक दोन वेळां मौजे मजकुरास आले होते परंतु आमची उस्तवारीची सोई कांहीं जाहाली नाही आम्ही नातवान व कर्जदार सर्व प्रकारे उर्जेताची व गावचे उस्तवारीची उमेद धरून हाली साल मजकुरी रावसाहेबाचे सेवेसी जाऊन विनंति केली की आम्ही पूर्वी गावचे उस्तवारी करितां पुणियास जाऊन श्रीमंत——साहेबास भेटलो आणि तिजाई मोकदमी मौजे मजकूरची श्रीमंतास देऊन आम्ही आपल्यास आश्रय केला होता त्या उपरी दरोबस्त गाव श्रीमंती इनाम साहेबास दिल्हा त्यासमई मौजे मजकूरची तिजाई मोकदमी सरकारात आम्ही पूर्वी दिल्ही होती ते साहेबी श्रीमंताजवळ अर्ज करून मागोन घेतली आहे त्यास आम्ही पदरी पडलो बंधारियाचा जीर्णोधार जाहल्यासेरीज गावची उस्तवारी होत नाही बांधारियास पैका मुबलक लागतो आमची तर नादारी आम्हामध्ये काहि ताकद राहिली नाही साहेब समर्थ धणी आणि वतनभाऊ जाहले व बांधारियाचे काम साहेबावाचून होणार नाही म्हणोन आम्ही समस्त भाऊबंध मिलोन मिलतनामा करून विनंती केली की पहिली तिजाई मोकादमी साहेबाची आहे हाली आमची दोन हिसे मोकादमी राहिली आहे त्यापैकी चौथा हिसा आणखी साहेबास देऊन येकून निमेचे वडीलभाऊ करितो तरी साहेबी चित्तावर धरून बांधारियाचे काम केले पाहिजे म्हणोन विनंती केली त्यास रावसाहेब बोलिले की पाटीलकीची किंमत काही बहुतसी होत नाहीं आणि बंधारियास पैका मबलक लागतो त्यास आम्ही मागती विनंती केली की साहेब समर्थ धणी वतन-भाऊ आहेत पाटीलकीची किंमत थोडी म्हणून याजवरी दृष्टी न द्यावी बांधारियास जो पैका लागेल तो करून बांधारा बांधिला पाहिजे म्हणजे गावची उस्तवारी होईल त्याजवरून रावसाहेब आमचे गरीबावर नजर देऊन बांधारा बांधावयाचे मान्य केले त्याजवरून आम्ही सर्व भाऊबंद येकचित होऊन मौजे मजकूरचा मोकदमी दरोबस्तपैकी पेसजी हिसा तिसरा सरकारात दिल्हा होता तो व हाली आमच्या दोहीं हिशापैकी हिसा चौथा येकूण मोकादमी निमे वडीलपण आम्ही आपल्या खुसीने रावसाहेबास मिरास करून दिल्ही आहे याचे खरीदीखत आलाहिदा करून दिल्हा आहे हाली महजरास उमेदवार आहेत यास महजर करून दिल्हा पाहिजे म्हणोन आजोजी वगैरे पाा वायचल व सखोजी वगैरे पाा नंदन उर्फ अहीर मजकुरानी जाहीर केले त्याजवरून हाजीर मज्यालसीने बमोजीब खरीदीखत व बायेकरार आजोजीन पाा वगैरे व सखोजी पाा वगैरे महजर करून दिधला ऐसा जे राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ पेठे यांही मौजे मजकूरची मोकादमी दरोबस्तापैकी निमे वडीलपण घेतले आहे हे पुत्रपौत्रादी वंश-

परंपरेने पिढी दर पिढी अनुभऊन करीत जाणे निमे मोकादमीची जमीन काली व पांढरी व जिराईत व बागाईत व मळे व स्थळें व पाटबंधारे व माल व हाडि व आंब अंचली वगैरे झाड झाडोरा निमे गावचा दिल्हा आहे तो निमे दरोबस्त गावपैकी घेणे व मोकादमीचे वडीलपणाचे मान नांव नागर शिरपाव टिला विडा व होळीची पोळी व पोल्याचे बैल व दसरियाचा हेला व दिपवाळीचे वाजंत्री वाजवणे वगैरे दरोबस्त वडीलपणाकडे दिल्हे आहेत ते तुम्ही घेत जाणे व मोकदमी संबंधे हक बाब व आडे व पासोडी व शेलावाटी व तेल्यापासून तेलधार व चांभारापासून जोडे मोहरक्या व राबते पाडेवर व उसाचे कित्यास गुळाची भेली येक व सेवकबाजी वगैरे मोकादमी संबंधे जे हक सुदामत आहेत ते निमे तुम्ही आधी घेत जाणे मागून आजोजी वगैरे सखोजी वगैरे पाटील घेतील व गावामध्ये पांढरीवर मोकादमीचे घरठाणे आहेत त्याप्राा निमे घरठाणे वडीलवाटा उजवेकडील तुम्हास दिल्हा आहे तेथे मनास मानेल तैसी इमारत बांधोन लेकराचे लकेरी नांदणे सदरहू लिहिल्याप्रा मोकादमी निमे तुम्हास दिल्ही आहे याजविसी आजोजी पाा वायचल वगैरे सखोजी पाा नंदन ऊर्फ अहीर वगैरे याचा कोणी भाऊबंद व दाईज गोत्रज अथवा हर कोणी नौदिगर करील त्यास अजीजी पाा वायचल वगैरे सखोजी पाटील नंदन ऊर्फ अहीर वगैरे समजावितील तुम्हासी कोणे गोष्टीचा संबंध नाहीं हा महजर सही छ ५ माहे सवाल

येणेप्रमाणे खरीदीखताचा व महजराचा मजकूर मनास आणून आजोजी वगैरे बायचळ पाा व सखोजी वगैरे पाा नंदन उर्फ अहीर वगैरे मौजे मजकूर यांस रूबरू पुसता त्यानीं विदित केले कीं आपण राा त्रिंबकरायाचे गला पडोन धरणाच्या बांधाऱ्याबद्दल खुषरजावंदीनें आपल्याकडे दोन तक्षिमा मोकदमी बाकी राहिली होती त्यापैकी चौथाई मोकदमी त्यास दिल्ही व पहिली तिजाई मोकदमी सरकारात आम्ही दिल्ही आहे त्यास आठदहा वर्षे जाली ते सरकारातून साहेबी मारनिलेस बक्षीस पहिलीच दिल्ही आहे ते व हाली चौथाई आम्ही दिल्ही त्यासुधा निमे मोका-दमी वडीलपण व मानपान वडीलपणाचे हक्क वगैरे उत्पन्न निमेनिम देऊन त्यास खरीदीखत व महजर करून दिल्हा आहे त्याप्रमाणें वतन अनभवीत आहेत व बांधा-रियाची इमारत मारनिलेस कराराप्रमाणे सात आठ हजार रुपये लाऊन तयार केली म्हणोन पाटील मजकूर याणी विदित केले त्याजवरून पहिली सरकारांतुन तिजाई मोकदमी तुम्हास बक्षीस दिल्हीच होती तेव्हा हाली पाटील मजकूर याणी आपले तक्षीमाचे दोन हिसेपैकीं चौथाई मोकदमी बांधारियाचे कामाबद्दल तुम्हास नवी दिल्ही येकून एकंदर मोजे मजकूर येथील निमे मोकदमी वडीलपणाचे खरीदीखत पाटील मजकूर याणी समस्त भाऊबंदाचे व भोवरगावाचें साक्षीनिशी खुषरजावंदीनें तुम्हास दिल्हे त्याप्रा तुम्ही घेऊन बांधा-रियाचे काम कबूल केल्याप्रमाणें केलें हे खरें जाणून तुम्हावर कृपाळू होऊन मौजे जगदीशपूर येथील निमे मोकदमीचे वतन वडीलपण तुम्हाकडे करार करून हे वतन-

पत्र करून दिल्हे असे तरी तुम्ही मौजे मजकूर येथील निमे मोकदमीचे वतन वडील-पण मानपान हक्क उत्पन्न देखील आपले दुमाला करून घेऊन सरीदीखतापमाणें वडीलपणाचे मान नाव नागर व शिरपाव व टिला विडा होलीची पोळी व पोलियाचे बैल व दसरियाचा हेला व दिवाळीचे वाजवणे वगैरे दरोबस्त मान तुम्हाकडे व शेते जिराईत व बागाईत मळे व स्थळे व पाटथंधारे निमेनिम प्रो तुम्हाकडे व मोकादमीचे हक्क आदा व आडे व पासोडी व शेला व वाटी तेल्यापासून तेलधारा व चांभारापासून जोडा व मोहरक्या व राबते पाडेकरी व उसाचे किल्यास गुळाची भेली येक व शेवकचाजी वगैरे मोकदमी संबंधें जे हक्क सुदामत आहेत ते निमेनिम प्रा आधी तुम्हास मग मागून त्यास व मोकदमीचे घरठाणे आहेत त्यापैकीं निमे घरठाणें वडील वाटा उजवेकडील तुम्हांकडे व डावेकडील त्याजकडे येणेप्रमाणे निमे मोक-दमीचे वतन वडीलपण तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनुभऊनं सुखरूप राहणें जाणीजे छ १४ रविलावल आज्ञाप्रमाण

---

**लेखांक १६** ( चिंचवड दप्तर )

| | | |
|---|---|---|
| पौ शुद्ध ५ पौष मास<br>शक १६८३ वृष संवत्सर | श्रीशंकर | शक १६८३ पौष शुद्ध ५<br>इ. सन १७६१ डिसेंबर ३१ |

श्रीमंत महाराज राजश्री देव स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक **त्रिंबकराव विश्वनाथ** कृतानेक सां नमस्कार विज्ञापना स्वामींनी पत्रीं आज्ञा केली की मोगल कोठे आहे श्रीमंत कोठे हे वृत्त ल्याहावे त्यास श्रीमंताचे लस्कर **लोणी**वर आहे मोगल मौजे **उरली**वर आहे आज मोगलाचा मुा च आहे **सला** व्हावा येसी बोली लागली होती मागती तुटलीसी जाली आहे बहुधा उद्यां परवा मागती जूज होईल महाराजाचे आशीर्वादे करून श्रीमंतास ज्येय येणे तर येईल यंदाचा समये फारच कठीण आहे स्वामी श्रीची प्रार्थना करतील आणि श्री मोरया कृपा करील तरच सर्वांची लज्या राहील सर्व भार श्रीवरच आहे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

---

**लेखांक १७** ( पेशवा दफ्तर )

शक १६८३ फाल्गुन शुाा ४
इ. स. १७६२ फेब्रु. २८

इसनें सरंजाम **माधराव बल्लाल** पेठे दफाने पत्रे छ ३ सायान माानिले यानी विदित केले की मौजे जाव पाा वण येथें मुकासा बाबती राजपत्री इनाम आहे

येविशी श्रीमंत कैलासवासी रावसाहेब व **कान्होजी भोसले** याची पत्रे आहेत व सरदेशमुखी कैलासवासी रावसाहेब यांणी देऊन पत्रे करून दिल्ही एकूण मोकासा व बाबती सरदेशमुखी श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांचे वेळे पावेतो चालत आले अलीकडे गडबडीमुळें बाबती सरदेशमुखी चालत नाहीं येविसी ताकीद देऊन पेशजीची पत्रे पाहून सदरहू निम्ही अमल आपलेकडे चालते करावे म्हणोन त्याजवरून हे पत्र सादर केले असे तरी तीर्थरूप कैलासवासी नानासाहेबांचे वेळेस सरदेशमुखी व बाबतीचा अंमल मारनिलेकडे चालत आल्याप्रो चालविणे म्हणोन चिटणिशी पत्रे

---

**लेखांक १८** ( पेशवा दफ्तर )

{ शक १६८३ फाल्गुन शुद्ध १४
{ इ. सन १७६२ मार्च९

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी पोष्य **मल्हारबावाजी** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। फाल्गुन शु॥ १४ पर्यंत यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष आपण कृपा करून पत्र पाठविले ते पावोन संतोषवाप्ति जाली राजश्री **विठल हरि** व **गोविंद रघुनाथ** यासी पत्रे आपली होती ती दिल्ही पत्रार्थ अन्वये कीं पनास सहस्र रुपये व जकातीचा ऐवज देणें त्याचे उत्तर कीं सांप्रत एक रुपया नाहीं......................पुण्याकडील वर्तमान आठवे दिवसी आणिवतान काल पत्रे आली त्यांत मजकूर कीं शंकराजी केशव याचा जाबसाल मागती उपस्थित जाला होता तो स्थगित होऊन गोविंद गोपाळ याणी श्रीमंत राजश्री **दादासाहेबाकडे** जाबसाल लाविला आहे त्यावरून राजश्री **त्रिंबकराव मामा** लष्करात श्रीमंताकडे गेले तेथें निश्चयात येईल ते खरे दोन दिवस राजश्री **बाबुराव फडणीस** याचे कृत्य स्थिर राहिले श्रीमंत **बापूस** सासवडास पाचारावयाची श्रीमंतानी सैन्यातून कमाविसदार मतलब गाठितात आपले आगमन रेवा उतरून या प्रांतीं येणार म्हणोन यासी श्रवण जाले तेणेकरून विचारात पडले होते — ( पुढील मजकूर अनुपलब्ध )

---

**लेखांक १९** ( वैद्य )

{ शक १६८४ आषाढ शु॥ १५
{ इ. सन १७६२ जून २६

श्रीशंकर

आपत्ये **बाबूराव विश्वनाथ वैद्य** कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता। आषाढ शु॥ ५ रविवार पावेतो मु॥ पुणे येथे समस्त सुखरूप असो विशेष

आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नवते त्यास हाली रा। धोंडभट दामले आले त्याचा। पत्र आले त्यावरून सविस्तर वर्तमान कलले येसेच निरंतर पत्री सांभाल करीत असावे यानंतर आम्हाकडील वर्तमान तरी यथास्थित आहे श्रीमंत रावसाहेब रूपा करितात श्रीमंत **पंतसचीवही** यंद्रा सामखा गुंता वारून देऊ म्हणतात सरकारातूनहि ताकीद होणार आहे पेशवे यांच्या दरबारचा मजकूर तर राजश्री **दादासाहेब** म्हणतात की दौलत दो जागा करावी आम्हास येकत्र राहावयास अनुकूल पडत नाहीं त्यास रावसाहेब म्हणतात की आम्हास दौलत लागत नाहीं आपण वडील सर्व कारभार आपण करावा आम्हास जी आज्ञा कराल त्यास आम्ही राजी त्यास आज चार रोज डोहणा पडला आहे राजश्री **सखारामपंत** या मसलतीत नाहीं ते रावसाहेबाकडे आहेत चिंतो विट्ठल वगैरे दादासाहेब याकडील मुत्सदीयांचा मजकूर ... ... ... आहे आज दोन दिवस रावसाहेब देणे यावे करीत नाहींत सर्व दादासाहेब करितात पुढें काय परिणामास लागेल ते पहावे सचिवाचाहि मजकूर हाच आहे की करावा तर कारभार आपण करावा नाहींतर दोन करावी ऐसा मजकूर आहे राज्यचिन्ह यथास्थित दिसत नाहीं आपणाकडील सविस्तर वर्तमान वरचेवर लिहित जाणे मजविसी चिंता न करणें रा। **वेंकाजीपंत** सातारकर यांची भेट घेतली त्यांच्या चित्तातला किलाफ दूर केला परंतु अद्याप चित सुध होत नाहीं कलले पा। बहुत काये लिहिणे हे विज्ञापना

---

**लेखांक १०** ( पेठे )

शक १६८४ आश्विन वा। ३
इ. सन १७६२ आक्टोबर ६

श्री
( जव्हारची मुद्रा )

राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** पेठे मोकदम कसबे गोहागर तर्फ मजकूर सुमा दाभोळ गोत्र वासिष्ट शाखा तैतीर्य सूत्र हिरण्यकेशी गोसावी यांसी सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य——राजश्री **पतंगशहा राजे** संस्थान जव्हार दंडवत विनंति सन ४२० वर्षे कारणे कीं आपले वडिलांचे जव्हार प्रांतीचे राज्य आपले वडील मागे झुंजले भांडले त्याजमुळें राज्य जात जात गेले सेवटी आपले वडील **विक्रम पतंगराव** होते ते कैलासवासी जाले सर्व राज्य गेले त्या उपरी श्रीमंत राजश्री **बाळाजी बाजीराव पंडित** प्रधान कैलासवासी यानी वडील मातोश्री रायकुवरबाई यांचे पोटी संतान नव्हते तेव्हा कृष्णशा पोसण्या घेतल्या आणि पेशव्याजवळ येऊन विनंति केली तेव्हां यानी राज्यावरी स्थापना केली असता **कृष्णशा** याने बदमामली वर्तणूक केली तेव्हां मागती राज्याचा उच्छेद जाहला

मग धाकटी मातोश्री **मोइनकुअर** आई याणी पुण्याचे मुक्कामी येऊन विनंती केली कीं राज्य बुडते पोटी संतान नाहीं तरी आमचे वौशीचा धर्मपुत्र देऊन स्थापना केली तरी पुण्य पुरुषार्थ फार आहे ऐसा मजकूर दरबारी केला त्या समयी श्रीमंत राजश्री **माधवराव बल्लाल** पंडित प्रधान पेशवाई करीत होते तेव्हा सर्व प्रकारे साहित्य तुम्ही करून आम्हास मातोश्रींचे वोटीत घालून संस्थानावरी स्थापना करवली जव्हारचे स्थळ पेशव्याकडे जप्त होते ते मोकळे करून देऊन राज्य उभे केले ये गोष्टीचे उतराई व्हावे म्हणून आम्ही होऊन खुशालीने मौजे देवरगाव प्रांा वाघेरा हा गाव दरोबस्त इनाम करून दिला असे शिवाय हक्क जमीदार व इनामदार खेरीज करून देखील सेरी सरीक रबी नख्त महसूल समेत सवई कुलबाब कुलकानु बरहुकुम रकमाला व मुलकी सरदेशमुखी व प्रधानहक्क व पितरभेट व छावणी व राबता व गादी कलमास व इनामपट्टी निा इनामदार व चोरी छिनाली निपुत्रिकी व शिंगशिंगोटी व पाटदाम वगैरे कमाविसी हक्क भालदार व हक्क न्यायाधीश व सवास लाहरी व मर्दनटक्का दरोबस्त बाबती हाली पट्टी व पेस्तरपट्टी जलतरुपाषाणनिधि-निक्षेप आदि करून मौजे मजकूर तुम्हास इनाम चतुःसीमा पूर्वक दिला असे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेने गावचा उपभोग सुखरूप घेत जाणे जाणिजे छ १७ माहे रबिलावल सुा सन सलास सीतैन मया व अलफ शके १६८४ सौम्यवासर बहुत काय लिहिणें हे लिहिले सही

(शिक्का जव्हार)
कल्याण
महाल

---

**लेखांक ११** (रायरीकर)

{ शक १६८६ ज्येष्ठ शुा १३
{ इ. स. १७६४ जून १२

श्री

आसीर्वाद उपरी येथील वर्तमान ताा जेष्ठ शुध त्रयोदसी मंगळवार अवसीची येक प्रहर रात्रपर्यंत सुखरूप असो विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर कळला तुम्ही येथें यावे किंवा परभारे जावे या अनवये राजश्री **नाना फडणीस** यास विचरिले त्याणी उत्तर केले की येथे यावे सर्व साहित्य त्याचे रवानगीचे करून देऊं नंतर लस्करास जावे खासा स्वारीही वद्य पंचमीस दाखल मोहुर्ते करून होणार आहे शंभुमहादेवचे नजीक आले आहेत चतुर्थी बहुधा थेऊरी होईल सत्वर यावयाची

योजना जालिया येक दुसरी मजल पुढे सापडेल * नानानी सांगितले त्यास परभार जावे परंतु यास विचारावयास सांगितले म्हणून विचारावयास येथून भवानीशंकर व बाजी बा स र वे ल पाा विचारले त्यास तुम्ही उदईक ज्ञानेश्वरी येणे १रवा यरवाडियास यावे विचार करून जेसे बनल तेसी सोय पाहून घेऊ सारांश येथे येणे तरी यावे **शामराव पोतनीस** आले मोरो **माधराव पेठे** घरी आले लोक येऊ लागले कलावे भेटीनंतर सर्व कलल हे आसीर्वाद

सेवेसी **सिवाजी कान्हो**[1] साा न(म)स्कार लोभाची वृद्धि करावी हे विनंती

---

**लेखांक ११** ( रायरीकर )

श्री

{ शक १६८६ ज्येष्ठ वद्य १
{ इ. सन १७६४ जून २४

तीर्थस्वरूप राजश्री **दादासाहेब** वडिलांचे सेवेसी

आपत्ये **माधवरायाने** चरणावरी मस्तक ठेवून साा नमस्कार विज्ञापना येथिल वर्तमान ताा छ २३ जिल्हेज मुकाम नजीक कोपल येथे वडिलाचे आसीर्वादेकरून सुखरूप असो विशेष वडिली पत्रे पाठविली ती पावोन लिहिला अर्थ सविस्तर कलो आला **धोंडो मल्हार** याजकडील कारकुनाने किला घेतला तेम्हा धोंडोबाचे संदर्भाने घेतला यात संशये नाहीं ते आपणाजवल आहेत आपणास पुसून घेतला किंवा न पुसता घेतला हे कलत नाहीं न पुसता घेतला म्हणावा तरी आपण शपतपूर्वक लिहिले त्यास तथ्य वर्तमान काय असेल तें लिहून पाठविणें जर आपले आज्ञे-सिवाय किला घेतला असिला तर परिछिन त्यास नजरबंद करून किला आचाचे हवाले करावा जर आपण आज्ञा केली असिली तरी आम्हासी तरी कृत्रीम करू नये म्हणून आज्ञा केली ऐसीयास जाला मजकूर पूर्वी शपथपूर्वक सेवेसी लिहून पाठविलाच आहे कचे वर्तमान वडिलास कलावे त्यास प्रथमता बेरड कृष्णातीरी आले त्याणी कित्येक आपले हालहवाल सांगितले आम्ही पुरातन वतनदार बहुना

* येथून पुढील सर्व अक्षर निराळें.

१ पेशवा नारायणराव याच्या खुनासंबंधीं ‘ शिरोपस्थ शिवाजी कान्हो ’ म्हणून ज्याचा उल्लेख येतो तो हाच. तो देशस्थ ब्राह्मण, उपनांव खळद्‌कर. खळद्‌-बेलस-ऱ्याचा तो राहणारा. खुनाचे आधीं त्यानें पेशाच्या लालुचीनें अनेकांस कटांत गोवून घेतलें.

दिवसाचे वतनी चाकर असता आबानी आम्हास दूर केले पोटास पावेनासे जाहाले उपासी मरतो त्यावरून आम्ही त्यास सांगितले कीं आम्ही प्रस्तुत मसलतसीर आहो तूर्त तुम्ही घरास जाणे स्वारीहून आल्यावर आबास सांगून तुमची सोये करून देऊ प्रस्तुत **सखारामपंत** येथे आहेत त्यास सांगता सोये निघाली तरी काढितो त्यास ते बोलिले कीं बापूस कलल्यास अबास कलेल ते आम्हास मारितील डोकी मारावयास चुकणार नाहींत याप्रमाणे कितेक हरद्द सांगितलें व काही पोटास मागितले त्यावरून त्यास खर्चास च्यारशे रुपये दिल्हे इतका प्रकार मात्र जाहला याचे कारण हेच कीं जुने पुरातन लोक दुसरेकडे जातील याजकरितां आशेस लावून ठेविले किला ध्यावयाची वार्ता किमपी त्याची नाहीं धोंडोबाचे कारकुनाने किला घेतला यामुळे त्यासही पुसिले ते बोलले कीं आम्ही त्यास किला ध्यावयास सांगितला नाहीं शपथ वाहिली आमचा दस्तयैवज निघाल्यास पारपत्य करावे कारकुनाने त्यास काय समजाविलें काय केले हे आपणांस ठाऊक नाहीं दुसरे कारकून आमचा किल्ल्यावर गेला तेव्हा आमचे सांगितले कोणारा प्रमाण वाटणार नाहीं आता चितास येईल ते करावे याप्रों ते बोलतात प्रथमता याचा कारकून किल्यावरि गेला हे वर्तमान आम्हास कलताच यास आम्ही दरबार मना केला व पुढे विसीष्ट काही करावे त्यास येथे **सखारामपंतानी** सांगितले कीं तूर्त आबू घेवू नये आबरू राखोन विचारे विचारे आपले कार्य करावे व आपलेही आज्ञेचा मार्ग पाहावा आज्ञा येईल तसे करावे खाली पत्रात नजरबंद करावे म्हणून आज्ञा आली त्यावरून उत्तम प्रकारे पारपत्य करावे हाच मनसबा केला परंतु सखारामपंत बोलले कीं किला कोठे जाणार आहे महिना दोन महिने आधिक आगले लागले तरी लागतील परंतु मनसुब्याने काम करावे दरबार मना जालाच आहे तेव्हा नजरबंद-दाखल आहेनच मातबर माणसास यापेक्षा अधिक काय पाहिजे त्यावरून थोरले पारपत्य तूर्त राहिले आहे गरम नरम समजून त्याजपासूनच हे गोष्ट जाली असली तरी विचारावरी येतील लबाडीच करून न आइकत तरी उसीर लागणार नाहीं याचा कारकून किल्यावीर गेला तेव्हा याजकडे मुद्दा लागलासा दिसतो त्यास कचा मजकूर वडिलास कलावा यास्तव लिहिला असे सारांश वडिलाचे मर्जीपेक्षा दुसरे आम्हास अधिक वाटावे तर कृत्रीम करावें त्यास वडिलाचे मर्जीसीच मजला दरकार आहे श्रेयस्कर कल्याण माझे त्यातच आहे हे मजला पुरते समजले आहे मी कृत्रीम वडिलांसी सर्वात्मना करणार नाहीं किला हस्तगत करावयाचे प्रकार केले आहेत व पुढेही रोजबरोज तेच विवंचनेत आहे किला घेवून आबाचे हवाला करावा हाच निश्चय आहे वडिलांनी निकडून पुस्तपना होईल तो करावा किला आम्हीच घेतला देवू न देवू येविसी बहुतास संदेह आहे त्याचा परिहार सांगितल्याने निशा पडत नाहीं किला हस्तगत होवून हवाला होईल

तेव्हा सरे वाटेल तसा कांही वडिलांचा प्रकार नाहीं वडिलांस जे मी लिहीन ते वडिलांस मात्र लटके वाटणार नाहीं व मीहि लटके सर्वथा लिहिणार नाहीं येविसी माझी खातरजमा आहे जाहाले वर्तमान कचे सखारामपंतास सांगितलेच आहे धोंडोवाचे व बाबा सरनाईक याचे गाव देसी असतील व वतन असेल ते कुल जफ्त करावे * सेवेसी श्रुत होय हे * विज्ञापना

---

**लेखांक २३** (रावगीकर)

{ श. १६८६ आषाढ वद्य ५
{ इ. सन १७६४ जुलै १८
( ता. १८ जुलै १७६४ )

पो छ १८ मोहोरम आषाढ वद्य ५ बुधवार

श्रीशंकर

† राजश्री चिंतो विठल उपरी आम्हास ईश्वराची आज्ञा कतिपय दिवस येथें राहावे ऐसी जाहाली आहे यास्तव मासपक्ष राहावेसे योजिले आहे कारभार तरी चालला पाहिजे यास्तव नाना व तुम्ही येके विचारे होऊन जलद चालावा ऐसी इच्छा आहे वास्तव तुम्ही नानाचे बिन्हाडास जाऊन त्यास खलाशाच्या च्यार गोष्टी समजोन सांगोन रसदा लोकर येत ते करणें मामा नासिकी आहेतच आबाजीही लहानसा मुसदी तेथें आहेच कारभार तरी व पावे ते केल्यास आम्हास बहुतच संतोष नाना तुमचा उपरोध बालगितात याजमुळें काम परिछिन चालत नाहीं तरी तुम्ही नानाचें आथवा मामाचे बिन्हाडी जाऊन तेथें नानाची जसी पाहिजे तसी खातरजमा करून दोघेही येकविचारे होऊन रसदा घ्याच्या निमे ऐवज चिरंजिवाकडे निमे फौज तोफा सर्व तुम्हास माहितगिरी आहेच उत्तर जलद पाठवणे आम्हास तेथें यावयाचा हेलपटा न देणें जोपर्यंत काम चालेल तेथवर चालवणे तेणेकरून आम्हास संतोष व तुम्ही नानाचे घरी गेलियाने तुमचेही थोरपणाचे आहे मुख्य आम्हास संतोष ते तुम्ही करावे कारभार आमचे लक्षान्माणें व्हावा आम्हास श्रम तरी न पडावा हे मर्जी आमची आहे तुमचे उत्तर आल्यासारिखे मासपक्ष येथे वास करू छ बुधवार प्रातःकाल

आबाजी माहादेव यासी लिहिला मजकूर चितात आणणे दोघाची गाठ पडून कारभार चाले ते करणे सारांश आमचा पूर्ण यख्तियार चिंतो विठलावर हे सर्वांस कळलेच आहे नानाकडे मातबर काही नाही चार रसदा देवणे हे काम त्यासच सांगावें तेही जपोनच करितील आपणास सुचेल ते त्यासच सांगावे त्याचे हातून चिंतोचानी करावे हे मर्जी आमची तुम्हीं या डौलामो होय ते करणे उभयतासही सांगोन करवणें दोघेही समंजस आहेत

---

* अक्षर भिन्न.

† सबंध पत्र श्री. रघुनाथराव यांचे हस्ताक्षराचें.

**लेखांक २४** ( रायरीकर )

शक १६८६ आषाढ वा १२
इ. सन १७६४ जुलै २५

श्रीशंकर

* राजश्री चिंतो विठल यासी उपरी **चिंतो अनंताकडील** सविस्तर मजकूर आइकिला आणि त्यास तुम्हाकडे पाठविले आहे व शिकेही पाठविले आहेत पत्रे तयार करून पाठवणे विचार तुम्ही **आबाजी महादेव** बसोन करीतच आहा चिंतो अनंतही बहुत इतबारी व आमचे कामाचे आहेत सर्व तुम्हास वाकीफगिरी आहेच लिहिणे नलगे आठा चहू दिवसी नासिकास देवास जाल ते दिवसी त्रिंबकराव ( मामा ) याचे ही घरी जात जावे सर्वांस राजी रक्षावे हेच थोरपण आहे तुम्हा मजकूर **त्रिंबक खंडेराव** यास तोफा देवविल्या आहेत त्या चांगल्या पावल्या पाहिजेत वाईट पावल्यास लढाई बिघडेल येविसी सेट्याजीस बहुत सागणे हुजूर सांगावयास फावले नाहीं जस्या त्रिंबक खंडेराव सांगतील तस्या याच्या घेणेप्रों सांगणें सातारियाचा बंदोबस्त उत्तम आपले हाती असावा कलल तसा करणे छ २५ बुधवार.

शिक्याचे पेटीची किल्ली देखील पाठविली आहे आपले जानव्यास बांधून ठेवावी आलस सहसा न करणे हैदराचे पारपत्य जाहल्यासिवाय चैन पडेनासे जाहालें बहुत सावध व बहुत वेळ कारभार तर्तुदच करावी हेच मोठी स्नानसंध्या सांप्रत आहे छ मजकुर गमाजीचा प्रकार व येशवंतराव पवाराकडील चाकरीचा प्रकार मनास आणून त्रिवर्ग विचार करून करावा येथेही विचार कलल्यावरी पत्रे होतील फार विचार करावा इमानही मुख्यत्वें राहावें

---

**लेखांक २५** ( रायरीकर )

शक १६८६ आषाढ वा १२
इ. सन १७६४ जुलै २५

* पुरवणी **चिंतो विठल** यासी चौकोनी मोहर येथे ठेविली आहे मागच गास पत्रे लिहिणे ते हुजूर चौकोनी मोहरेबद्दल पाठवीत जाणे येथे साल मोहर होईल देण्याशिवाय कारभार करू नये देण्यास हुजूर पत्रे पाठवीत जाणे खास दस्तुर ओलखून मग त्याप्रो पत्रे तयार करून शिके करून देत जाणे मखलासी तुम्ही लिहीतच आहा त्याप्रो लिहीत जाणे दस्तऐवजी कागद आथवा दिकतीचे कागद ते विना देखे होऊं न पावत किरकोल पत्रे कि-

* सर्व पत्र श्री. रघुनाथरावांचें स्वतःच्या अक्षराच.

कोल दस्तकें तेथेच देत जाणे परवानगीचा उजूर न धरणे लिहिल्या अन्वये कारभार करणे आमचे येणें लौकर होत नाही आमा जाहालियावरी अम्हीही येथेच आणणार रवाना बुधवार (पा) फारसी पत्र ल्याहाल ते नंदराम व मानसिंग दोघानी पाहिल्यास उतम पक्ष तरी हकीमजी तिसरा असावा छ मजकूर पत्रे पारसी अक्षरशाहा वाचावी हिंदवी मसुद्याप्रमाणें ल्याहावी हिंदवी मसुद्यावरि मंजूर करून घेत जावे व मसुद्यावर ल्याहावे की या मसुद्याप्रो अमक्यास पत्र व अमक्या पारसानिसाचे अक्षराने लेहविले येणेप्रो बंद असावे छ मजकूर

---

**लेखांक २६** (रायरीकर)

{ शक १६८६ श्रावण शुा १३
{ इ. सन १७६४ ऑगस्ट ९

श्रीशंकरवरद

श्रीमंत राजश्री **नाना**स्वामीचे शेवेसी उभयतांचे साा नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १० माहे सफर मुाा जनस्थान स्वामीचे रुपे करून येथास्थित असे विशेष आपण राजश्री **गोविंद माहादेव** यां समागमे पत्र पाठविले ते पावले हासीकडील पत्रें आपले कारकुनाची आली ती आपण पाठविली ते आक्षरशाहा पाहिली लेंकुरपण रावजीनी केलें सर्व प्रकारें आपले नावावर सर्व गोष्टी हे न समजता वेडेपण केलें त्यास आसो त्यासही जे गोष्टी निषेधाच्या कारकुनापासी त्याच सांगितल्या ताकीद पत्रेंही देविली आहेत देणें करून दिल्हे वरकड मजकूर यैवजाचा तरी राजश्री **विस्वासराव** यांजकडे यैवज काय पावला ते लेहून पाठवावें आणि तेथून वसूल लेहून आणावा वरकड मजकूर गोविंद माहादेव यांस जबानी सांगितला आहे हे आपणास सांगतील त्यावरून समजेल बहुत काय लिहिणे रुपा करावी गोविंद माहादेव यास लौकर मागती वाटेस लावावे हे विनंती यास आपणाकडे रवाना केलें याचा मजकूर पत्री तपसील काय लिहावा वास्तव जबानी सर्व सांगितले आहे हे सांगता कलो येईल हे विनंती पत्र पाहून लागलेंच फाडून टाकणें भलत्या बरोबरी भलताच निरोप न पाठवावा हे विनंती

---

**लेखांक २७** (**पारसनीस**)

{ शक १६८६ श्रावण वद्य ३०
{ इ. सन १७६४ ऑगस्ट २७

श्री

सेवेसी **सिवराम नीलकंठ** कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ताा छ २८ सफर मुकाम चांवडमनजीक उचनस्थान सुखरूप असो विशेष आपण

आशीर्वादपत्र पाठविले ते पावले लिहिला मजकूर सविस्तर कलला ऐसेंच निरंतर पत्र पाठवून बालकाचा सांभाल करीत गेले पाहिजे यानंतर इकडील मजकूर तर

राजेश्री त्रिंबक विनायक व **गोविंद सिवराम** ( व ) **चिंतो विठल** या त्रिवर्गास आपली पत्रे प्रविष्ट केली कलावे कलम १

राजश्री **त्रिंबक विनायक** याचे पत्राचे उत्तर अलाहिदा लाखोटा पाठविला आहे येऊन पोहोचेल कलम १

श्रीमंतांनीं आपले स्मरण दोन तीन वेळ केले होते आपणास पत्रही सरकारचे आले असेल

श्रीमंतांची खासा स्वारी भाद्रपदमासी वद्य पक्षात ... ... भले लोकास कागद पाठविले आहेत व तोफखानियाची तयारी होत आहे फार करून श्रीमंतांची मर्जी तोफखानियावर बहुत आहे कलम १

पागा मजकूरचे वर्तमान तर तीर्थ ... .... राजश्री तात्या निवेदन करितील ... ... कलू येईल कलम १

येणेप्रो वर्तमान आहे कलले पाहिजे ... ... ... य ... .... ... लिहिणे हे विज्ञापना

---

**लेखांक २८** ( रायरीकर )

{ शक १६८६ आश्विन वा ९
{ इ. सन १७६४ ऑक्टोबर १९

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री **चिंतो विठल** गोसावी यांसी माधवराव बलाल प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें विशेष तुम्हीं पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कलले इकडील वर्तमान तर धारवाडास मोर्चे लावल्याचें वर्तमान पूर्वी तुम्हास कललेच असेल प्रस्तुत मोर्चे खंदकावर आहेत या उपरी सत्वरच बुरुजास काम लागेल **हैदर नाईक** प्रस्तुत जडे अनवटीवरच आहे मीर फैजुला किल्याची कुमक करावी या इत्याद्याने झाडीचे सुमारे येणार म्हणून वर्तमान सावनूरचे आले आहे हैदरनाईकही त्याचे पिछावर येणार असेहा ऐकण्यात आले आहे प्रत्ययास येईल ते खरे किल्याचे वर्तमान तर किला जेर जाहाला आहे आत गोल्याचा तोटा आहे आता तांब्याच्या गोल्या येतात इतक्या उपरी ईश्वर दयेनें सत्वरच कार्य होईल आतील कानडे लोकही घाबरले आहेत परंतु आंत मीर फैजु-

त्याचा भाऊ मजबूद आहे यास्तव दम धरला आहे व दुसरे हैदरचे कुमकीची आशा आहे यास्तव दम धरला आहे कलावे प्रस्तुत वडिलांची मर्जी कसी आहे शरीर प्रकृत कसी आहे इकडे कधी येणार प्रस्तुत फौज गाडर्दी किती जमा जाहले आहेत तोफा लहान थोर किती जमा जाल्या आहेत हे काही लिहिले नाहीं हे काय गायकवाड कधीं येणार भोसले तर निघालेच असतील असे वाटते ते पिराजी नाइकाचे येण्याचा प्रकार काय तो लिहिणे भोसल्याकडील **गणेशपंत** वडिलाकडे आले आहेत त्यास त्याचे मते कड्याचे ठाणें हस्तगत करावे आणिखी कामे एकदोन त्यांची आहेत ती कलमे मोठीच आहेत व तुम्ही समजूनच करितील कड्याची गोष्ट तुम्ही राखून ठेवणे भोसले आल्यावर कडे त्यापेक्षा अधिक की काय ते आल्यावर सर्व होऊन येईल असे मोघम बोलून भोसले येत ते करावे कड्याविसी हरतरेने वडिलासी विनंती करून गोष्ट राखावी कड्याविसी भगवंतरायासी वच(न) आमचे गुंतले ते वडिलाचेच गुंतले असे व वडिलास युक्तिप्रयुक्तीने विनंती करणे प्रसंगी तुम्ही असता बाजी जाऊ नये जाणिजे छ २३ रबिलाखर (लेखन सीमा)

---

**लखांक १९** (पारसनीस)

शक १६८६ आश्विन वा। १२
इ. सन १७६४ आक्टोबर २३

श्री

श्रीमंत राजश्री **चिंतोपंतदादा** स्वामीचे सेवेसी साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २६ रबिलाखर भोमवार मु॥ धारवाड स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीकडील पत्रे छ ६ शुद्ध ९ राकर व छ १० राकर आश्विन शुध १३ व छ १२ राकर शुध १५ मु॥ पंचवटी येसी तिनी पत्रे छ २४ रबिलाकर आश्विन वा। ११ रविवार घटिका रात्रीस पावली सविस्तर अर्थ ध्यानांत आला श्रीमंत राजश्री **बापूनी** सारी पत्रे वाचून पाहिली श्रीमंताचे स्वदस्तुरची पत्रे आली त्यापासून थोडासा संतोष जाहला परंतु श्रीमंत राजश्री **आबा** जाईनात म्हणून श्रीमंतांची मर्जी क्रूर आहे त्यासी आबाचे लेकुरपण अथवा आरवाली सोसणे श्रीमंतावाचून कोण आहे येके दिवसीच ते कृपा करतील हे बापूही समजले आहे परंतु राग मात्र भरावे तथापि पुंदरामुळे दुर्लौकिक आबाचा जाहला आहे वडिलांनी जे मिळविले तितके सर्वस्व गेले त्यात बाहेरील मोगलानें अथवा आणखी कोणी किला घेतला असता तरी आबाकडे नाकर्तेपण येते घरातील फितुरांमुळे किला गेला व सावंदाचेही कृत्रिम त्यात तेव्हा काहीच इलाज चालत नाही म्हणून येक श्रीमंत गो **दादासाहेबाचा** मात्र आश्रय मागून होते तो त्याणीहि आबासाहेबाची ममता सोडून द्रव्याचा लोभ धरून कंसाच्या सांगितल्यावरून प्रथम राजकारणे केली लोका ......पैका गरीबागुरबाचा घेणार व किला सरकारांत घेणार तेव्हां तेथे

श्रीमंतापासी तोंड खाले करून जावे येसी कल्पना आबाच्या चित्तात येऊन जात नाहीं त्याहीमध्यें आबासाहेब तेथे जाते तरी श्रीमंतास याचीच ममता लागती परभारे राजकारणे न होती हेही खरे परंतु श्रीमंत राजश्री आबासाहेबावर व श्रीमंत राजश्री बापूवरी श्रीमंतांची पूर्वं कृपा हे जघन्य प्रिथिवीवर स्वराज्यात परराज्यात असतां श्रीमंत द्रव्याचा लोभ धरून उभयतांचा दुर्लौकिक करतात व गरीबगुरीबांचे द्रव्य घेणार याजमुले आपली मंडली गडबडली होती स्वदस्तुरची पत्रे आली त्यापासून थोडीशी स्वस्ता जाहली तथापि **कंसानी**[1] श्रीमंतांचे पत्र श्रीमंत राजश्री रावसाहेबास आले आहे की आम्ही कोलियास कौल दिल्हा त्याप्रों तुम्ही आपला देणे येसे वर्तमान येथे ऐकले श्रीमंतांनी पत्रे कांहीं बापूस दाखविली नाहीत व सांगितली नाहीत सांगितले असते तरी बापू नको अथवा द्या हे काहीच न म्हणते परंतु खावंदच चाकरासी कृत्रिम करू लागल्यावरी इतबारे इमाने चाकरी केल्याचे फल काय याकरिता मात्र बापु व सर्व मंडली उदास थोडीसी आहे तथापि बाहेर उदासता कोणीहि दाखवीत नाहीत लक्षहि टाकीत नाहीत येविशी निशा असो यावी सर्व समजले आहेत व चाकरी कोणेप्रकारे करितात हे परभारे कलेल अथवा श्रीमंत तेथे आलियावरी चवकसीही करितील तेव्हा निदर्शनासही येईल त्यानही लोफखान्याचे **भीमराव नारोपंत** याणी तो फार शर्थ केली वरकड हुजरातचे मंडलीपैकी **बाबूराव हरि** व **मलबा** यानीही शर्त केली वरकड राहिली हुजरात व **गोपालराव** याणी काय चाकरी केली तेही कलेल चिंता नाही रास्ते याणी तो हवेलीवरी राजश्री **विठल सिवदेव** याचे व मीरफैजुल्याचे युध्य जाहले तेव्हा कोणे प्रकारे केली ते पहिले लिहिले आहे विठलपंत तात्यानी फारच काम फाज केले मीर फैजुल्यास पिटून घातले हे वर्तमान परस्परेही आपण ऐकले असेल आमच्याच लिहिल्यावरी न जावे श्रीमंत **राजश्री आबाची** फौज कदापि जाऊ देत नाही जो पैका लागेल तो देतील परंतु सर्वथैव जाऊ देत नाहीत कालजी न करावी येव वर्तमानही आले आहे की आबासाहेबी पन्नास हजार रुपये व काही कापड रवाना केले मिरजपर्यंत आले आहे येसे वर्तमान ऐकिले आपले मंडलीची फौज कोणाचीही जात नाही गेली आहे तीही जमा होत चालली जीवा दारभ्य श्रम करून खावंदानी बरे म्हणावे म्हणून चाकरी करितात व बापूची आज्ञा तीच श्रीमंत राजश्री **दादासाहेबाची** येसे मानून चालितात परंतु येथील खावंद कोणी प्रकारे म्हणत नाहीत याचे मात्र वाईट वाटते खावंदानी सेवकवर कृत्रिम करावे हे कोठेही पाहिले नाही असो कालाचा महिमा विचित्र सर्वत्र श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या आगमनाचा............................................

............ ( पुढील मजकूर गहाळ )

---

१ त्रिंबकरावमामा

लेखांक ३० (पारसनीस) { शक १६८६ आश्विन
इ. सन १७६४ आक्टोबर }

श्री

श्रीमंत राजश्री चिंतोपंत दादा स्वामिचे शेवेसी साष्टांग नमस्कार विज्ञापना च्यार हजार रुपयाची हुंडी पाठविली ती पावली नकल करून आपणापाशी ठेविली आणि हुंडी स्वीकारली आस्विन वद्य त्रयोदशीस स्वीकारली आजपासून पाचवे दिवसी येवज घेऊ पुणियाहून हुंडी कृष्णाप्पाना बेटगिरी याणे लिहिली येथे वेंकापानाईक व नरसापानाईक बेटगिरीवरी आहे येवज घेऊन जसे कलेल व स्वामीचे मर्जीप्रा ठीक करितो हिसेब राजश्री अंताजीपंताकरवी करून घेऊन साशाचे हातचे दस्कत करून घेऊन पाठवितो वरकड हिशेब तयार जाहला आहे परंतु तालेबंद लिहावयासी फावत नाही आपण म्हणतील की काय उद्योग करितात खेलत असतील तरी शपत-पूर्वक खेलत नाही परंतु अष्टौप्रहर ढेलपाटे आहेत दर्शनांती विदित होतील पत्री कोठवरी ल्याहावे माणसाचे आद्रे व सरलष्कराचा हिशेब लवकर पाठविणे म्हणून राजश्री सोनोपंत दादाचे पत्र आले त्यावरून तयार केला आहे परंतु नीट लेहून पाठवितो सरलष्कराच्या हिशेबाचा गुंता पडला आहे कारण राजश्री अंताजीपंतास थोडासा ज्वर येत होता त्यामुळे त्याला यावयासी बनले नाही आता बरे जाहाले येतील रुजुवात करून हिसेब लेहून पाठवितो आपणाकडील पत्रे येतात ती तीनं वेल बापू वाचितात येका येकाक्षराचा अर्थ नानाप्रकारे कल्पना घेऊन करितात वास्तव्य सान्निध मोर्च्यांत बापूच्याच वाडियात नेहमी राहिलो सवा महिना लिहिणे राहिले उपाये काय म्हणून हिसेबास फार दिवस लागले धारवाडचे केवळ दो चौं दिवसावरी आले आहे मीरफैजुल्याचा भाऊ किल्यांत आहे तो पलून जाणार एकदोन माणसे रात्रीस पळून जातात ती मोर्च्यांवर सापडतात ती आतील बातमी सांगतात रात्री एकेक पळून जाणार बंदोबस्त तो चांगला आहे आज च्यारपाच दिवस गोली आतील वाजत नाहीं रात्री मात्र गस्ती आतून करितात आजपावेतो हैदर नाईकाचे कुमकेची वाट पहात होते परंतु येत नाही आता घाबरे जाहले आहेत कलावे म्हणून लिहिले असे मोर्चे उठविले म्हणजे चौ दिवसी हिशेब तयार करून सातरियासी पा॥ कित्येक प्रकार लिहिले बापूची मर्जी बोलावयाची नाहीं सोबत्याक्सी त्याचे वतन व त्याचे निसबतीचा रोजमुरा व वाडियांतील मोईन यावी येसी सांगतात त्यांतील अर्थ की श्रीमंतास सोबत्याचा लोभ फार आहे श्रीमंत राजश्री दादासाहेब आल्यावरी कसा लोभ म्हणतील वास्तव दादून श्रीमंताचा निरोप ऐकून त्यांशी मोकले करिवतात यात काही वाईट न मानावे श्रीमंत येताच आधी सोबत्याचे पारपत्य करावे हाच मनसबा बापूचा आहे व नेटाने कारभार करणे हक याचाच आहे मी भियत नाहीं तव पुढील

कर्तव्याविसी नेट फार चांगला आहे काळजी न करावी आपली दोन्ही पत्रे सरलस्करच्या मजकुराची आली ती त्यासी दाखवावी म्हणून आज्ञा त्यासी लिंगोपंत सध्या कारभार करितात येक महिना जाहला अंताजीपंती अंग काढिले तेच हरोळ जाहले आम्हाकडे येणे अथवा हरयेक मनसबा करणे रूढीस लिंगोपंत पडिले आहेत भगवंतरावास समागमे हिंडवितात परंतु आतील बारीक मोठे त्याला कळू देत नाहीत जितके कळते तितके आम्हास सांगतो आमचा लग करितो म्हणून त्याजवरी राग आहे यास्तव पत्रे दाखविली तरी लिंगोपंतास ते सांगतील यांत संशय नाही लिंगोपंत सोचत्यास सांगेल यास्तव दाखविली नाहीत मारनिलेने कारभारात न यावे याचे साधन केले आहे पुरता निश्चय जाहला म्हणजे पत्रेही दाखवू व फजीत करावयाविसी बाकी ठेविली नाही परंतु गुण जात नाहीत पत्रे दाखवितो कलावे राजश्री नारो शंकर याचे पत्र देऊन माघारे घेऊन फाडून टाकिले त्याचे उत्तर लखोटा निराळाच आहे पत्रात खाले नाव लिहिले नाही पोष्ये साष्टांग नमस्कार म्हणून लिहिले आहे राजश्री विठलपंत तात्या सावनुरी आहेत त्याचे चिमणाजीपंतास बापूकडे बोलावून आणून पत्र त्याजवल बापूनी करार केला की माघारे चवथे दिवसी आणून यावे ऐसे करून दिल्हे आहे माघारे आले म्हणजे फाडून टाकू सरलष्कराचा हिशेब व्याज व हुंडणावळ ठीक करितो अंतर पडो देणार नाही व येवजही लोकांचा देणे आहे तो वारून टाकू बाकी राहील तो महिना पंधरा दिवस पुरवू सरकारचे चार हजार रुपये आम्ही त्याला कळू दिल्हे नाहीत परंतु सोच-त्याने मागेच सांगितले होते जे सरकारातून पाच हजार देविले त्यावरून (पुढील बंद गहाळ)

---

**लेखांक ३१** (पेशवा दफ्तर)
पे॥ छ १२ जमादिलाकर मार्गशीर्ष मास
शके १६८६

शक १६८६ मार्गशीर्ष शु. ३
इ. स. १७६४ नोवें. २६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **बालाजी जनार्दन** स्वामी गोसावी यास पोष्य **रघुनाथ बाजीराव** नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत आणे विशेष दि॥ राजाराम गोविंद याजकडील हशमी लोक तुम्हाकडे पाठविले आहेत आसामी ३८६ तीनसे शासी तैनात दरमाहा ३९९ चा प्रमाणे रोजमरा दीडमाही रुपये २६६१॥॰ सवीससे साडे एकसष्ट या प्रो केला जे येथे हजीरीस लागले त्याचा पट नावनिसीवार अलाहिदा आहे यासेरीज तीनशे शासी प्रो केला राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** याजबरोबर गेले आहेत ते आल्यावर त्यांची नावनिसीवार हजेरी राजाराम गोविंद याचे विद्यमाने राजश्री सर्वोत्तम शंकर

घेऊन आकारतलि त्यास व मशागनिलेकडील दिमतीचे स्वार २५ पंचवीस यास दर राऊती दरमाहा रुपये ३० प्रमाणे राऊतांची हजेरी घेऊन नीममहा राऊतास व हशमी लोक यास दीडमाही रोजमरे यास साठ हजार प्रो ऐवज नेऊन देणें तूर्त ऐवज तसलमातीस लेहून देणें स्वाराची नावनिसीवार जाबता अलाहिदा पाठविला आहे हशम लोकांचा नावनिसीवार जाबता मागाहून राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ याचे विद्यमाने हजीर होऊन तैनात व रोजमरा करार जाहला आहे त्याप्रो नेमणूक जाबता येईल त्याप्रो हजेरी घेऊन रोजमरा देत जाणे रा छ २ जमादिलाकर सन खमस सितैन मया व आलफ

---

**लेखांक ३१** ( रायरीकर ) { शक १६८६ / इ. सन १७६४ }

श्री

विनंती उपरी आपण चिठी पाठऊ नये म्हणोन सूचना केली ती प्रमाण परंतु हल खाली माणूस चौकस विश्वासूक येक दोन तीं दुखण्याने पडली वर्तमान तर परस्परे कलले पाहिजे यास काय करावे जसी युक्ती सांगाल तसी करूं अलीकडील मजकूर येथील अमचे यजमानाची मर्जी की आधी अमची नेमणूक करून देऊन फारखती करावी मग दतक घ्यावा त्याजवरून चकारपूर्वक दरबारी गेले होते त्यानी उतर केले की बापूसच घेऊन यावे समक्षच काय सांगणे ते सांगू त्याजवरून हे उदेक अथवा परवा जाणार दोन्हीकडे जाणार आसे आहे या सेवटचा समय या वेलेस त्याचे मतलबाप्रमाणे दरबारीहून जाले म्हणजे आमची दुर्दशा जाली असो आपल्यास वर्तमान कलावे आपण प्रयत्नांत आहां त्याचे कसे जाले हे सायंकाली समजावें असा बेत होता काही जाले असल्यास समजले पाहिजे व प्रयत्नही निकटानें जाला पाहिजे हतक्यावर अमचे दैव राजश्री विनायकपंती **राघोबादादा**कडे जाऊन याप्रो बेत जाला म्हणून सांगावे आणि दादास माझा निरोप सांगावा या वेलेची बाजी मारल्यास थोर उपकार घडेल हे दोन्ही उद्योग जरुरीचेच आहेत **विनायकपंताचे** मातुलासही वर्तमान करून त्याचे उतर समजले पाहिजे व त्याची कल्पना व त्याचा हिसा न जाल्यास करावा हे विनंति चिठी वाचून फाडीत जावी ते दिवसीचे यादीप्रो थोरली याद पाहिली ती माघारी पाठवावी अथवा फाडावी

---

**लेखांक ३३** ( रायरीकर )

शक १६८६
इ. सन १७६४

श्रीशंकर

विनंती उपरी आपण **रामचंद्र भाऊस** बोलाविले त्यास अद्यापपर्यंत बाहेरून आले नाहीत आल्यावर पाठऊ निकडीचे काम थोडेबहुत असल्यास चिठीत लिहून पाठवावे मग तपसीलवार बोलणे तें संध्याकाळी ओंकारेश्वराचे देवळी गाठ पडून बोलू रात्रीस तात्याकडे गेलो तेथे वर्तमान जाले त्यांतील अर्थ ही गोष्ट केली ही भिडेमुले मर्जी राखणे प्राप्त फाड ( शा ) करावयाची गोष्टही नूर्त भिडेपुढे होणे अवघड तुमचा बंदोबस्त करून देणे तो आतासी सांगत नाही नाना व आम्ही बोलून मग सांगणे तसे सांगू स्वस्थ असावे चिंता न करावी इतके त्याचे भाषण जाले आमचे म्हणणे सेवटपर्यंत हेच पडत गेले की अशी गोष्ट ज्या पक्षी.......आपले मर्जीस येती तेंव्हा उपाय नाही सेवट विचार आमचा हाच की आपले पंगतीस घेऊन जेवीत जाऊ परंतु हे ठीक चितास वाटत नाही आपण लोटून याल तरी जाणार नाही इतका प्रकार जाला तों चिमणाजीपंत अले मग ते तेथे राहिले आम्ही उठून आलो तेथून **चिमणाजीपंत** रागानेच आम्हाकडे रात्रीस आले रागाची भाषणे बोलले आम्ही यकच उतर केले की वडील तुम्ही आहात उचितास येईल ते करीत आंहा व पुढेही करावे याप्रो व्रत जाले पुढे **श्रीमंत नानाची** मर्जी हाती येणे व तात्याची मर्जी प्रसन्न होणे याचा प्रयत्न असावा आणि तात्याकडील बोलण्यास राघोबादादास विनायकपंती जाऊन चिटकोपंत हे मिळून भीड घालून **राघोबादादा** मान घालीत अशा मर्जी आपले कामावर पडे असी करीत ते घडावे चिठी वाचून शफतपूर्वक फाडावी

---

**लेखांक ३४** ( पेशवा दफ्तर )

शक १६८६ माघ
इ. सन १७६५ फेब्रुवारी

( पहिला बंद गहाळ. पान दोनवरचा मजकूर खालील प्रमाणें )

···पोहोचलो पश्चात गडबड फार जाहाली म्हणून सांगत होते व **त्रिंबकराव** देशी राहिले त्यास कर्नाटकांत स्वारीस सामील व्हावयाविसी हमेश पत्रे सरकारची जात असत परंतु ते आले नाहीत उतर मात्र लेहून देत परंतु आले नाहीत हेही सांगत होता **हैदर** नाइकाची खंडणी जाहली नाही आठ पंधरा रोजी होणार होती हे वर्तमान जाताच तो अर्थ राहिला **मुरारजी** मातबर आहे तेही निरोप घेऊन जाणार वरकड सर्व आपली फौज आहे फौजेचा सुमार तर हजार बुनगे बहुतच आहे म्हणत होता याप्रो आहे आपली तो लष्करची लोकच बसली असेल ...........

**लेखांक ३५** (पारसनीस)

{ शक १६८७ ज्येष्ठ वा।३
{ इ. सन १७६५ जून ६

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री **अन्यास्वामीचे** शेवेसी पोष्य **त्र्यंकटराव मोरेश्वर** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती जे येथील क्षेम ता। छ १६ माहे जिल्हेज मुकाम नजीक येदलाबाद ( जाणून ) स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष आपण कृपा करून पत्र पाठविले ते उत्तम स-ई पावोन परम समाधान जाले ऐसेच निरंतर पत्री संतोशवीत जावे येथील वर्तमान तर राजश्री **जानोजी भोसले** सेनासाहेब सुभा गंगा दक्षिण तीरास आले त्यास श्रीमंताचे लष्करांत **बाबूराव रायाजी** वकील आहे त्याणे वगैरे वर्तमान बातमी यासी लिहिली कीं श्रीमंत पेशवे दग्यावर आहेत तुम्ही भेटीस येता म्हणून येथे बातमी आहे तर हे दगा भेटीच्या वेलेस करतील चुकनार नाहीत भेटी घेणेच तर बहुत तजविजीने घ्यावी नाहीतर भेटी घेऊ नयेच तुम्हाजवल तीस हजार फौज आहे म्हणून बातमी यासी आहे त्याजवरून यासी मोठा दबाव पडला आहे आपण न यावे गंगा अलीकडे असाल तर पैलतीरी जावे फौज जे आहे ते राहू द्यावी आणीक बनेल तर ठेवावी हे छावणीपाणी त्याच प्रांती होईल तर सावध असावे पेशवे यांचा इतबार धरू नये हे तुमचे पाठीवर येतात त्या पत्रावरून दुसरे दिवसी प्रातःकालीच कुच करोन गंगा उतर तीरास आले वालकुंड व येडगडप वगैरे माहालच्या याणी खंडण्या घेतल्या **मुधोजीबावास** तीनच्यार हजार फौज देऊन चेनुरास पाठविले चेनूर जबरदस्त आहे या अगोधर नानाजी कृष्ण शेणवी दोन हजार फौजेस पाठविले होते चेनूर येकनासे जाले ते(व्हा) मुधोजी बावास रवाना केले आहे मग पहावे हे जाऊन काये करतील हे न कले परंतु या दिवसी चेनुरची मुलुखगिरी कठीण निमे आले तर मोठे भाग्य आहे आता हे नागपुरास जाणार नागपुरी आठ दिवस राहतील तदनंतर कूच करून पावसालातच आमनेर किलियातच छावणी करावी श्रावणमासी बाहेर निघावे ते अवरंगाबादेस श्रीमंत बाहेर निघाले नाहीत तो आडवे व्हावे एकदा झटपट बरीच द्यावी मग ईश्वर ज्यास ( यश ) देईल तो घेईल या अर्थावर हे कायम आहेत त्यासी श्रीमंत दैववान आहेत चिंताच नाही परंतु श्रीमंतानीही पुणियात राहू नये श्रावणमासी जालल्या इतके याचे तरी उत्तम नाहीतर उत्तम नाही याणी इसमाइलखान पन्ही याचे विद्यमाने मोगलासी सख्य पहिल्यापासून राखलाच आहे वराडची सुभेदारी **इसमाईलखानाकडून** कराविली आहे इसमाईलखान याजकडून नबाबापासी ... ...जमीदार जाले आहेत मध्येस्ती मारनिलेची हे विकट आहे हैदरनाईकाकडे यांची पत्रे जातात पुढे फितुर मातबर आहे श्रीमंत याचा बंदोबस्त जलदीने करतील तर उत्तम नाहीं तर कठिण ( लागे ) श्रीमंतानी ऐक

महिनाभर पुणियात रहावे मग बाहेर निघावे गंगा उतरून अलीकडे येऊन फौज जमवावी नाहींतर कठीण ( लागे ) स्वामींनीं ही सला ध्यावी नागपुरास गेलियाउपर याजपासी फौज चार हजार राहील याजकडील पथके कारांडे तर येद्दील आहेत फार आले तर हजार नानाजी कृष्ण तर चिलकुल नाहीं येक **संकराजी घोरपडे** व **लक्ष्मणराव पाटणकर थिराजी नाईक** मिळोन फार जमा जाले तर साहा हजार सात हाजाराबाहेर निघालीया उपरी मग जमा होतील जो पावेतो हे वराडात आहेत तोच बंदोबस्त जाला तरीच ताल बनेल नाहींतर बनणार नाहीं नागपुरास गेलीया उपरी साध्यंत लिहून पाठवून देऊ याचा इतबारांतील कुणी नाहीं हे दम्यावर आहेत येथे फुरंधर कोळी व **भवानजी जाधव परळीकर** येथे आहेत पुढे फार मन-सुब्यावर आहेत स्वामीस कळावे श्रीमंत येजमानानी सावध असावे कोन्हेचा इतबार येकंदर न धरावा हे मूळथाप आहे आम्ही लिहू उतराई जालेवर या धणीयाचे मरजीस येईल ते करावे आम्ही सेवक आहोत फार काय लिहिणे कृपा लोभाची वृद्धि करावी हे विनंती

राजश्री सोनोपंत काका स्वामींचे सेवेसी साष्टांग नमस्कार विनंती जे लोभ करावा लि( खि )त ध्यानास आणावे हे विनंती

---

**लेखांक ३६** ( पेशवा दफ्तर )
रा। छ २१ जिल्हेज

शक १६८७ ज्येष्ठ वा। ३
इ. सन १७६५ जून ६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **अंबादास बलाल** स्वामी गोसावी सेवक **नारो कृष्ण** साष्टांग नमस्कार विनंती विशेष उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष प्रांत म्हसवे प्रा। टोकडे प्रांत खानदेश हा माहाल राजश्री **त्रिंबकराव-मामा** याजकडे सरंजामात आहे आपली फौज पांडुरंग गोविंद वगैरे बुराणपुराहून येता त्या माहाली घासदाणा चिनी व किरकोळ मनमाने तैसा उपद्रव दिल्हा म्हणून बोभाट आला याचे कारण काय जे त्या मार्गे आले असतील त्यासी या जाबछडाची पुरसिस करून सरे भरपीट देईल घेतले असेल त्यासुधा चौकसी करून लेहून पाठविणे त्याप्रो। ज्याणी घेतले असेल त्याजपासोन घेऊन त्याजला देणे लागेल नाहाक उपद्रव देऊन लचाडी केली आहे त्याजला परिछिन्नवादे पुसोन लेहून पोत्या उपरी याचे निसबतीचे महाली येकंदर उपद्रव जालियास व बोभाट आलियास कार्यात पडणार नाहीं सर्वांस उत्तम रीतीने ताकीद करणे व आणखी सरंजाम माहाल निसबतेस आहेत त्या माहालाचा बोभाट येऊ न देणे या कामास खूजर जासूद पाठविला आहे तावडतोब चौकसी करून लिहून पाठविणे त्याजप्रो। देईल

पहिभेट बा। ऐवज देणे लागतो आठ दिवसाचा आम्ही वाइदा केला आहे पारीछिन्न अंतर न करणे जलदीने उतर व यादी अलाहिदा पाठविणे ११ छ १६ जिल्हेज सन खमस बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती

---

**लखांक ३७** ( पारसनीस ) { शक १६८७ ज्येष्ठ वा। ३ इ. सन १७६५ जून ६

श्रीलक्ष्मीकांत

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **वेंकाजीपंत आन्याजी** स्वामीचे शेवेसी पोष्य **रामाजी बलाल** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तारीख ता। छ १६ जिल्हेज मु। गंगा उतर तीर मु। येदलाबाद परगणा जाणून आपणाकडील कुशल लिहावे विशेष आपण छ ७ जिल्कादचे पत्र पाठविले ते मुकाम मजकुरी छ १२ जिल्हेजी पावोन लिहिला मजकुर कलोन समाधान जाहाले राजश्री सेनासाहेब सुभा मोहो खमसवाडीच्या मुकामीहून माघारे नागपुरास जावयास फिरले तो मजकूर पेशजी लिहिला आहे त्यावरून निवेदन जालेच असेल सध्या बालकोंडा वगैरे परगणे येथील थोडा बहुत घासदाणा याणी घेतला चेन्नुरास राजश्री **नानाजी कृष्ण कारांडे** गेले होते त्यास तेथील काम न होय म्हणून राजश्री **मुधोजी भोसले** पाचसात हजार फौज घेऊन गेले आहेत थोडेबहुत कार्य होईल चेन्नुर अवघड आहे नबाब कृष्णा उतरतीरास आला हैद्राबादेस आलाच असेल त्याचा वसवसा यास आहेच यास्तव गंगा पूर्ती भरे तावत्काल हे गंगे आसपास आहेत फौज फुटो देत नाहीत गंगा भरली म्हणजे वराडच्या लोकास निरोप देऊन चारपाच हजारांनिसी आपण नागपुरास जातील राजश्री पिराजी नाईक बालकोंडा परगणा इकडे राहिले ते वसमतेकडे जातील सुभेकर आंबेबादापुरी राहिले श्रीमंत कपाटसंगमावर आले मजल दर मजल पुण्यास जाणार म्हणून इकडे पत्रे आली श्रीमंत पुण्यास गेले नबाब हैद्राबादेस आला हे नागपुरास जानात पुढे काय मनसबा होईल तो ईश्वराधीन मी श्रीमंतास विनंतपित्रे पा। आहेत उतरे येतील तसी आज्ञेभो इकडे राहणें किंवा येणे घडेल बाईच्या देशमुखसि आपण आहो चिंता न करणे म्हणोन लि। तर आमची ममताच आपल्यास आहे तेथे अधिक काय लिहावे जेसे जाणाल तेसे कराल हा भरवसाच आहे कृपा केली पाहिजे हे विनंती

---

**लेखांक ३८** ( रायरकिर )

शक १६८७ भाद्रपद वा॥ ३०
इ. सन १७६५ सपटेंबर १५

श्री

श्रीमंत राजश्री **नाना**स्वामीचे शेवेसी विनंती सेवक **अच्युतराव गणेश** साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २८ रावल मु॥ नजीक कसबे जावद प्रां मेवाड स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष सांप्रत स्वामीकडून पत्र येऊन परामर्ष होत नाहीं तर येसें नसावे सदैव कृपापत्रीं सेवकाचा परामर्ष करावा इकडील वर्तमान तर सरदारीत बहुनायकांचा प्रकार येक कोस्याचे मामलतीस दोन अडीच मास लागले लोकांचा गवगवा वारला नाहीं आम्ही नवे लोकाचे देण्यास गुंतलो त्यासही जागा नाही येसा प्रकार पाहिला मारवाडची मामलत राजश्री पाटील-बावाचे रुबरु जाहाली होती परंतु तिकडे फौज गेल्यासिवाय पैका कसा येतो यामुळें राजश्री **पाटील बावा** दाहा हजार फौजेनसी राजश्री सुभेदाराकडे गेले आम्हास पाच सा हजार फौजेनसी मारवाड व उदेपूर जैपूर वगैरे या संस्थानाकडे पाठविले पुढें हजार स्वारानसी राजश्री **खानाजी जाधव** यांस रवाना केले होतेच मागाहून आम्हीही इकडे आलो इकडे आल्यानें मालव्यांतही शह आहे व उदेपूर मारवाडच्या मामलती चुकोन पैका येईल येसा प्रकार आहे समागमे पथके **येशवंतराव वाबले** व नानाजी खराडे व **मानाजी सिंदे** व राघो देवाजी धायगुडे व राघो केशव व फालके व किरकोळ पथकें व पागा मिलोन सा हजार फौज आहे येशास हे लोक आपले मायेचे आहेत आपल्या लक्षासिवाय नाहीत येविसी त्यांचीही पत्रे स्वामीस आहेत त्यावरून कलेल देसी यांचे घरी श्रीमंतानीं चौक्या बसविल्या आहेत यामुलें लोक सारे श्रमी आहेत यास्तव श्रीमंतास विनंती करून याचे घरच्या चौक्या उठत तो अर्थ केला पाहिजे वरकड उदेपूरचे वकील आले आहेत मामलतीचा दारमदार होत आहे लौकरच ठराव होईल येथील गुंता उरकून दोन चार मजला मारवाडच्या सुमारें गेल्यावर तेथीलही पैका करारापमाणे येईल श्रीमंत हिंदुस्थान प्रांते येणार म्हणोन वर्तमान आहे त्यास श्रीमंतांची स्वारी येईतों पावेतो आपला कर्जाचा गुंता उरकून गला मोकला करितो झांसीकडील प्रकार तर वोडशाचा राजा मृत्य पावला राजश्री सुभेदारही त्या प्रांतास आहेत राजश्री पाटिलबावासही बहुता प्रकारें झासीचे कार्याविसी सांगितले आहे त्यास या दोही फौजा येकत्र जाल्यावर सहजात कार्य होऊन येईल इतक्यात आम्हीहि इकडील गुंत उरकून त्वरेने त्याजकडे जाऊन स्वामी कार्य होऊन येई तो अर्थ करितों कलावे ( अक्षर निराळें ) सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

( लेखांक ३९ ( अ ) ( रायरीकर ) { श. १६८७ इ. सन १७६५

श्रीशंकर

* राजश्री चिंतो विठल उपरी त्रिंबक खंडेराव व जयवंतराव मिलोन पाउणसे जंबुरे घेतले परंतु माझे मनांत शंभरपर्यंत खेरीज तोफा जंबुरे करावे ऐसे आले आहे तरी पंचवीसं जंबुरे खरेदीस सेर गोल्याचे व दोन तोफा थोर लंब छड पाच सेर सात सेर गोल्याचे येकूण सतावित्साचा कारखाना महिपतरायास सांगावा दोघांचे कारखानियास दोन अडीचपर्यंत लागतील तैसे आणीक पनास हजार खर्च कबूल तीन लक्ष तोफाचेच तयारीस लावावे पनास हजारासाठी मागेपुढे न पाहाणें जर महिपतरायांनी कबूल केल्यास खामखा तिसराही कारखाना करणे तैसेच बाणदार दोनसे तीनसेपर्यंत हिकडील तिकडील मिलोन ठेवावे तुम्ही म्हणाल की इतके बाणदार कशास पाहिजेत बाण थोडे आहेत त्यास आम्हास येका दोहो निदान तीन लढाईत फेसला करणे तेव्हा फार बाण येकानेच सुटले पाहिजेत तोफखानियाचा तिसरा कारखाना असावा ऐसे मनात आले आहे तुमचे युक्तीस आल्यास करणे मुख्य महिपतरायानी कबूल केल्यास खामखा करावें जंबुऱ्याचे तयारीस बहुत श्रम लागत नाहीं लौकरच होईल दारू चांगली शिश्याचे गोले असे सामान दोहो कारखान्याप्रमाणे जाहाले पाहिजे दोन तोफा सांगाव्या त्याची तयारी जाहाली तरी बरे न होय तरी नलगे जंबुरे मात्र चार थैली सहा थैली आठ थैली याहून अधिक नाहीं याप्रो वरचेवरी तयारी होईल पनास हजार चालीस हजार रुपये अधिक लागले तरी लावावे पहिल्या हिसेबप्रो म्हटल्यास तीस हजार पसतीस हजार पुरेत सरासरी दर जंबुरेयास हजार रुपये तयारिस पुरेत ऐसे वाटते परंतु याचा कारखाना केवल नवा येथे सामान काहीच नाहीं सारे सामान नवेच यास्तव पाचसात हजार जाजती लागले तरी कबूल निदानी पसतीस हजार चालीस हजारा अलीकडे तयारी होईल जंबुरे कोठे म्हणाल तरी पुणे व अशेर दौलताबाद नगर चोही जागीयातून भरती होईल परंतु चांगला जंबुरा पाहिजे पंचरसी असो आथवा बिडी असो परंतु वाईट व मध्यम कामाचा नाहीं परीक्षेचा पाहिजे सारे मिलोन शंभराची भरती करावी व होईल श्रीइच्छेने इतक्यासही पोटास मिलेल पसतीस हजाराची कालजी न करणे अजगरका दाता राम हा दृष्टांत आहे. द. खु. रुजु.

---

* सर्व पत्र रघुनाथरावाच्या हातचें.

लेखांक ४० ( पारसनीस )

{ शक १६८७ आश्विन
{ इ. सन १७६५ ऑक्टोबर ।

( पहिला बंद गहाळ )

सर्व अर्जुदा आहे कोन्हास कवडी दिल्ही नाही मात्र विजये दशमीचे पोशकी पांघुरने दिल्ही आनखी त्या प्रांती अफवा आहे की चालीस हजार फौज ठेविली त्यास पूर्वी नेमणुकीसिवाये अधिक कांहीं नाहीं पूर्वीप्रमाणेच आहे परंतु दोन विचारावर बसले आहेत की मोगलाचा व याचा तहरह जाहला तर त्या प्रांतियाचेच कदाचित निकडील तहरह न होये तो सरकारचा तहरह करावा परंतु जीव नाहीं कदाचित सत्वर या पंधरा दिवसात फौज सरकारची नगरापावेतो खासे डेरे होऊन आणखी पथके लोक पैठण परियेंत तुरुत येतात तर आज हे घाबरे होऊन भेटीस येतोये तुरुत फौज याप्रो अर्थशाहा न पावला तर हे दोन्ही तिन्ही विचारात आहे बंदोबस्त जाहालिया उपर पुढे कठिणच ............ फार श्रमी आहे की फौजेचा गवगवा दुसरे मोगलाकडील तिसरे आपल्याकडील यास्तव सुस्त होऊण मोहगम बैसला आहे डेरेही बाहेर केले नाहीं मात्र आश्विन वदि पंचमीस डेरे देव ......... करून ठेविला आहे पहावे देतो की नाहीं परंतु तुरुत जर फौजा याप्रमाणे पावतात तर खंडणीही देतो भेटतो मुलूख सर्व गडबडले आहे व आणखी कितीक प्रकारची खातमी राजश्री **व्यंकटराव मोरेश्वर** याणी लिहिली आहे त्याजवरून विदित होईल व जैनगर राजे याचा वकील येऊन बैसला आहे तोही यासीं मिलतोये त्यास सरकाराकडीलही आभये त्यास पूर्वी मारनिलेनी दिल्हा आहे त्यास हली महाराजानीं त्याचे नावे आभयेपत्र समधानीचे पाठवावे म्हणजे ते इकडील भरात विसरेल व कराडे यासही पत्र द्यावे म्हणजे याचे फौजेत फितुर होतोये आज सरकारचा भारी याजवर पडतो आणि जिवात फार यह आनला आहेराजेश्री **रामाजी बलाल** महाराजाचे चरणाजवळ आले आहेत तर कितीक वर्तमान सेवेसी विनंती करितील त्यास आपण याजीवर न ठेवावे ज्याप्रो देवाजीपंतानी सांगितले आहे त्याप्रमाणे सेवेसी विनंती करितील परंतु याचे रुपये खाऊन बंधु जाहले आहेत राजश्री **देवाजी पंत** जबानी माया ............ ममताची गोष्टी सांगतो आज पोटात कितीक प्रकार आहे देवाजीपंताचा मजकूर की श्रीमंत ———— **दादासाहेब** जोवर या प्रांती आहेत तोवर वकील जाऊन येऊन मायाममता अशु द्यावी आन साहेब **हिंदुस्थानाकडे** गेले म्हणजे जागाचा जागाच ठाणे उठवावे आन मुलखात धुमधाम करावी आम याचे चितात पुरते आहे ते सेवकानी पुरते शोध घेऊन सेवेसी विनंती केली आहे मागाहून राजश्री **निलो गोपाल**ही सेवेसी पाठवनार आहे तर आपण रामाजी बलाल अथवा निलो गोपाल याचा कोन्हाचा विश्वास न धरावा निलो गोपालही बापुराव

रामजीचे कारभाराप्रमाणे येथे आहेत ज्याप्रो देवाजीपंत सांगतात त्याप्रोच आहे काही सरकारचे कामगिरीवर दिष्ट नाही जेथे तेथे सरकारची कुटाळी व हीनपन सांगतात ऐसे याचे सांगतील यावरून राजश्री **जानोजी भोसले** यात जीव आला आहे लोक सर्व आजुर्दा आहे यास्तव सेवेसी विनंती की जरूर पथके फौज दहा बारा रोजामधी पैठण अथवा टोके या प्रांती सत्वर येऊण शाहा दिल्हा म्हणजे आता येऊण भेटतो दहा बारा हजार फौजच असली तर हली काम होईल लोक जागोजागाच बसले आहेत व **बुऱ्हाणशाहाराजा** देवगडप्रांतीचा राजा हे राजश्री **वेंकटराव मोरेश्वर** यासी बोलने केले आहे त्यास स्वामीचा आश्रय पाहिजे स्वामीने दोन हिसे सरकारात घ्यावे आन तिसरे हिसे राजयास यावे यसी सिद्धान्त जाइला आहे हे किले देवगड वगैरे सर्व सरकारात येतात याजविशी मोहगम आभय-पत्र राजेचे नावे पाठवावे सर्व जाबसाल मारनिलेनी आम्हास माहीतगिरी करून मुकाबिले दिल्हे कामकाजे घडून येतील पत्रास दिरंग न करावा व राजेश्री वेंकटपति व राजश्री **कोन्हेरराम** यासही उभयेतास आपल्या सरकारात चाकर ठेवावे आज याचे बरोबरचा देवगड प्रांतीचे बंदोबस्त करावे त्यासही अभयपत्र येक पाठवावे पत्रे बिा सुमार

आभयपत्रे पाठवावे

| | |
|---|---|
| १ माधवसिंग जैनगरचे १ सवाई | १ राणोजी करांडे |
| | १ वेंकटपति व कोनेरराम |
| १ मिसीर जीवनराम यास जाब पाठवावे १ | राजे बुऱ्हानशाह नागपुर |
| ३ | |

५

सदरहू पाच ( पत्रे ) महाराजानी कृपा करून सत्वर पाठवावी म्हणजे कितीक प्रकारचा कामकाज घडून येतो व आपला सरकारचा बंदोबस्त मोगलाकडील लागला आहे तर महाराजानी हरप्रकारे बंदोबस्त करावा आज त्यास येक वेळ झपाटा यावी याणी येंदा फारच गरव धरला आहे हर प्रकारे बंदोबस्त मोगलाकडील करावाच असेही कारिता न जाला तर महाराज सावंद आहेत ज्याप्रो मरजीस पडेल त्याप्रो करावे परंतु त्याचा पारपत्ये होय तो करावे नाहीतर हे डोकीवर बसतील उपर राजश्री वेंकटराव मोरेश्वर याचे बातमीचा बंदोबस्त फार मजबूत व यथास्थित आहे सेवकाने सर्व शोध घेतला आहे यास्तव सेवेसी विनंती केली ग्रहस्त सरकार कामामधी फार जीव देऊन आहे परंतु खर्चावीन फार श्रमी आहेत तर महाराजानी काही तजवीज याचे खर्चाची करून पाठवावी म्हणजे सरकारी कार्यास आनखी जीव लागेल प्रस्तुत थोडे बहुत तरी त्यास खर्चास पाठवावे व भोसले याचा पारपत्ये होय तो आर्थ करावा नाहीतर हे डोकीवर बसतात गरव माजला आहे यास्तव सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक ४१ ( रायरीकर ) श्रीशंकर { श. १६८७ / इ. सन १७६५

राजश्री चिंतो विठ्ठल अुपरी पूर्वी पत्र लिहिले आहे परंतु उत्तर आले नाही सबब दुसरे पत्र लि॥ असे उत्तर धान्येश भौम आहे यास्तव येवज प्रो दहा हजाराचा गला हरभरे व गहू व शालू खरीद करून नाशकात ठेवावा कलम १

धोंडोराम मुरादखान याची पत्रे लौ ‹ › र जावी सर्वही पत्रे धोंडोरामाजवळ जावी ते प्रसंग पाहून द्यावयाची ती देतील मुरादखानास आमचेपेक्षां मोगलाची माया अधिक परिछिन अधिक मुलुक मोगलाचे घरी घालतील परंतु हैद्राकडे मोगलास मिळू देणार नाही कलम १

विष्णु माहादेवाचे रुपये नारो शंकराकडे वाजवी लागतात अच्युतराव गेला सबब हे रु॥ नारो शंकरावरच पडतात येविशीचे कसे केले मजकूर गोविंद न्याहारखानीस वाकीफ आहे कलम १

*मीर मुसा वगैरे पत्रे तुमचे विचारास आली तरी पाठविणे नाही तरी न पाठविणे. सारांश राजकारण लौकर लागावे व आपलेकडे कुमकेस येत ते करावे निदानी हैदराकडे तरी न जात ते करावे जलदी राजकारणाचे प्रयोजन इतकेच.

चिरंजीव नारायेणरायास ओझ्यास उंटे पाठविणे कलम १

लेखांक ४२ ( पटवर्धन ) { श. १६८७ मार्ग. व. ११ / इ. सन १७६५ डिसेंबर ८

पो पौष शु॥ २ मंदवार

श्री

श्रीमंत राजश्री दाजी स्वामीचे सेवेसी पोष्य **त्रिंबकराव विश्वनाथ** पेठे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे बहुत दिवस जाले स्वामीकडून वर्तमान कलत नवते हली सौभाग्यवती **राधाबाई** आली त्याणी सांगितले त्या वरोन बहुत संतोष जाला सौभाग्यवतीची अवस्था तरी पत्री काही लिहिता पुरवत नाही इतपत अवस्था होय तो पावेतो अंताजीपंत दादानी ठेऊन घेतली स्वामीनी धर्म बहुत घेतला की बाईची रवानगी करून दिल्ही आज भेट होऊन सुदीन जाला आपले आशीर्वादे करोन आरोग्यही होईल दारकोजीस ........ आली यकले माणुशाचेच घेऊन येणे म्हणोन लि॥ होते त्यास आजपावेतो दोघे माणुसे होती त्याची पोटगी मात्र चुन होते त्यामधे आश्विनापासोन काही दिल्हे नाही वीस रुपये दुसऱ्या माणसाचे पोटगीत दिल्हे ते परभारे सिधापाणी देत गेले ते वरचेवर पोटगी जाली बाबाजी

* येथून पुढील अक्षर निराळें. हें पत्र रघुनाथरावाचें.

शंकर याचे उपाधे याणी तरी दुसऱ्या माणसास पोटास दिल्हे होते ते दारकोजींच्या दरमाहात पोटगींत धरोन हिशोब करोन दिल्हे ते सवीस रुपये दारकोजीस देणं आम्हास प्राप्त जाले त्या ............... दुसरा मणुश होता त्याजला मी दोन रुपये दरमाहा प्रमाणे आठ महिणे दिले दारकोजी विसा रुपयाकरितां अडू लागले त्यावरून स्वामीस लिा आहे की वीस रुपये दारकोजीस यावे दारकोजीस त्याही दाहा रुपये दिल्हे त्या मणुशाचे पोटगीचे वीस रुपये धरले येसे करोन फडशा केला त्यास वीस रुपये दारकोजीस यावे सेवेसी श्रुत होय स्वामी कारणे कवले दाणे सुमार ९ नव पा आहेत बहुत काय लिहिणे रुपा लोभ असो दीजे हे विज्ञापना मिति मार्गसीर्ष वद्य ११ रोज रविवार

भास्करपंताचे नांवे लिहून दारकोजीस यावे

तीर्थस्वरूप गंगाभागीर्थी मातोश्री काकूबाई वडिलांचे सेवेसी साष्टांग नमस्कार प्रविष्ट होय हे विज्ञापना

---

**लेखांक ४३** ( पेशवा दप्तर ) — शक १६८८ / सन १७६६ ?

पो छ ३ शाबान

श्रीमंत महाराज राजेश्री **त्रिंबकराव मामा** साहेबांचे सेवेसी आज्ञाधारक **पिलाजीपंत ताकपीर**······विनंती विशेष त्याहावयो प्रार्थना येथील स्वकुल क्षेम जानऊन साहेबी आपले स्वकुलक्षेम स्वानंद देणे···आज्ञा केली पाहिजे तीर्थरूप बाबा[1] दिलीं प्रांते गेले आहेती त्यास महिने दोन जाहले आपनास कांहीं कागद आले नाहीत याकरितां चिंता प्राप्त झाली आहे घरामध्ये बेमारी सर्वत्र फार अतीशय झाली आहे याकरिता आम्हास कांही सुचत नाहीं तर आपण......करून तीर्थरूपांची काही पत्रे आली असली ते पाठविणे पत्रे नसली तर महादोबाकडे पत्रे पाठविणे दिलीं प्रांतीची असली तर आपणास जैसी खबर असली तैसी तर पाठवून देऊन आम्हास उतरे पाठविले पाहिजे आम्हास आसरा कोणाचा नाही······( पुढील गहाल )

---

**लेखांक ४४** ( पेठे ) — शक १६८७ फाल्गुन वा। १३ / इ. सन १७६६ मार्च ९

श्री

* राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** उपनाम पेठे गोत्र वासिष्ट सूत्र हिरण्यकेशी

---

१ महादाजी शिंदे.

* अशाच तऱ्हेची सनद सन १७६० जानेवारी ९ ला ताराबाईनें त्रिंबकरावास दिली होती.

गोसावी यासी दा। सेवक **माधराव बलाल** प्रधान नमस्कार सुा सीत सितैन मया व अलफ शक १६८७ पार्थिव नाम संवत्सरे तुम्ही हुजूर कसबे इछावर प्रांत मावळ येथील मुकामी येऊन विनंती केली कीं आपण राज्यात बहुत दिवस श्रमसाहस करून सेवा येकानिष्ठेने केली त्यास कृपाळू होऊन ताा सातारा येथें नवीन इनाम जमीन करार करून देऊन चालविली पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही बहुत दिवस श्रमसाहस करून शेवा येकानिष्ठेने केली तुमचे चालविणें अवश्यक जाणोन तुम्हावर कृपाळू होऊन मौजे सोनगाव ताा सातारा प्रांत मजकूर येथे जमीन चावर

·॥· २५ ॥= **फत्तेसिंग भोसले** यांचे बागाबाबत देखील कोरडवाहो

८८ महादजी खोडके यांचे सेरी बाबद

·॥· फतेसिंग भोसले यांचे बागास लगती उत्तरभागी कुरणाची

१॥ ३॥ ४

येकूण दीड चावर साडेतीन बिघे चार पांड पडजमीन व वहीत बाा कांहीं पाट-स्थळ व कांहीं मोटस्थळ मिळोन स्वराज्य व मोगलाई येणेप्रमाणे दुतर्फा देखील इनाम तिजाई व चौथाई व बाबती व सरदेशमुखी व साहोत्रा व नाडगौडा व धारकरी पाटील कुलबाब कुलकानू हाली पटी व पेस्टरपटी जलतरु–तृण–काष्ट पाशाण निधिनिक्षेपासहित खेरीज हकदार करून दरोबस्त नूतन इनाम तुम्हास करून दिल्ही असे तरी सदरहू जमिनीची चतुःसीमा करून चतुःसीमापूर्वक आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनभऊन सुखरूप राहाणे जाणीजे छ २७ रमजान आज्ञाप्रमाण (लेखन (वाटोळा) सीमा)

---

**लेखांक ४५** (पेशवा दफ्तर) { शक १६८७ वैशाख वाा ३ / इ. सन १७६५ मे ८ }

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंती सेवक **अमृतराव वासुदेव** कमाविसदार प्रांा म्हसवे दिा। राजेश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष ताा छ १७ जिल्काद पावेतो प्रांा मजकूरचे वर्तमान स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे विशेष आज्ञापत्र सादर जाले ते सिरसा वंदिले आज्ञा जाहली की राजश्री **जानोजी भोसले** सेनासाहेब सुभा याजकडे सिलेदार वगैरे चाकरीस गेले असतील त्याची घरे व गांव मुकासे वगैरे जमीन जफती करणे म्हणोन आज्ञा त्यास प्रांत मजकूरचे कोणी भोसले यांचेकडे चाकरीस गेले नाहीं परंतु आज्ञेप्रो। चौकसीने शोध करून कोणी चाकरीस गेला असल्यास तरी त्याची जफ्ती कारितो सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

**लेखांक ४६** ( पेठे ) { शके १६८८ आषाढ वा। ३०
नकल श्रीसांब { सन १७६६ जुलै २९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **गंगाधर बलाल रानडे** स्वामीचे शेवेसी पोष्य **नारो शंकर** सां। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाणे यानंतर का। गाधली पा। अमलनेर प्रांत खानदेश हा गाव जागीर व सरदेशमुखी व बाबतीसुद्धा आम्हाकडे सरंजामात सरकारांतून आहे त्यास सदरहू अमल दरोबस्त कसबे मजकूरचा देखील थलभरी व थलमोड खंडफराईसुधा कुलयाव ( कुलकानू ) अमल राजश्री त्र्यंबकराव विश्वनाथ याजकडे आम्ही आपले स्वसंतोषे सन सबा सितैनापासून नेहमी साल दरसाला दिल्ही असे अलाहिदा सनदा करून दिल्ह्या आहेत राव मारनिलेकडील कामदार कसबे मजकुरी राहून आमल करितील तुम्हीही प्रांत मजकुरचे कमाविसदारास ताकीद करून त्याचा वसुलाचा फारफर्मास वगैरेचा कोण्हे बाब उपसर्ग कसबे मजकुरास न लागे ते करणे पा। मजकूरचे कमाविसदाराचे बेरजेत साल मजकुरापासोन कसबे मजकूरचा आकार असेल तो आजी बाद करून हली सरकारचा ऐवज कसबे मजकुरापासोन समजोन घेत जाणे या बाबे दरसाल पत्राच आक्षेप न करिता सुरळीत चालविणे छ २१ मोहरम सु॥ सबा सितैन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

---

**लेखांक ४७** ( पेशवा दप्तर ) { शक १६८७ पौष शु॥ १४
{ इ. सन १७६६ डिसेंबर २५

स्वारी राजश्री पंतप्रधान सन सीत छ ११ रजब शक १६८७ पौष शु॥ १४ बुधवार **माधवराव विश्वनाथ** यास सालमजकुरापासून पाच हजाराचा सरंजाम करार करून दिल्हा असे त्यास सालमजकुरी तुम्हास कऱ्हाड प्रांतीची चौकशी करावयास सांगितली असे त्यास चौकसीमुळे नेकसर महालात होईल त्यास कसेरचे मुबादला गाव यास नेमून घ्यावे त्या गावी प्रतिनिधीचा हिसा असेल त्या हिशाचा ऐवज त्यास आणखीकडे करून देऊन सदरहू ऐवजाचे गाव निर्वेध करून मानिलेकडे नेमून देणे आणि **बाळाजी जनार्दन** यास लिहून पाठविणे त्याप्रो। ते सरंजामाची सनद पाठवून देतील त्याप्रो। सरंजाम चालविणे म्हणोन बाळाजी महादेव यास सनद

---

लेखांक ४८ (पेठे) श्री { श. १६८८ इ. सन १७६६

( केरोजी पवाराचा शिका चौकोनी )

राजश्री त्र्यंबकमामा गोसावी यासी द्या अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री राव **केरोजी पवार** विश्वासराव दंडवत विनंती उपरी आमचे खास कांही काम होते ते स्वामीच्या हाते आम्ही आपले कार्य करून घेतले यास्तव स्वामीस मौजे नामसवाडी पा। बाहाल येथील जाहागिरीचे हजार रुपये दरसाल आम्ही वसूल घेत होतो तो दरोबस्त अमल मौजे मजकूरचा सन सबा सितैनपासून आम्ही आपले खुशार-जाचंदीने नेहमी आपल्यास दिल्हा असे याउपर दरसाल स्वामीनी वसूल घेत जावा याउपर आमचा लढा काडीमात्र मौजे मजकुरी राहिला नाहीं बहूत काय लिहिणे हे विनंती

---

लेखांक ४९ (रायरीकर) { शक १६८९ भाद्रपद शुा। ३
पो। छ १४ राा। कर भाद्रपद इ. सन १७६७ ऑगस्ट २७

श्री

सेवेसी **बाळाजी कोनेर** व **कृष्णाजी सखदेव** कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा भाद्रपद शुध्य त्रितीया गुरुवार पावेतो मुकाम अवंतिकापूर येथें आपले कृपे करून येथास्थित असो विशेष आपणाकडून दोन पत्रे छ ४ रा। लावलचे यक पत्र येक पत्र छ ८ राा लावलचे येसी दोन पत्र आली त्याजवरून वर्तमान कलो आले त्या पत्राचे उत्तर कलमे बी तपसील—

**त्रिंबकराव महादेव** याजकडे पेशजीचे कर्ज व हालीचे मिलोन पनास हजारपर्यंत येवज घेणे त्यास सदरहू येवजास येवज लाऊन घेणे म्हणोन आज्ञा त्यास येथे स्वीपाचा येवजी खर्च होऊन त्यांच्या येवजी साडेतीन कसराची पटी कादारावरी केली आहे त्या येवजास कादार ठिकाण लागू देत नाहीत सिलेदाराचे देणे........लाखपर्यंत आजमासे.........त्यास जागा नाहीं त्याही मध्यें आम्ही दररोज सदरहू येवजाकरिता साचरोद रतलाम येथे फाजील गुंतले त्यास बाबा अंगाबाहेर टाकितात येवज आपला गुंनला त्यास मामलत करार जाहली तरी फाजील वजा होऊन रसद देतील न हीं तरी फाजील निशा करून घेऊन मामलत दुतरि यासी सांगणे म्हणोन आज्ञा त्यास पेसजीपासून यास मामलत करा येसे बोलतच होते त्या समई माहादजी सिवजी व चिमणाजीपंत यानी आनारस्ता बाबाच्या सांगितल्यावरून केली त्याजवरी दिवाणजीच्या मते त्रिंबक

प्रेत्नं करितो त्यास **पाटीलबावानी** व दिवाणजीनी येवज सिलेदार याचा गुंता उरकिला म्हणजे लाऊन देतो येसा करार केला आहे त्याप्रो येवज लाऊन येऊ कलम १

रतलामचा कारभार अद्यापि जाहल्यानंतर फाजीलाची वाट करून घेऊ कलम १

गुद्स्ता खाचरोदेस पंधरा हजार रुपये सूट दिल्ही त्याजपैकी महाली सूट बाबाकडील कारकुनी सात हजार देऊन बाकी सात हजार इजाफा साधला याजमुळे दिवाणजी व सरदार बोलतात की या गोष्टी तुम्ही कैशा केल्या तुम्हास सूट दिल्ही तेव्हा कमाविसीची मामलात जाहली कचा हिशेब मनास ...णुयाजप्रो जाबसाल...... ले परंतु येथे जेसे...... ...... लतैसे पाहू चिंता ... परंतु कारभार सुधामत केला नाही कलावे कलम १

कछवाघारच्या फडणिसीचा बंदोबस्त करणे म्हणोन आज्ञा त्यास कछवाघार भद्रावर येथे आमल **जवाहीर सिंग** याचा जाहाला तेथे आपला आमल नाही तेव्हा फडणिशीचा बंदोबस्त कोणता करावा त्याहीमध्ये विनाजीपंत याजकडे पत्रे पाठविली आहेत उत्तर आल्यानंतर ते लिहितील त्याजप्रो करू कलम १

सरसुभ्याच्या सनदाविसी उत्तर करितात की देशात सरदारीकडे कांहींच राहिले नाहीं येथील बंदोबस्त जहाला आणि कांहीं सरंजाम सरदारीकडे......त्यास मल्हार याजकडे सांगावी येसे होते तो येक गृहस्थ महिपतराव म्हणोन **गंगाजी भागवत** होलकराचे जावई त्याजकडील त्यानी येऊन दोन लाख पनास हजार देवविनारा कबूल करून सवा लाख रुपये रसद करार केली त्याजपैकी येक लाख पाच येन कर्ज व वीस येकूण सवा लाख जाहले तेव्हा सरकार किफायेत जाहली आम्हास तोद्यानी मामलत सांगा म्हणे तरी रुजू पडेना तेव्हा तो कारभार सिध्धसि गेला फाजिलाच्या निशेकरितां तगादा केला तेव्हा आम्हासही जाबसाल करू लागले की याजप्रो तुम्ही कबूल करून येवज द्या त्यास याजप्रो कबूल केल्यास परिणाम बारगिरास येवज नेमून दिल्हा दिकत करावी तेव्हां बारगीर दारी बसतात येसा प्रकार जाहला तेव्हां त्रिंबक मल्हारीकडील सिबंदीचे सोला हजार येन फाजील खाचरोद येकून चवेतालीस हजार रुपयेची वरात रबीच्या येवजी करून घेतली कामदारास जरबेच्या गोष्टी सांगून त्यास आपले ममतेत घेऊन त्याजपासून येवजाच्या निशेचा प्रकार करून घरास खतपत्र घेतो कलावे कलम १

पेशजी कासीद जोडी नानाकडे पाठविली त्याचे उत्तर आले ती पत्रे चाजिनस पेशजी रवानां केली आहेत तो पत्रे पावलीच असतील हली कासीद जोडी रवानना केली ती अद्यापि आली नाही आल्यानंतर पत्रे पाठवू बाजारी वर्तमान येसे ऐकितो की **मामा व नाना**

सरसुभा सांगू ......स मागाहून सिंद ......व सरसुभ्याच्या ......... चे ये ( क ) करून मागाहून ( स ) नद पाठवितो कलम १

दिवाणजीकडून कारभाराचे नेट राहिले माहादाजी बाबानी सारे करावे येसा करार जाहल्यानंतर अगदी कारभार माहालकरी-याचा पेशजी जाहला तो फिरून इजाफा साधून दुसरा कारभार केला येणे करून वचनाची सचोटी काहीच राहिली नाहीं बटेबाजी पुरती आली गणोजीकडे अगदी दैवतपण आले त्याची रीत पाच रुपये मिलवावे याजवरी आहे दुसरा मकार दूरदेशीचा किमपि नाहीं येसा आर्थ आहे येणे करून दिवाणजीकडील आर्थ कमी फारच पडला आम्ही याजप्रो बटे-बाजी होऊ लागली त्यासमई सारच सोडले त्याजपासून करवितो याजमुले खरेपणाची जाती राहातापैकी आपणापासी राहिली सर्वत्राचे चित्तात याजकडून ... ... णाने परिणाम येसे ... ... कलम १

राणोजी कदमाची खोटाई मूर्तिमंत आहेच की जिकडे चार रुपये मिळतील तिकडे त्याचे लक्ष याजकरितां मकार-नामकाचे लक्ष त्याच्या जागा थोडकेच आहे आम्हाकडे बोलण्याचा भाव गोड दाखवितात परंतु खोटेपण अंगी आहे कलम १

बक्षींनी तसेच मात्रागमन करून सिलेदाराची मलई करून कोणाचा दाखला न पडता मनस्वी तैनात जाचते करून कारभार केला दिवाणजी जिकडून कमी हड्याच्या मार्गे देशास गेले म्हणोन परंतु सत्य मिथ्या न कले कासीद अल्या॰ नंतर वर्तमान कलेल कलम १

पाटीलबाबाचे घरी येवज पेशजी द्यावा म्हणोन महादजी बाबानी पत्रे आपणास लिहिली त्यास येवज देवितो परंतु कदारजी सिंदे व अवचितराव याची पत्रे पाठविणे म्हणोन लिहिले त्यास सदरहूप्रो पत्रे मारनिलेची पाठविली आहेत पंच्ये-वसि हजार लिहिले त्याजपैकी थोडा बहुत दहापंधरा पर्यंत येवज तूर्त घ्यावा येविसी माहादजी बाबाची निकड फार आहे कलम १

अवचितराव याचे पंधरा हजार द्यावे म्हणोन पत्र प्रो आहे तरी सदरहू येवज पावता करावा नकारनामकाचे लक्ष येथपर्यंत राखिले आहे की विना एखादा कारभार करणें तरी येकांती आम्हास पुसावे की या कामात तुमची सला असिली तरी मी करितो नाही तरी करीत नाही ते लोकापासी बोलतात की आमची माया फडणिसाकडे मात्र आहे याजप्रो ते आहे —कलम १

त्रिंबकजी इंगले निखून आपले लक्षात मकारनामकास पदोपदी आपल्या लक्षाच्या गोष्टी सांगून त्याजपासी आहे कलावे कलम १

संकराजी मुरार पागे यानी अवचित॰ राव यासी नादी मात्र लाविले अंतरयामी खोटेपण करून मकार नामकास लाच दिल्हा त्याच्या हाते मकारनामकासी क्रिया शफेत करून त्याच रंगात

पडेल ते समई ज्यानें बोलावे त्यासीच कजिया पडावा येसे प्राप्त जाहले याजमुले त्याची ठाकुरकी बसली सा लाख हिशेबी निघत होते ते दहा लाख केले येसा कारभार त्याने केला नाइलाज गोष्ट याजकरिता ......... याजूनोकेचा ......... ...... पर्यंत उगच राहणें ......... त्याच जाहले कलम १

... निसाची जड (अ)गदींच मोडिलीं जमाखर्च अगदीं परभारा जाहला एक बक्षी व पागनीस दोन खुले मात्र आहेत कलम १

लोकाची निर्गत जाहल्यानंतर मकार-नामकाच्या चितात की देवदर्शनास देशास यावे आपली नावे द्यावी उभयेता खावंदास भेटून करणे ते करावे हा मनसबा त्याचा आहे त्यास केदारजीबाबा व अवचितराव यानी सभागमे यावे किंवा रहावे येविसी पत्रे आपणाकडे आलीच आहेत त्यास कदाचित केदारजीबाबा व अवचितराव राहिले तरी मकारनामकाच्या चितात आम्ही सभागमे यावे हा भाव त्याचा फार त्यास इकडे फौज आणि केदारजी सिंदे राहिले तरी येसे...... बंदोबस्त करून...... (कु) शाहास ठेऊन आम्ही मकारनामकासमागमे यावे किंवा नच यावे हे ल्याहावे सर्व मंडळी आली तरी उतमच आहे सारांष मकार-नामकाच्या मर्जाचा भाव लिहिला बनराम्रा वर्तणूक करू कलम १

वरकड लिहिण्याचा वगैरे बंदोबस्त यथास्थित आहे त्यांत गुंता नाहीं सिले-

राघोरामासारखी मलई जाहली पथक पाग्यास येवज आम्ही परभारा दिल्हा हुजूर पागेच्या बारगिरानी खुल करून सरदार दिवाण व आम्हास अडीच प्रहर रात्रपर्यंत खोलीत सोडले हिशेब राहिला कितेब राहिला त्या समई सवा लाख रुपये मोघम देणे पडले आम्ही देत नव्हतो परंतु मकारनामकानी आम्हास सांगितले की माझी क्रिया तीच आहे परंतु सध्या प्राणासी गाठी घालितात याजकरिता जुने खुल वारेतों पर्यंत तुम्ही मोघम येवज पुढे सारविणे तुम्हाकडेच आहे तेव्हां येवज मोघम दिल्हा कलम १

बाजीबाबा राघोराम यानी पुण्यात कारस्तान केले त्याच्या बातम्या येथें वरचेवरी येतात आणि लौकिकात वर्तमान की मकार नामकाची त्याची घाटी पडून क्रिया शफत देखत जाहली तेव्हां आम्हासी तरी मकारनामकाचे लक्ष कायेम आणि बाटेबाजी येकिल्यात तरी ये याजकरितां त्रिंबकजी इंगले यास आणून फजीत केले कीं तात्याचे आणि पाटीलबाबाचे भाषण जाहाले त्याजवरून तर पत्री आम्हासच दिवाणजीस ताकीद येती की आमचे वचने गुंतले ते तुम्ही पार पाडावे पाटीलबाबाचे स्वरूप राखावे त्यास आम्हापासून अंतर काही आहे घरी खर्चास देखील येवज थोडा बहूत दिल्हा येसे लक्ष त्याजकडून आसता तुमची बाटेबाजी दिसती ती कोणती तरी बाजीबाकडील प्रकार सांगितला तेव्हां त्यानें जाऊन मकारनामकास फजीत करून आमहसी बोलाऊ पाठविले

दारास अद्यापि येवज दिल्हा नाहीं दिल्हा म्हणजे कारकुनांचा येवज वजा करून घेऊ महालकरी याकडील येवज निमे खरीप व निमे रबी याजमो घेतो येथील कारभाराविसी कोणती गोष्ट न्यून्य नाही कलावे कलम १

हरि गोविंद याजकडलि ऐवज उगऊन थोडा बहुन (राहि)ला बाकीचा घेतो (कला) वे कलम १

मकारनामक व ककारनामक व इत्यादिक याचे लक्ष राखून सर्वांचे लक्ष आपणाकडे याजमो सिलेदार मंडली देखील माहालकरी राखिले आहेत कलावे कलम १

आमचे त्याचे बोलणे बहुत जाहले त्यानी बहूतच खातरजमेच्या गोष्टी शफतपूर्वक सांगितल्या की मी येक तात्या जाणतो त्याच्या लक्षाशिवाय पाणी पिणार नाही जो मनसवा करणे तो त्याजखेरीज करणार नाहीं इतके दिवस बाजीबाचे लक्ष होते त्याजवरी येकता त्याचे लक्ष धरिले ते यारेबाजी करितात आणि माझे नाव प्रगट केले रावसाहेबाकडून येक पत्र आले होते ते दाखविले त्या पत्रात भाव काहीच नाही तेव्हा आम्ही त्याजपासून पत्र लेहून घेऊन पाठविले आहे आपली व रावसाहेयाची भेट जाहल्यानंतर त्यास दाखवावे यासी उपयोगी पडेल बोलण्यात त्याची कायमता दिसती करण्यात काय येईल ते पाहणे परंतु त्यास राखिले आहे बहुत युक्तीने कोणती गोष्ट कमी दाखवीत नाही कलावे कलम १

अवचितराव याचे मारफातीचे कर्जही नालचंदीत वजा करून घेतो कलावे कलम १

येथे भोजनखर्च वगैरे होतो त्यास सरकारातून नेमून घ्यावा किंवा न घ्यावा हे त्याहावे माणसाचे रोजमरे तो सरकारातून घेतच आहो परंतु भोजनखर्चाची नेमणूक करून घ्यावी न घ्यावी हे लिहावे कलम १

* येणेप्रो येथील कचे वर्तमान लिहिले आहे ते ध्यानात येऊन उत्तर येईल त्याप्रो वर्तणूक करूं सेवेसी कलावें हे विज्ञापना

---

* यापुढील अक्षर निगळें.

**लेखांक** ५० ( पेशवा दप्तर )
पो छ १ जमादिलावल

{ शक १६८९ आश्विन शुा १
{ इ. सन १७६७ सप्टेंबर २३

श्रीराम

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे शेवेसी आज्ञाधारक **गोविंद गोपाळ** कृतानेक साष्टांग नमस्कार येथील कुशल ता। छ २९ रोज रविलाखर गुरुवार प्रातःकाल पावेतो ठाणे हिल्हेटीनजीक सिमथर येथे येथास्थित जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष बातमीचे वर्तमान तर गंगाप्रसाद ब्राह्मण फौजसुद्धा प्रस्तुत कोचेस मुकाम आहे फौज चार सवा चार हजार आहे मुलकांत तहसील करीत आहेत त्यापैकी हजार चारशे स्वार परवाच्या दिवसी कोचेहून नदीच्या गावास गेले ते पुढे देसास जाणार इतके दिवस हे फौज कोचेस राहावयाचे कारणे की हुजराचासा बरा होता त्याचे पाच तेथे गेले होते त्यानी कितेक प्रकारे वल्गना केल्या होत्या त्याजमुले इतके दिवस राहिले जाटास देवआज्ञा जाहली म्हणून इकडे वर्तमान आहे गोहदेहून माणसे आली होती इतकिया उपरी सप्तमीच्या जलाने फौज दोनचार रोजानी घरास जाईलसे दिसते फौजेत आजारी माणसे बहुत आहेत हुजराची व राजश्री यादोपंत भाऊची भेट जाली त्यावर त्याचा आसरा तुटला या उपरी दुसरे वर्तमान की श्रीमंत राजश्री **त्रिंबकरावमामा** व **बालाजी गोविंद** कांहीं फौज घेऊन छेत्रपुरास आले हे वर्तमान आहे इकडे त्वरेने येणार वरकड राजश्री कासीपंत व गंगाधरपंत कांही फौजेत श्रीजगसी आहेत कोचेच्या आसपास ठाणी तमाम आहेत येरामडोरा येथे ठाणे आहे चार रोज जाले लष्करची तट्टे उंटे...जीसहून आणिली होती ते थानसिगचमरी आल्याने राजश्री हरीपंतास कित्येक प्रकारे सांगोन सोडविली जाटाच्या फौजेत काही जीव नाही परंतु इकडील जोर कांही नाही याजकरिता इतके दिवस जाले ते रोहिले आपली फौज भा डे री स तीन हजार आली म्हणून त्याच्या सइन्यात बातमी आहे तमाम ठाणे मजकूरचे स्वार कोचेस जमा जाले असत मी त्या लष्करास हमेश दोन राबतात रोज खापर येत असे बातमीची सावधता उत्तमप्रकारे केली आहे आणि साहेबाच्या प्रतापे करून सर्व उत्तमच होईल बहुत काय लिहिणे कृपेची वृद्धि केली पाहिजे ही विज्ञापि

---

**लेखांक** ५१ ( पेशवा दप्तर )
पो छ १८ जमादिलावल दोन प्रहर

{ शक १६८९ आश्विन वा। ५
{ इ. सन १७६७ आक्टोबर १२

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **विश्वासराव** स्वामीचे शेवेसी पोष्य **त्रिंबकराव विश्वनाथ** नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे. विशेष आम्ही श्रीनगरीहून कूच करून छत्रपुरी आलो तो राजे

हिंदुपतीकडील मानचर पाच भेटीचा हेत राजेश्रीचा आहे म्हणून आले त्या उपर राजे परसयाहून राजगडास आले मग आम्हीही छत्रपुरीहून राजगडी येऊन भेट घेतली परस्परे अपार सन्मान शिष्टाचार जाहला बहुतप्रकारे मर्यादेचे भाषण केले बा। **गंगाधरपंतही** होते त्याचे त्याचे बोलणे भाषण होणे ते जाले सर्व गोष्टीने **हिंदुपतींनीं** साहित्य करावे अनकूल असावे ऐसे ठरोन आम्ही निरोप घेऊन छत्रपुरास येऊन छत्रपुरीहून कार्तिक वा। दशमीस स्वार होऊन सागरास जाणार दिपवाली सागरीच होईल तुम्ही जाटाचे फौजेसी लढाई जाली त्याचे फौजेचा रेच मोडल्यावर माघारी गेलीयाउपर ठाणीठुणीयांचा बंदोबस्त करून जोरावरच फौज ठेविली आहे फार उत्तम केले तुम्ही यंदा नक्षाने काम केले हे फार उत्तम जाले रसदेचा भरणा वोढीत वोढ करून कोणे प्रकारे करणे लागला त्यामध्ये तूर्त काही तरतूद करून ऐवज पाठविला म्हणून लिहिले उत्तम केले यंदाचे साली चहूकडे घालमेल जाली आहे श्रीची इच्छा आहे तर लौकर देसीहून फौजाही येतील सर्व गोष्टी उत्तमच होतील परंतु तुम्ही व **बालाजी गोविंद** फौजसुद्धा येकत्र होऊन वजनाने येकदा जरब बसविल्यानें तुम्हास व त्यास सोई पडोन अमल बसोनच सोईस पडेल ते निराले तुम्ही निराले हा प्रकार न करावा कोणाचेच वजन वाढत नाहीं आणि तेणेकरून नक्ष राहत नाही येकाचा बदनक्ष जाला म्हणोन तो पेच मग सर्वांस येऊन पडेल यास्तव अगोदरच येकत्र होऊन वजनानें कामकाज करावे हे उत्तम याची हो फौज वेत्रवतीपार उतरली तुम्हो याणी एकत्र व्हावे हे उत्तम देसी गेल्यानंतर आम्हास कलेल त्याप्रमाणे तुम्हाकडील सर्व मजकूर श्रीमंतास विदित होईल. परंतु कबूल केले गोष्टींत अंतर पडू न द्यावे बहुत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती

---

**लेखांक ५२** ( रायरीकर )

शक १६८९ कार्तिक शु॥ ११
इ. सन १७६७ नोव्हेंबर २

श्री

सेवसी **बालाजी कोनेर** व **कृष्णाजी सखदेव** कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ ९ जमादिलाखर पावेतो मुकाम अवंतिकापूर येथें येथास्तित आसे विशेष आपण छ १८ जमादिलावलची पत्रे पाठविली ती पत्रे पावोन वर्तमान कलो आले त्या पत्राचे उतर कलमे बि तपसील

| | |
|---|---|
| पाटीलचावाच्या दस्तायेवजावरी गकारनाम होलकर व बाजी नरसी यानी श्रीमंतापासी नजर दहा लक्ष रुपये करार केले त्याज पैकीं पेस्तर साली पाच व सालमजकुरी पाच लाख रुपये द्यावे येणे- | पाटलिचावास आपली पत्रे यावयाविसी आली त्याजवरून याच्या जातीचा निश्चय की दरबारी आपल्यास लटके पाडू नये आपले वचनाप्रो तेथे येऊन जो जायसाल करणे तो आपल्या लक्षाने करावा येसा |

प्रो करार केले तो कारभार लबाड पडला याजकरिता त्या आन्वये श्रीमंत आपणासी बोलतात म्हणोन लिहिले आशास त्याचा लकारीचा कारभार कबूल मात्र करितील परंतु येवज प्राप्त होणे कठीण आहे सरदारी बहुतच वोढगस्त जाहाली सरे-सालचा येवज पंच्येवीस लाख रुपयेपर्यंत मागील देण्यास खर्च जाहाला असता देण्याचा पेच वारत नाही याजकरिता पेस्तर साल घेणार तेथे नजरेचा प्रकार कोठून प्राप्त होईल आणि पुढे फौज ठेऊन चाकरीस जाणे या गोष्टी घडणे कठीण आहेत आपणास कलावे

कलम १

पाटीलबावाचे लक्ष राखणे म्हणोन आज्ञा त्यास पाटीलबावाचे लक्ष उतम प्रकारे रक्षिले आहे की दरबारास येऊन आपल्या लक्षासिवाय संभाषण करनार नाहीत याजप्रो पके आहे चिंता नाही येथे तरी रहस्य फारच आहे त्याच्या मर्जीविसी चिंता न करावी आपले दृष्टीस पडेल ते समई आपणास कलेल

कलम १

कारभारचा मजकूर गर्वारूढ होऊन सर्व कारभार अव्यवस्थित केला पंच्येवीस लाख रुपये खर्च करून चारगीर आथवा सिलेदार कोणती गोष्ट निर्गमात आणिली नाही सागत आसता येकेना आम्हाकडे कारभार न पडावा याजकरिता पागेचे खूल परभारा केले व सिलेदाराचा कारभार मलई करून परभारा केला तो गन्यास गोणी आली फजीती जाहाली याचा निश्चय परंतु आकारनामकास पत्रे त्याचे बंधु मैरालपंत व **नारोशंकर** वगैरे येतात की तुम्ही देशास न येणे आल्याने पेचात पडाल याजकरिता आकारनामकाचे येणे होत नाही येसे आहे तेव्हा त्यास या प्रांती ठेऊन मकारनामकानी व ककार-नामकानी आम्हास समागमे घेऊन देशास यावे येसा मनसबा आहे लोकाचे देण्याचा पेच वारून आकारनामकास इकडे ठेऊन आपण यावे योजलेला मनसबा आहे घडल तो प्रमाण मुख्य मकारनामकाच्या लक्षात खामखा आपल्या लिहिल्यावरून यावे हा करार आहे पोर्णमे पलीकडे येण्याचा निश्चय होऊव निघणे घडल

कलम १

आकारनामकाचे व मकारनामकाचे येक लक्ष करून यावयाची आज्ञा त्यास करून देतो परंतु आकारनामकाची बुध्धि शास्वत नाही बोलणे उदाम मर्यादा नाही कितेक गोष्टी कमी पडतात याजमुले येक लक्ष राहात नाही आकारनामक परभारा बोलतात की आमचे व मकार-नामकाचे लक्ष येक आहे आणि आकार-नामकास भरवसा येकंदर कोणते गोष्टीचा पडत नाही कलावे

कलम १

**त्रिंबकराव माहादेव** याच्या कर्जा-विसी लिहिले त्यास आम्ही पंच्येवीस हजार रुपये रबीच्या येवजी अंताजीराम याजकडे नवलाईस लाऊन घेतले कर्जा देखील येवज घातला त्यास हाली दिवाण-जीनी कर्जपट्टी घातली आहे मजमदार

आबरू गेली सचोटीस आंतर पडले सिलेदार व माहालकरी व सावकार व धणी कोणती गोष्ट येक राखिली नाही नाकाबिली पदरास येऊन फजीत पडले लटका दोश मकारनामकावरी आणितात त्याची प्रतिज्ञा स्वता ज्ञान नाही आणि सांगितले यैकू नये आसे आहे या कारभारात सचोटी आथवा भय प्रीत येक राहता पैकी आपणापासी मात्र राहिली आहे हे वर्तमान आपणास परस्परे कललेच असल

कलम १

खाचरादेचे फाजील व रतलामचे फाजील उगऊन घेणे म्हणोन आज्ञा त्यास रतलामचे फाजील परभारा माहादाजी सिवाजी व चिमणाजीपंत यानी आकारनामकाचे जातखत घेऊन निशा करून घेतली खाच रोदची मामलत पेसजीच्या कमावीसदारास होतना याज करिता दुसरा कमादार करार होत आहे त्यास येवजाची निशा करून घेऊ मग जाबसाल जो करण तो करू पेशजीचा कमादार नाकाबील मामलतीची घाण केली याजकरिता ती निशा राहिली तो कारभार आगदी राहिला आपणास कलावे

कलम १

नानाकडे जोडी गेली ती आद्यापी आली नाही बाजागी वर्तमान येकितो की **मामा** सजा (?) बुंदेले वगैरे जमा करून कालपीस गेले पत्रे आली नाहीत कलावे

कलम १

फडणीस व बक्षी व पोतनीस व पागेनीस मिलोन पंच्येवीस हजार दर आसामीस त्यास आम्ही तरी उतर साफच करितो परंतु आमच्या उतराने यास रुो प्राप्त होत नाही याजकरिता आम्ही उतर केले आहे की वरकडाकडील जाबसाल उरकून द्या मग आम्ही बोलणे ते बोलू आकारनामकाची ताकत तरी आम्हासी बोलावयाची नाही परंतु मकारनामक बोलतात त्यास वरकडानी येवज कर्जपटीचा दिला आणि आपणाकरिता सारा कारभार फिरू लागला तरी पंच्येवीस हजार रुपये त्रिंबकराव महादेव याजबाबत देऊन पंनास हजार रुपये त्रिंबकराव माहादेव याजबाबत व पंच्येवीस हजार चिमाबाई बाबत येकूण पाऊण लाख रुपये पेस्तर सालचे रसदेच्या यैवजी नवलाईस लाऊन घेऊ जेष्ट मासी यैवज उगवला बहुतेक करून देत तरी नाहीच परंतु येथील मनसबा येस पडला तरी करणे प्राप्त होईल कलावे

कलम १

सिलेदार याज कडील कारकुनी व माहालकरी याजकडील कारकुनी वसुलात आली त्यास यैवज माहालकरी याकडे लाऊन घेतला आहे महिनाभरा वसुलात आला म्हणजे रवाना करितो

कलम १

मकारनामक देशास आले तरी आम्ही समागमे येतच आहो इकडे कुशावास ठेऊन बंदोबस्त करून येतो

कलम १

यादिकी येथे मेळविल्या आहेत त्याची रवानगी मागून करितो पावतील कळावे

कलम १

गणोजी कदम वगैरे म्हराठे आपल्या ममतेत आहेत

कलम १

येणे प्रो येथील वर्तमान आहे सेवेसी कळावे हे विज्ञापना

---

**लेखांक ५३** ( पेशवा दप्तर ) { शक १६९२ श्रावण शु॥ ७ रविवार
इ. सन १७७० जुलै २९

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री भगवंतराव बाबा स्वामीचे सेवेसी पोष्य **बाळाजी हरि ढवळे** साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता॥ छ ६ रबिलाखर मुकाम कोहारी परगणे जलेश्वर वर्तमान यथास्थित असे विशेष आपण छ ४ रबिलाखरचे स्वदस्तुरचे स्मरणपूर्वक पत्र पाठविले तेणेकरून चितास परम आनंद जाहला तो पत्री कोठवर लिहावा देशाकडील वर्तमान तरी किल्ले निजगल हल्ला करून श्रीमंतानी घेतला तेव्हा आपाजी मुंढे व पोसरगीर गोसावी वगैरे लोक फिरकोळ ठार जाहले त्या उपरांतिक **गोपाळराव** व **रास्ते** व हुजुरातची फौज सात आठ हजार राजश्री **त्रिंबकराव मामा** समागमे कर्नाटक प्रांती छावणीस ठेविले त्या समागमे फडणिसीस राजश्री **बाजीपंत आण्णा** राहिले व कारकुनापैकी बाळाजीपंत फाटक गंगाधरपंत जोशी आणखी दोन असाम्या नव्या जदीद करून कारकुनाच्या ठेविल्या खासा स्वारी पुणियास श्रीमंतानी राजश्री **सखारामबापू** यास कारभार सांगितला म्हणोन बाजार अफवा आहे चिंतो विठ्ठल यास पालखी व घोडी पुणियाहून राजश्री नाना फडणविसानी नाशिकास आणायासी पाठविली ... ... ... ...

---

**लेखांक ५४** ( पेशवा दफ्तर ) { शक १६९२ मार्गशीर्ष वा॥ ५
इ. सन १७७० डिसेंबर ७

राजश्री **रामापा नायेक** सां॥ सुणकल गोसावी यासी अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य **माधवराव बल्लाळ** प्रधान आसीर्वाद सुहुरसन इहिदे सबैन मया व अलफ

साल मजकूरचे खंडणीच्या जावसालाकरिता आपलेकडून राजश्री दादापा कारभारी यास हुजूर पाठवून देणे म्हणोन दोन पत्रे सादर करून राऊत पाठविले असता दादापा संस्थान मजकुरी नाहीत म्हणोन तुम्ही लिहिले ऐशास स्वारी या प्रांती आली असता आपले वडील कारभारी हुजुर पाठवावा ते न करीता दादापा परिछिन्न गावी असता लटके बहाणे करून लिहिता व राऊतास गावात घेऊन दाणादुणा वैरण न देता मसाला देत नाही व कारभारी हुजुर पाठवीत नाही ऐशा मगरुरीच्या गोष्टी करीता म्हणोन राउतानी हुजुर विनंती गुदरली त्याजवरून हाली हुजुरने स्वारपागा दाहा व गाडदी शंभर पाठविले आहेत त्यास मासिक खर्च २००० दोन हजार देविले असेत आकारणे जाणीजे छ १९ साबान आज्ञा प्रमाण

---

**लेखांक ५५** ( पेशवा दप्तर )

शक १६९३
इ. सन १७७१

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बापूजी नाईक भाकरे स्वामीचे शेवेसी पोष्य **त्रिंबकराव विश्वनाथ** साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे विशेष सरकारचे फौजेचे खर्चाबद्दल यैवज पाहिजे येविसी तुम्हास समक्ष सांगितले आहे त्या अलीकडे येक दोन पत्री सूचना लिहिली त्यावरून तुम्ही तरतूद... ( पुढील एक चंद गहाळ )

रून ठेविलीच आहे त्यास सरकारचे खत तुमचे नावचे पंचवीस हजार रुपयांचे अलाहिदा राजश्री **अमृतराव बांडे** याजबरोबर पाठविले आहे ते घेऊन रुपये २५००० पंचवीस हजार मारनिल्हेबरोबर पाठवून देणे रुपये पोत्यास यावयास तुम्ही आपला शहाणा कारकून पाठवून द्यावा तो आपले गुजरतीने यैवज पोत्यास पारखून देऊन जाईल

---

**लेखांक ५६** ( पेशवा दप्तर )

शक १६९३
इ. सन १७७१

कर्नाटक प्रांते राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** याजकडे पाठवावयाबद्दल लोक तालुकेहाय व किलेहायचे आणविले त्याच्या सनदा रवाना केल्या सन ( इसने ) सबैन मया व आलफ

हुजरून येवज द्यावयाचे तालुके असामी

१५० किले राजमाची वगैरे निा नारो त्रिंबक
१०० किले पुरंधर व वज्रगड निा नारो आपाजी
१० किले नारायणगड निा रामचंद्र सिवाजी
६६ शामराव जगजीवन ३० किले चंदन ३० किले तार्थवटा ६ किले नंदगिरी = ६६
१५० ता सिवनेर निा उधो वीरेश्वर १००
१०० ता त्रिंबक निा कासी बल्लाल ५०
१५० ता धोडप निा बाजीराव आपाजी १००
५० किले प्रतापगड निा रामाजी महादेव ५०
५० ता पावा निा बालकृष्ण केशव
१० किले दातेगड निा माधवराव रामचंद्र २५
५० किले माहुली निा तुकोजी सिंदे ५०
३० ता कावनई निा खंडो गणेश
१०० ता मा ( मु ) ल्हेर निा लक्ष्मण विश्वनाथ
१०० किले शाहीगड निा सिवराम रघुनाथ
७५ किले मीरगड निा आनंदराव भिकाजी १००
२५ ता उंदरी निा रामाजी माहादेव

हुजरून येवज पा जातो ते तालुके

१५० ता कल्याण निा आनंदराव राम
१०० प्रां राजपुरी निा गोविंदराव रामाजी माणकर
१०० ता अंजनवेळ निा कृष्णाजी विश्वनाथ
२० प्रां बेलापूर निा बाजी गंगाधर
२०० ता रत्नागिरी निा कृष्णाजी हरि
७५ ता सुवर्णदुर्ग निा रामाजी महादेव
६० किले अमदानगर निा महादाजी नारायेण ५०
१०० किले अशेर निा जगन्नाथ नारायण
२५ किले चाकण निा नारायण रामकृष्ण
१०० किले सोलापूर निा रामचंद्र सिवाजी
१५० किले दौलताबाद निा धोंडो महादेव
१५० किले बागलकोट निा आनंदराव जिवाजी
१०० किले राजगड

---

**लेखांक ५७** (पेशवा दप्तर)

शक १६९२ माघ शुा ५
इ. सन १७७१ जानेवारी २१

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री बाबूरावजी स्वामींचे सेवेसी **आपाजी चिमणाजी गोंधळेकर** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष श्रीमंत माघ शुा ५ स पुणियास दाखल जाहाले शररिप्रकृत चांगली आहे कर्नाटकांत राजश्री **त्रिंबक-**

**रावमामा** आहेत यंदा फौजा तिकडे १० । १५ हजारपर्यंत राजश्री **कृष्णराव बलवंत** याजबरोबर मामाकडे रवाना केल्या बगाजीपंत व सदाशिवपंत करमरकर दोघे कारकून आपलेकडून समागमे दिल्हे हैदर नाईक श्रीरंगपटणात आहे खंडणीचा जाबसाल अद्याप नाही आपाजीराम त्याजकडून पुण्यातच आहेत याप्रो वर्तमान आहे **गोपालराव गोविंद** कर्नाटकात होते ते समाधान नाहीसे जाहले यास्तव मिरजेत आले होते १।२ दिवस मात्र मिरजेस आलेवर जिवंत होते मग देवाज्ञा जाली मोठे नावाचे माणूस होते येथून समाचारास **गोविंद हरि** याजकडे राजश्री **नारो आपाजी** यास श्रीमंतानी पाठविले **बालकोबा तात्यास** देवाज्ञा जाली तेही फार चांगले इसम होते ही दोन चांगली माणसे गेली ईश्वरी सत्ता प्रमाण

---

**लेखांक ५८** ( म. रे. ) शके १६९२, फाा शु. ३, रविवार } { शक १६९२ माघ वाा १२ इ. सन १७७१ फेब्रुवारी ११

राजेश्री द्वा द सी **मलपा नायेड** साा मुाा कोकटीपाले गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य———रो **त्रिंबकराव विस्वनाथ** आसीर्वाद सुाा इहिदे सबैन मया व अलफ पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले जमाव जमा करून किले मजकुरी जाऊन धन्याचे रुपे करून किला फते: केला हे वर्तमान लिहिले ते कळले ऐशास किला अवघड व चिन मलपा नायेड लबाड किल बर्कायेत याषद दरीविला तुमची स्थलची कैफियत तमाम वकील येऊन हुजूर आर्ज केलेवरून आर्ज खातरेस आणून सरफरज फर्माण सित्धार्थी संवत्सराची खंडणी·········कसबा सुधा मौजे १४ सिरसोर··· ···तपशील १२००० रुवये

६००० साल बाकी ( ? ) रुपये

६००० हाल जास्ती रुपये

मोबलग बारा हजार रुपये मोकरर करून तुमचे स्थल तुम्हास बहाल करून दिल्हे आहे तरी सदरहू बारा हजार हप्तेबंदी तीन खिस्तां पैसे झाड्यानिसी खजानेस पोहचऊन रसीद हासील करून घेऊन रयत रजावंदीने अमल करून सरकार कामास ज्या वख्ती हुकूम पोहोचेल त्या वख्ती येक जरा दिरंग न करता जमीयतनिसी येऊन सरकार कामास······ करून फिदवीयेत व खैरियत ······ उजूर न करणे तुमचे सरहादेत चोरी छेपी जाला असता किंवा ······ कम गोष्ट कोणी केलीया उपरी तेथील संस्तानची बंदोबस्ती करून रयेतीस कौल देऊन रयेत जागा जागा गेली असेल ते आणून आबाद करवणे व हुजूर सरकारात पेषकसीचा ठराव करून हप्तेबंदी करून हप्तेबंदीप्रो ऐवज हवेली गुरुमकोंडा येथे पोहचाऊन ······ उपसर्ग लागणार नाही येविसी बाजी रघुनाथ यासी ताकीद हुजूरची पाा असे त्याप्रो

बंदोबस्त करून देतील किल्यास बेहयुदी सरंजाम वगैरे गाव विला······ सरंजाम तुम्ही गावगना ताकीद करून घेणे किल्यावर सरकारचे दरोबस्त लोक राहतील खाली कोकंतीत ठाणे तुम्ही आपले लोकाचे ठेवणे त्याणी याणी येक विचारे राहावे जाणिजे छ १ जिल्काद बहुत काय लिहिणे ( लेखन सीमा ) सिका

---

लेखांक ६० ( पेठे ) } श्री व्याडीश्वर { शक १६९२ फाल्गुन वद्य १० इ. सन १७७१ मार्च १०

नकल

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक **त्रिंबकराव विश्वनाथ** नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत छ २२ जिलकाद पावेतो स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेस टुमकूर नजीक देवरायदुर्ग येथील मुकामीहून स्वामीच्या शेवेसी पत्रे लिहून पाठविली आहेत त्याजवरून सविस्तर वृत विदित जालेच असेल त्यास स्वामीची वारंवार पत्रे येत होती तेथे आज्ञा कीं मातबर फौज व तोफखाना जमा जाहला आहे आतःपर मातबर कार्य करावे बिदनूर प्रांती फौज सुधा जाऊन महसरा ( वेढा ) द्यावा दर्यातून आरमार रवाना केले आहे खुसकीने विसाजी केशव रवाना केले आहेत दोन्हींकडून दुरोख ( = दुतर्फा ) शह पडल्यास बिदनूर हस्तगत होईल हैदरखानाची कंबर मोडल्या आर्थे आज्ञा येत होती ऐशास मातबर स्थळ हैदरखानाचे बिदनूर ते राखणे त्यास जरूर तथापि स्वामींच्या आज्ञेप्रो टुमकुराहून कूच करून हेबुरावर आलो तो हैदरखान सातआठ हजार फौज व चाळीस तोफा व पंधरा हजार गारदी बारवाले व फिरंगी सिवाय प्यादा वगैरे बेमालग बाण घेऊन मोठे तरतुदीने मागडीवर आला चोरीछपीने छापा घालावा या अर्थे येक दोन वेळा तयार होऊन यावयाचा विचार केला येकदा तरी तीन कोश निघोन आला हजार दोन हजार दिवटीचे पोत करून बैलाचे सिंगास बांधोन लष्कराकडे बैल पिटावे त्यारोखे आमचे फौजेने जावे आणि आपण निराळेच येऊन गोटावर पडावे इत्यादीक गुप्त बातम्या जागा जागा बारीक होत्या बातमी येऊन पोहोचताच येकंदर फौजेची तयारी करून गोटाबाहेर जाऊन उभे राहिलो त्यास वर्तमान कळताच माघारा जाऊन मागडीच्या रानात आवळून राहिला आम्ही कूच करून त्याचे समोर भैरवदुर्गाजवळ येऊन हेबुराजवळ मुकाम केला हैदरखानही बिदनूरच्या झाडीत सिरल्यानंतर मग आम्हास झाडीत सिरों देईल हा भरवसा न पुरे या अर्थे बिदनूरचा रोख सोडून तुरविकीच्या वर आलो तो ( हैदरखान ) मागडीच्या झाडीतून हैदरखान नागमंडळावरून मेलकोटे देवाचे चौफेर बिकट जागा त्याचे आश्रयास येऊन राहिला ते बातमी आम्हास कळताच खडी करून राजश्री कृष्णराव बळवंत

याजबरोबर नीळकंठराव थोरात व सखाराम हरि व भवानजी वाघ व महिमाजी मुंढे अंताजी माने दोरगे निगडे मंडळी वगैरे फौज देऊन रवाना केले त्यास सखाराम हरि व नीळकंठराव थोरात व महिमाजी मुंढे व भवानजी वाघ व अंताजी माने व दोरगे निगडे पुढे गेले तेव्हां ते वर्तमान कळताच हैदरखानाची हजार दीड हजार फौज गोठ सोडून पुढे आली होती त्याजवर चालून घेतले मागे उपराळीयास कृष्णराव होते तेव्हां हैदरखानाचे फौजेस उधळून मारीत ( मारीत ) गोटात नेऊन घातले अडीच तीनसे हैदरखानाचे घोडे पाडाव करून आणिले ते समई हैदरखानाची फौज तोफा व गाडदी पुढे घालून तोफांची व बाण व जेजालाची मारगिरी केली आणि जराभर मागे सरोन मेलकोट्याचे पश्चिमेस माचीपुढे तोफा रोखुन आरण्यानें राहिला ही बातमी कळल्यानंतर दुसरे दिवसी आम्ही मेलकोटे डावे टाकून त्याणि तोफा पसरून राहिला होता तिकडून कसे आहे हे पाहावयास गेलो तो झाडीत गेल्यानंतर आत कोसभर पावेतो मैदान होते चौफेर डोंगर व कडे तुटले होते त्या मैदानात जाऊन तेथे तोफा सुरु कराव्या तो हैदरखानासारखा सामापूर शत्रु समयोचित चालून आला तर तोफा बाहेर येणें कठीण या अर्थी तेथे छावीन्यास वामनराव व आनंदराव गोपाळराव धायगुडे गाईकवाडाचे पथक सुद्धा सारी फौज पश्चिमेच्या मैदानात ठेविली आम्ही मेलेकोट्याचे डोंगरावर तोफा चढवून तेथून त्याचे लष्करावर मार दिल्हा तेव्हा त्याणी ती जागा सोडून किल्ल्याचे पोटांत नाले पाहून तोफांचा मार चुकवून डेरे दिल्हे उपरातीका पुढे डोंगर होता त्याजवर चौक्या बसऊन बाण लाविले व जेजालाच ठेऊन जेजालाचा मार देऊन तोफा तेथे चढवावयाचा विचार करून एक दोन तोफा चढवावयास लाविल्या तेथून मार बसल्यास आपला परिणाम नाहीं हा अर्थ हैदरखानानी चितात आणोन छ १८ जिलकादी दोन घटका रात्रीस तयार होऊन कूच केले तो आम्हाकडे बातमी नाहीं वामनराव वगैरे पश्चिमेस होते ती वाट चुकवून दक्षिणेकडे थोडे खिंड होती त्या मार्गाने पटणास चालिले सरकारच्या डोंगरावर चौक्या होत्या त्याणी त्याचे तळावर सामसूम पाहून हैदरखान गेला ही बातमी घेऊन सरकारची माणसे आले परंतु खरं लटके न कळे कडूर बाणावरचे वाटेनें चिदनूरचे रोखे गेला किंवा पटणचे मार्गे गेला हे तथ्य न कळे मेलेकोटे डावे टाकून कडूर बाणावरचे मार्गाने काही फौज व पटणचे कृष्णराव बळवंत फुटोन फौजसुद्धा पुढे मध्यरात्रीस रवाना केले इतक्यांत हैदरखान तळ सोडून कोस दीड कोस चालिला त्यांतून त्याचे लष्करचे दोघे तुरुकस्वार पळून आले त्याणी बातमी सांगितली कीं हैदरखान पटणचे मार्गे चालिला त्याजवरून आम्ही तेच समई नगारा करून व फौजसुद्धां व तोफा बरोबर घेण्याची तयारी करून ठेऊन तयार होऊन पटणचे मार्गे चालिलो त्यास पुढे पटणचे वाटेवर छावीना होता त्याची व हैदरखानाची गाठ पडली तेव्हां आम्हाकडे व वामनराव याजकडे खबर कळाली वामनराव यास वर्तमान कळताच तेही तिकडून घेऊन

पोहोचले कृष्णरावही चार घटका रात्र असता पोहोचले तेव्हा लढाई सुरू जाहली तो त्याणी तोफा चौफेर पसरून गारदी व फिरंगी घारवाले यांचे बुरुज बांधून मोठे कवाइतीने लढत पटणचे मार्गे चालिला तोफा व बाण व फिरंग्याची मारगिरी अतिशय केली ते लिहिणेत येत नाही तो आम्ही सुर्योदयी छ १९ रोजी फौजसुद्धा येऊन पोहोचलो चौफेर फौजा घातल्या परंतु त्याचे मारापुढे घोडे व हत्ती तोंड पुढें न करीत ते समई तोफा येऊन पोहोंचल्या नाहींत याजकरिता कांहीं उपाय न चाले ज्याप्रकारें चित्रांत फिरंगी गारद्याचे बुरुज ( बांधून ) लढाई करितात त्याप्रमाणें गोल बांधून बरकंदाजी बाण व तोफाची मारगिरी बेहद्द करीत लढत चालिला पटणापासून तीन कोसावर मोतीतळ्यावर आला तो आम्ही तळ्याचे आश्रयाने चालते होताच हैदरखान माथ्यावरून चालत होता पिछाडीस कांही हुजूरात व उभयता रास्ते व घोरपडे याची फौज दौलतराव घोरपडे सुद्धां होते उजवे बाजूस वामनराव आनंदराव गोपाल व धायगुडे व गाईकवाड याची पथके होती इतक्यांत जिलिबी तोफा येऊन पोहोचल्या त्या सुरू केल्या तो मागाहून दुसरे तोफा दोन माही थोर येऊन पोहोचल्या मारगिरी येक दोन रजकाची झाली गोळे त्याच्या लष्करात पडताच लष्कर बुरुज बांधून चालिले होते ते गलबलून कांहीं अंतर पडले इतक्या अवसर पाहून स्वामीचे नांव घेऊन निशाण चालविले तो हुजुरात पथकेही जलदीने निशाणाजवळ येऊन पोहोचली वरकड वामनराव आनंदराव व गोपालराव व धायगुडे व गाईकवाडाचे पथक व मुरारराव घोरपडे व यांचे तर्फेने मालोजी घोरपडे व खंडेराव कडपेकर याजकडील महिपतराव व मल्हार तमाम सारे सरदाराची निकड करून घोडी चालविली तेव्हा हैदरखान पुढें चालिला होता मागे तोफा व गाडदी फिरंगी याचे बुरूज बांधिले होते ते उधळून हैदरखानापावेतों निशाण घेऊन पोहोचलो तेव्हा हैदरखानानी तळ्यासमीप डोंगर होता त्याचा आश्रय डोंगरावर पाच सात हजार माणसानिशी सडा जीव मात्र घेऊन चढला तमाम त्यांची फौज मारून ताराज केली मोठी लढाई जाली तेव्हां तोफा पंचवीस व दहाबारा हत्ती व पाच सात हजार घोडे व खजिना सरकारात पाडाव जाला सारा सलताना लुटून फौज मारून ताराज केली दोन हजार माणूस कापून काढिले त्याची जरि निशाणे हौदे अंबारी साहेबा नौबत पाडाव केली हैदरखान डोंगरावर चढला तेथून येक वेळ चालून आला तेव्हा मारून उधळून लाविला उपाय न चाले तेव्हा डोंगरावर चढला त्याजवर आम्ही दोन हजार फौज घेऊन जलद डोंगर टाकून पटणास पटणच्या वाटेनें डोंगराखाली जाऊन पोहोचलो इतक्यांत चार घटका अवकाश पडला याजमुळे हैदरखान येक दोन राऊतानिसी अगोधर पळोन पटणास गेला डोंगरावर लोक व सरदार होते त्याणी कौल मागितला त्याजवरून त्यांस जिवे-मात्र सोडून द्यावे याप्रमाणे कौल देऊन हातेर वगैरे घेऊन सोडून दिल्हे लालमिया

व मीररजा व लोला बक्षी वगैरे सरदार यांचे पाचसात धरून आणिले व कित्येक लढाईंत ठारही झाले वरकड लोकात हैदरखान राहातो ओळखी माणसे घालून चौकशी केली परंतु न सापडला हजार माणूस त्याणी दाती तृण धरीत असता त्यास आपले लोक मारीत नाहीत या अर्थी सोडून दिल्हे मीरफौजुला बरोबर होता परंतु त्याचे ठिकाण लागलं नाहीं लढाईत पडला किंवा कोणास तरी सापडला हे ठिकाण लावति असो स्वामींचे पुण्यप्रतापे स्वामींची आस्मानी फते जाली सरकारच्या फौजेतील माणूस व घोडे फार जखमी व ठार आले आम्हास गोळीची जखम डावे कानास लागली गोळी निघोन गेली लवकरच जखम बरी होईल हे वर्तमान सेवेसी अधिक उणे जाहले याजकरिता लिा आसे नीळकंठराव त्रिंबक गोपाळराव यांचे बंधू व अंताजी माने पागेकडील कामास आले कृष्णराव बळवंत यांचे घोड्यास गोळीची जखम लागली आनंदराव याचा गेंद घोडा पडला व लढाई मोठी शर्तीची जाली हुजुरात व सरंजामी सरदार यानी निकड फार केली सरकारच्या निशाणाच्या हत्तीस गोळा पायास लागला तो कापून काढला खैर जाली लष्करचे घोडे फार ठार जाले व मोतद्दार फार जखमी जाले व ठारही जाले याचा तपशील मागाहून सविस्तर लिहून पाठवू स्वामींची फते जाल्यामुळे आनंदित जाले याची क्षीत वाटत नाहीं येक नीळकंठराव फारच चांगला माणूस त्या मंडळी-मध्यें होता तो पडल्यामुळें फार श्रम जाले लढाईचा प्रसंग या गोष्टी प्राप्तच आहेत सेवेसी श्रुत होय हे विनंति*

---

**लेखांक ६१ ( वैद्य )** { शक १६९३ चैत्र शुा ५<br>इ. सन १७७१ मार्च २१

तीर्थस्वरूप राजश्री **रामाजीपंत बावा** वडिलांचे शेवेसी आपत्ये **गोपाळाने** दोनी कर जोडून सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा चैत्र शुा ५ पावेतो वडिलांचे आसीर्वादेकरून मुा प्राा वाई येथे सुखरूप असे विशेष वडिलाकडील वर्तमान बहुत

---

* १ पेशवा दप्तर भाग ३७ मध्यें पान १८४ लेखांक २२६ चें पत्र त्रिंबकराव विश्वनाथाचेंच मोतीतलावाच्या लढाईसंबंधीचें आहे; परंतु त्यांत व या पत्रांत बरीच तफावत आहे. या पत्रांतील प्रथमच्या कांहीं ओळी पे. द. ३७ च्या २२६ च्या लेखांकांत मुळींच नाहींत.

२ मोतीतलावाच्या लढाईनंतर मराठे सैनिक तेथील भागांत १० दिवस लुटालूट करण्यांत गुंतले होते; अशी विल्क्स, बानर्जी, सिंह वगैरे ग्रंथकारांची समजूत आहे, परंतु ती चूक आहे. कारण खरे, लेखांक ११२२ व ११३२ वरून त्रिंबकराव ता. १०-३-१७७१ रोजीं सर्व सैन्यासह श्रीरंगपट्टणच्या किल्ल्याजवळ आला होता, म्हणजे मोतीतलावाच्या लढाईनंतर दोनच दिवसांनीं, हें सिद्ध करतां येतें.

दि्वस कलत नाहीं तरी येते न करावे सदैव आलिया माणसाचराबरी आसर्विाद्पत्र पाठवून सांभाल करीत गेले पाहिजे व मजकुडील वर्तमान तरी सर्व यथास्थित असे व दरबारी वर्तमान तरी श्रीमंत राजश्री **त्रिंबकरावमामा** यानी हैदरीचा मोड केला हैदरी श्रीरंगपटणा........तीन मजली बाहेर इकडीच्या आसन्याने आला होता ते वर्तमान त्रिंबकरावमामास कलले त्यास हैदरी झाडी सोडून श्रीरंगपटणास फिरोन जाऊ लागला येक मजले मैदनावरी गेला तो ह्या बातमी लागली मग त्रिंबकराव-मामा जाऊन छापा घातला त्याचे सामान[1] तोफा २० बाणाचे उंट २०० व राऊत १०००० व पायदळ २०००० वीस हजार व हाती ५० पन्नास येसे सापडले व **हैदरी** सडा दोनसे रावतानिसीं पकडला[1] व सरदार हैदरीचा........सापडला व गाड्याचे सरदार २ दोन व रावताचा सरदारही सापडला येसे हैदरीचे वर्तमान चैत्र शुा १ आले तोफखान्यावरील सांडणीस्वार आला त्यास इनाम दिल्हा सोन्याची कडी २ व आख १० ताडपत्री पासोडी येसे दिल्हे येसे हैदरीचे वर्तमान जाहाले व दिलीही श्रीमंतानी घेतली वडिलास कलावे म्हणोन लिहिले आहे व तेथून कागद आला त्याची नकलही करून पाठविली आहे ही नकल आपण वाचून तर्थिस्वरूप मातुश्री आत्याबाईकडे लागवनास पाठविणे विशेष काय ल्याहावे बहुत काय लिहिणे रुपा लोभ असो दीजे हे विज्ञापना (यापुढील मजकूर किरकोळ सबब गाळला आहे)

---

**लेखांक ६२** (पेशवा दप्तर)

{शक १६९३ चैत्र शुा १३
{इ. सन १७७१ मार्च २९

श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबांचे सेवेसी विनंती सेवक **बापूजी सिंदे** रुनानेक साष्टांग दंडवत विज्ञापना ताा छ १२ माहे जिल्हेज परियंतचे वर्तमान येथास्थित असे विशेष छ १३ सवालचे आज्ञापत्र सादर जाले ते छ ११ मीनहूस पावले तेथे आज्ञा जे हैदरखान याजकडील कादरखान वगैरे असामी चौदा हुजूर आणिले होते त्यास राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** याणी आणविले याजकरिता सदरहू असाम्या तुम्हाकडे पाठविले आहेत यास सिन्याम बंदोबस्तीने ठेऊन त्रिंबकराव विश्वनाथ यास लेहून पाठविणे त्याचे लिहिले तुम्हास येईल त्याप्रो वर्तणूक करणे म्हणून आज्ञा त्याप्रो **कादरखान** वगैरे आसामी चौदा किल्यात बंदोबस्तीने ठेऊन राजश्री त्रिंबकरावमामा यास लिहून पाठविले आहे तेथून उतर येईल त्याप्रो वर्तणूक करितो * सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

१ त्रिंबकरावमामांनें जिंकलेल्या मोतीतलावाच्या लढाईचें वर्णन थोडें अतिरंजीत आहे.

* येथून पुढील अक्षर निराळें.

**लेखांक ६३** (पेशवा दप्तर)

{ शक १६९३ अधिक आषाढ वा। ११
{ इ. सन १७७१ जुलै ८

श्रीमंत महाराज राजश्री त्रिंबकराव साहेबांचे शेवेसी आज्ञाधारक **कमलकापा** विभूतराव कृतानेक दंडवत विशेष प्रार्थना येसी जे येथील क्षेम ता। छ २४ रविलावलपर्यंत साहेबांचे कृपाकटाक्षेकरून ठाणे कदकूर येथे सुखरूप असे विशेष काली येथून साहेबाकारणे उल्फा व तांदूळ वगैरे येशवंतराव मोरे याजबरोबर सेवेसी पाठविले होते ते पोचलेच असेल त्याचे प्रतीउतर अद्यापि सादर जाहले नाहीं प्रस्तुत कुंचल किला हस्तगत जाहला म्हणोन श्रवण जाहले यैशास येथील जेजाला येथे ठायेयाचे होते ते समई मीरसाहेब याने कुंचल किलेत नेऊन ठेविल्या आहेत म्हणोन साहेबांकारणे विनंतीपत्र लिहिले असे तरी धनियाने कृपा करून आठ १ हा जेजाला पाठविलिया येथें दर तुडेस येक ठेवावयास येईल किला साहेबाचा आहे मीही सेवक पदरीचा आहे दारुगोलीचे साहित्य केलिया उतमच आहे किल्याची सर्व प्रकारे उस्तवारी होईल यदर्थी विशेष काय लिहिणे शाक्ति न व्हे हे विज्ञापि रंग समुद्रचे ऐवजापैकी रुपये १५० दीडसे हे सेवेसी पाठविले आहेत घेऊन पावलेचे उतर पाठविले पाहिजे तेथील रयत घटवालचे मुलखात जाऊन बैसली आहे गावनेस त्यास धणीयानी सर्व प्रकारे ताकीद करून ठाणे रंगसमुद्र येथें रयेत ठेऊन गावची लावणी संचणी करीतसे करणार धणी आसा विस्तार काय लिहिणें शक्ति नव्हे हे विज्ञाप्ति

---

**लेखांक ६४** ( पेशवा दफ्तर )

{ शक १६९३
{ इ. सन १७७१ १

सेवेसी स्वरूपजी खुळे विज्ञापना ऐसी जे स्वामीचे आज्ञापत्र आले कीं या मुलकात रांडापोरे गोटात आणली असली तर डेरियास आणून हजर करणे ऐसियास आमचे गोटात कोणी रांडापोरे आणिली नाहींत गोटात ताकीदही केली असे पुढेही आणणार नाहीत आणि वैरण कडबाही कोणी जाळीत नाही आज्ञेप्रमाणे ताकीदही केली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

**लेखांक ६५** ( म. द. ) श्री

{ श. १६९३ श्रावण शु॥ २
{ इ. स. १७७१ ऑगस्ट १२, सोमवार.

७. अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री शेषाचलपती नायेड सां। पेद्पाले गोसावी यासी

१

श्रो। **बाजी रघुनाथ** नामजाद सरकार गुरुमकोंडा वगैरे प्रांत कडपे आसीर्वाद सुा। इसने सबैन मया व आलफ सा। मजकूर येथील साल मजकूरचे खंडणीचे जायसालास सुभा येणे म्हणोन पत्र सादर केले होते त्याजवरून तुम्ही येऊन रा। नरसो गोविंद वकील यांचे विद्यमाने संस्थानचे नातवानीचा अर्ज केला व पेशजी सरकारचा आमल होता ते कारकीर्दीतील राजेश्री भगवंतराव त्रिंबक याणी पेशकशी घेतली ते सनद आणून दाखविली व सालगुजस्ता सन इहिदे सबैनात हुजूर श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव मामा** याणी खंडणी चुकविली ते सनद आणून दाखविली त्याजवरून व संवस्थानचे नातवानीवर नजर देऊन हुजुरचे सनदेप्रो। देखील बतलापूर व चतूर कायेलकोण पेषकशीचा ठराव

३००० येन खंडणी
५०० सुभा नजर
येकूण तीन हजार पाचसे यासी हाफ्तबंदी
१२०० आस्वीनमास १२०० माघ मास ११०० वैशाख आखेर

३५००

येकूण पसतीससे रुपये करार करून देऊन हे सनद सादर केली असे तरी हप्तबंदीप्रमाणे येवज पावता करून पावलियाचा जाब घेणे व सरकारात येकनिष्ठेने वर्तणूक करून सुखरूप राहणे छ १ जमादिलावल बहुत काय लिहिणे (मोर्तब शूद)

बार

---

**लेखांक ६६** (म. द.)
नकल

श. १६९३ श्रावण शुा २
इ. स. १७७१ ऑगस्ट १२ सोमवार

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री कुमार मलपा नायेड सा। सामपली गोसावी यासी

श्रो **बाजीराव* रघुनाथ** नामजाद सरकार गुरमकोंडा वगैरे प्रांत कडपे आसीर्वाद सुा। इसने सबैन मया व अलफ सा। मजकूर येथील मुक्कामी साल मजकूरचे खंडणीचे जायसालास सुभा येणे म्हणोन पत्र सादीर केले होते त्याजवरून तुम्ही येऊन रा। सिवाजी सुबराव वकील याचे विद्यमाने सानचे नातवानीचा अर्ज केला व साल गुा। सन इहिदे सबैनात हुजूर श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव मामा** याणी खंडणी चुकविली ते सनद आणोन दाखविली त्याजवरून व पूर्ववत चालत आल्याचा

---

* ह्या बाजीचा मुद्रा ' बालकृष्ण चरणी तत्पर । बाजी रघुनाथ निरंतर अशा मजकुराची असे.

भोगवटा मनास आणोन सांचे नातवानींवर नजरेचे देऊन हुजूर सनदे प्रो साल मारचे खंडणीचा ठराव रुपये

१००० येन खंडणी
२०० नजर सुभा निसबत

१२००

यासि हफ्तबंदी

| आश्वीन मास | माघमास | वैशाखमास |
|---|---|---|
| ४०० | ४०० | ४०० |

१२०००

येकून बाराशे रुपये करार करून ...... हे सनद सादर केली असे तरी हाफ्तबंदीप्रमाणे येवज पावता करून पावलियाचा जाब घेणे व सरकारात येकनिष्ठेने वर्तणूक करून सुखरूप राहणे छ १ जमादिलावल बहुत काय लिहिणे

---

**लेखांक ६७** ( पेशवा दप्तर ) { शाक १६९४ / इ. सन १७७२ }

यादी खंडणीबद्दल नबाब **हैदर अलीखान** विा **त्रिंबकराव विश्वनाथ** स्वारी कर्नाटक सन सलास सबैन मया व अलफ संस्थान श्रीरंगपटण वगैरे येथील खंडणीचा येवज हाा सम तिसा सितैन ताा सन इहिदे सबैन तिसाला व मागील बाकी मिळोन करार रुपये ५०००००० ( पन्नास लक्ष )
स्वारींत लिहिला आहे त्या प्रो रुपये

५०००००० मुाा पुणे गुाा **आपाजीराम राम** होन हैदरी नाणे ११७६४॥ दर ४। प्रमाणें स्वारीत मजुरा दिल्हे आहेत त्या प्रो रुपये

२३११६७९॥ स्वारी मजकुरी वसूल सन सलास ५३७६६५ छ रावर ५३७६६५
४२५००० होन हैदरी नाणे १००००० दर ४। प्रमाणे
१२६६५ होन सणगरी नाणे २९८० दर ४। प्रो
१००००० नक्त

५३७६६५

२०२५ ८= छ १० जमाावल गुा सुबराव श्रीनिवास वगैरे कारकून दिा मुरारराव घोरपडे सेनापति संस्थान मजकूर वगैरे येथील खंडणीचा ऐवज करार केला त्या ऐवजांत जवाहीर आले त्या प्रो मुरारराव घोरपडे यास दागिने देविले त्याची किंमत होन हैदरी नाणे

१७७१९८९ ॥।- छ १३ जाासर पाच लक्ष रुपये द्यावयाचा करार त्याचा भरणा सरकारांत गुा कृष्णाजी अनंत कारकून दिा रास्ते बाा यादी होन हैदरी नाणे ( पुढील सर्व तपशील गाळले आहेत )

२३११६७९ ॥।=

एकूण रुपये २३६१६८० ८=

बाकी रुपये २६३८३१९ ॥।=

तपशील

१९००००० हमेमंदीने मुरारराव घोरपडे सेनापति याजकडे येवजाची सावकारी निशा करावी येणे प्रो करार केला ते

६००००० जवाहीर व हती द्यावयाचा करार त्या प्रो जवाहीर रत्नशालेकडे व हती पलिखान्याकडे रवाना

१३८३१९॥।= आपाजीराम याणी पुणियात द्यावे म्हणोन हवाला घेतला होन हैदरी १००००० दर ४।· प्रो ४२५००० प्रो सरकारात जमेस आले २८४६५५ बाकी आपाजीराम याजकडे येणे म्हणोन वजा घातले आहेत ते रुपये १४०३४५ पैकीं वजा सुबराव श्रीनिवास वगैरे कारकुन दिा मुरारराव घोरपडे सेनापति रु. २०२५८= सदरहू वसूल हवाल्या प्रो आहे की काय याची चौकशी होणे

* २६३८३१९ ॥।= बाकी येणे रुपये

---

**लेखांक ६८** ( पेशवा दप्तर ) श्री { शक १६९४ ज्येष्ठ शुाा १० इ. सन १७७२ जून १० }

श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव मामा** स्वामीचे सेवेसी सेवक **आपाजीराम** कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना लिहून दिला कारणे रोखा ऐसा जे नवाब

हैदरअलीखान याजकडील खंडणीचा जायसाल विरुनु संवत्सरपर्यंत ठरावत आला त्यापैकीं रोख यैवज तूर्त पंचवीस लक्ष द्यावे त्यापैकी आपण खुद निसबत हैदरी होन बेरीज १००००० येक लक्ष सिरस्ते प्रो कबूल करून हवाला घेतला आहे सदरहू यैवज क्षेपनिक्षेप खुद निसबत देऊन पत्र सवत्सरे जेष्ठ सुा १० मी बुधवार बी कलम ३०

* १ विल्क म्हणतो कीं हैदरनें ३० लाख व पाच लाख दरबार खर्च याव-याचा करार केला व यापैकीं १५ लक्ष रोख व दरबार खर्च तावडतोब द्यावयाचे ( Wilkes Vol. I पान ३८५ )

२ खरे लेखांक ११७१ सांगतो " ऐन खंडणी पन्नास लक्ष व दरबार खर्च दहा लक्ष असा ठराव झाला. तूर्त अठ्ठावीस लक्ष, बत्तीस लक्षाची सावकारी निशा करून द्यावी. अठ्ठाविसा पैकीं तूर्त दोन लक्ष रुपयांचें जवाहीर व एक लक्ष ऐन हस्ती. एकून तीन लक्ष रुपयांचा ऐवज लष्करांत आला

३ डफ म्हणतो ३६ लक्ष व १४ लक्ष मागील बाकी असा खंडणीचा करार झाला.

४ पे. द. ३७ ले. २३३ त्रिंबकरावाचें खुद्द पत्र म्हणतें ' पंचवीस लक्ष रोख व जवाहीर व हत्ती यासिवाय सा लक्षाचे माल येकून येकतीस द्यावे. ऐकूनतीस राहिले ते वर्षांत तिही मुदतीनीं दर सा लक्ष तेतीस हजार या प्रो दस्तऐवज द्या असा करार झाला. या सर्व गोष्टींवर परील अस्सल कागदामुळें बराच प्रकाश पडतो.

---

**लेखांक** ६९ ( पेठे ) नकल } श्रीध्याडीश्वर { शक १६९४ आषाढ वा। १२ इ. सन १७७२ जुलै २७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **विसाजी केशव** ( कृष्ण ? ) स्वामी गोसावी यासी पोष्य **माधवराव बल्लाल** प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाले जाबेतखान रोहिला याणी अंतरवेदींत सरकारचे.........दाबले आपल्या मर्दुमीची उमेद राखीत होता याजकरिता त्याचे पारपत्य करावे हा मनसुबा राजश्री **तुकोजी होळकर** व **महादजी शिंदे** याचे विचारे करोन फत्तरगडास श्रीगंगापार जाल्यास सिद्धता करून गेलो तो गंगेस पाणी फार आसता प्रार्थना करताच स्वामीच्या पुण्यप्रतापे करून भागीरथीनी उतार दिल्हा तेच समयी पार गेलो तेव्हां जाबेतेखान तयार होऊन लढाईस संमुख जाहाला तोफखाना व जंगी सामानाचा मार आतिशय केला तत्रापि सरदार लोकानी जीवित्वाकडे न पाहता स्वामिसेवेवर नजर देऊन तोफखान्याची मारगिरी दिऊन चालून जाऊन सफेजंग लढाई छातीचा कोट करून प्रहर दोन प्रहर मर्दुमीनें बेजयान युद्ध होऊन रोहिल्याचे पारपत्य करून

त्याचा फतरगड काबीज केला स्वामीचा पुण्यप्रभावेकरून फत्ते केली म्हणोन विस्तारे लिहिले तो श्रवण होऊन फार संतोष जाहाला **जाबेतखान** रोहिला पातशाहीत फौजेने व मर्दुमीनें अती गर्वीत होता तुम्ही सर्वांनी येकदील होऊन रोहिल्याचे पारपत्य केले ही गोष्ट अति उत्कृष्ट केली उभयता सरदार व तुम्ही व हुजरातचे लहानमोठे सरदार व लोकानी जिवाकडे व घोड्याकडे न पाहता जिवापेक्षा श्रम करून रोहिल्याचे पारपत्य केले धन्याचा नक्षा नामुष हिंदुस्थानात वृद्धिंगत केलात शाबास तुम्ही सर्वांनी यामार्गे येकनिष्ठेने सेवा करून स्वामी कृपा संपादली सांप्रत तरी विशेषात्कारे कृपेस पात्र जाहाला सिंदे होळकर याच्या वडिलानी महत्कार्य करून शत्रु पादाक्रांत केले त्याच रीतीने हेही करतात या दौलतीचे स्तंभ आहेत हिंदुस्थान काबीज केले परंतु या रीतीने म्हणावयास तीर्थस्वरूप कैलासवासी आप्पासाहेबी दया बहादुर सुभा उज्जनीचा ...... बुडविला व वसईचा फिरंगी नस्तनाबूद केला त्याप्रमाणे तुम्ही व सरदार सर्वांनी रोहिला गारद केला येविसीची तारीफ किती ल्याहावी सारांश हिंदुस्थानातील राजेरजवाडे याजवर जरब बसवोन उत्कृष्ट पराक्रम केलेत याउपरी कोडो पैका मिळावयाचा प्रसंग आहे येतद्विषईची तरतूद तुम्ही करीतच असाल पैका मातबर मिळवून हुजूर पाठवावा अंतरवेदीत माहालाचा तह करून कमाविसदार करार करून रसद घेऊन हुजूर पाठवावा राजश्री **त्रिंबकराव विश्वनाथ** याणी हैदरनाईकास लुटून पस्त केल्याचे वृत्त लेहून पाठविले आहे सांप्रत काळी उत्तर व दक्षिणेस दोन्ही कर्मे वडिलाचे पुण्यप्रतापे महद्यश प्राप्त जाले वरचेवर वर्तमान लिहीत जाणे जाणिजे छ २५ रावर

---

**लेखांक ७०** ( पेशवा दफ्तर )

शक १६९४ भाद्रपद वा ५
इ. सन १७७२ सप्टेंबर १७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **हरिपंत तात्या** स्वामीचे सेवेसी सेवक **रघुनाथ बावाजी** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष येथील कुशल ता। भाद्रपद बहुल पंचमी जाणून स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री **त्रिंबकराव मामा** फौजसुद्धा आषाढ अखेरीस निघोन देशास गेले या प्रांती काही फौज राहिली नाहीं पट्टणचे वर्तमान तरी हैदरखान पट्टणात आहे फौज व बारवाले ठेवीत आहे पेशजी प्रमाणे लोकास अटक नाहीं येणार नी जाणार त्यास निरोप देतो यापरी मोकलीक आहे बाहेर निघावयाची वदंता आहे कोणीकडे जाणार हा निश्चय कळत नाहीं पुढे जे वर्तमान होईल ते सेवेसी लिहिले जाईल......

---

**लेखांक ७१** ( पेशवा दफ्तर ) { शक १६९३ ज्येष्ठ शुा १० / इं. सन १७७१ मे २३

सेवेसी **त्रिंबकराव विश्वनाथ** कृतानेक साष्टांग नमस्कार विशेष येथील वर्तमान ताा छ ७ सफर पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष ह्यातखान सांडणीस्वार दिा पागा पागा हुजूर याजबराबर आज्ञापत्र पाठविले ते पावले फौजेचे खर्चाबद्दल राो **नरसप्पा नाईक** बेदगिरी याचे दुकानची हुंडी रुपये २००००० दोन लक्षाची व हरिभक्ती याचे दुकानची हुंडी रुपये १००००० येक लक्षाची येकूण तीन लक्षाच्या दोन हुंड्या पाठविल्या त्या पावल्या सावकाराचे गुमास्ते यास दाखविल्या त्यास हुंडिया कबूल केल्या मुदतीस यैवज घेऊन मागाहून लेहून पाठवू कलावे सेव्यास उचापतीचे यैवजी येक लक्ष रुपये देवावे म्हणोन विनंतीपत्र सेवेसी लिहून दिल्हे आहे त्याप्रमाणे तो ऐवज त्यास पोचता व्हावा आणखी सेव्याचे आणखी पाच लक्ष रुपये उचापतीबाा देणे ते जरूर दिल्हे पाहिजेत त्यांची शक्ति थोडी यैवज भारी गुंतला याकरिता आणखी त्यास यैवज जरूर देवावया लागेल येथे ऐवज कांहीं देऊ तेथें अडीच लक्ष तरी जरूर देवावे लागतील याकरिता विदित असावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

**लेखांक ७२** ( पेशवा दफ्तर ) { शक १६९३ आषाढ वाा १० / इ. सन १७७१ आगष्ट ६

पौो छ ५ जमादिलावल श्रावण मास सलास ( ? ) सबैन

राजश्रिया विराजित राजमान्य राजेश्री **भिकबा** स्वामी गोसावी यासी सेवक नारो बाबाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष तुम्ही आषाढ वाा ७ चे पत्र पाठविले ते छ २३ रासरी पावले तेथे लिहिले कीं श्रीमंत राजेश्री **त्रिंबकराव मामा** याणी आम्हास आज्ञा केली जे संभुलाल सावकार सवणूरकर त्याजकडील येवज घेऊन स्वामीकडेस पाठवाल म्हणजे आम्हास पावता होईल म्हणोन त्यास तो ऐवज हुबळीस राजेश्री शेषापानाईक चिटगुपी यांजकडे मांडून मांडणावळीची चिठी आमचे नांवे घेऊन आपणाकडे कचोजी नाईक निा सरकार घेऊन आला त्याजवरून स्वामींनी राजेश्री नारो मुरार यास रवाना केले त्याचे पदरी ऐवज होन चाकी निजाणे ( बेरीज ) ५०००० पन्नास हेजार होन घातले आपणाकडे रुजू करितील पावलियाचे उत्तर पाठविले पाहिजे म्हणून लिहिले ऐसियासी नारो मुरार पोतनीस याजबरोबर तुर्वी होन चाकी मिजाणे येणेप्रो मित्यावार ४०००० छ १८ रबिलाखरी १०००० छ २१ रबिलाखर ४९००० होन सदरहू होन मित्यानी माानिलेचे पदरी घातले ते पावले रवाना छ २४ रबिलाखर सुा इसने सित्तैन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

---

**लेखांक ७३** ( वैद्य )

{ शक १६९५ मार्गशीर्ष शुा ५
{ इ. सन १७७३ नोव्हेंबर १८

श्रियासह चिरंजीव राजश्री तात्या यासी प्रति **लक्ष्मण बलाल** आसींर्वाद उपरी येथील क्षेम ताा मार्गसीर्ष शुा ५ पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले वर्तमान कलले पुणेयात गडबड कोणाची कैसी आहे ते ल्याहावे ......लिहिले त्यास अविंधाचा ....... आहेत ...... वडील फुटले ते कोणीकडे गेले याची बातमी लागत नाही त्यामुळे बहुत संशय उत्पन्न जाहला तो राजश्री मोरोबादादा **फडणीस** याचे पत्र आपले घरी आले की बाईस निघोन जाणे त्याचे पत्र रात्री आले प्रात:काली मुले माणसे निघाली व **साबाजी भोसले** गंगथडीस उमटले यामुळे येक दिवस गडबड ...... लोक कित्येक गेले कितेक जाणार तो बातमी आली की साबाजी भोसले पाथरी चारवणीकडे आहेत त्याचे पिछावर सरकारची फौज राजश्री ...... **मामा** वगैरे पंचविंशी कोशाच्या तफावतीने आहेत त्यावरून काहीसे स्वस्थ जाहले तो श्रीमंत राजश्री **नाना फडणीस** याचे पत्र आले की आपण पंढरपुरास आलो पुणेयास येतो मुले माणसे मेणवालीस न पाठविणे व दादाची मुले माणसे गेली असतील ...... पुणेयास माघारी आणवणे त्यावरून ...... आली हातात ...... प्रस्तुत गडबड नाही ज्याची सोय आहे ते जातच आहेत ज्याची सोय नाही ते मात्र आहेत अविंधाचा अद्यापि तह नाही श्रीमंतानी नलदुर्गचा किला घेऊन पुढे जात आहेत सरकारच्या व्याजाचा प्रकार तरी सर्वत्रानीं घेतले त्यापेक्षा आपणही घ्यावे त्यास भिड्याकडे यैवज आला आहे घ्या म्हणतात त्यास आपला यैवज कोणी पाठवून घेऊन जावा कलले पाहिजे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीर्वाद

---

**लेखांक ७४** ( पेशवा दप्तर )
पौ छ ४ सवाल पौषमास

{ शक १६९५ पौष शु. ६
{ इ. सन १७७३ डिसेंबर १९

+ सा. न. वि. वि. उपरी चिठी पाठविली पावली तुम्ही भोजन उतर येनार तर हरगीज न येन येक मजल याची व तिकडील सोईन चालावी उभयेता फौजेत चालण्याची कहीची सोये लावावी उमज सर्वत्रास व्हावी पेचाचे युक्तीनें पोटातून उघड दाखवू नये आनि पदर बळकट धरून चालावा श्रीमंतांची उतावली आज **मामाचे** डेऱ्यास जातो दोघे चौघे जाऊन फार सांगितले की दोन मजली चालून मग जाव सात कोस जाऊ नये आयेकेना रीत तुम्हास ठाऊकच आहे हेही पीडाच आहे मामा मजला सेब्द लावतील कीं सांगाव येक करतात येक हेही पाप वरकड वर्तमान तर लोकास मातबरास सांगून समाधान केले परंतु येक छोटेखानी फार

जाचितात निरोपाचे येथ आनी तेथेही खजाना आहे तो कळला आगर आहे तरी मागून देन कसे घडत हे मोठे प्रानसंकट दिसते च्यार मोठे त्यामागे लहान येतील गवगवा तर आहेच तो देवावर भार आहे परंतु मामास बळकट धरले येसे बोलतात आगोदर चुकलो म्हणतात हे आहे तुम्ही दोन रोज तेथ जेवन पालखीत निद्रा करने सोईस लाऊन देन मग येन मुक्काम यानी दो फौजेस आंतर तीन कोस लांब येका फौजेस न पडे हे सर्व तडजोड तेथे व्हावी चिठीमात्र येत जावी मसलत पक्की जाली कुरुक्षेत्र सर्वास मानल कलावे बातम्या ते ........ येथ द्यावा आमचा नमस्कार मुख्यास व रावरास्ते **बापूस** सांगावा हे विनंती रा। ४ शवाल

---

**लेखांक ७५** ( रायरीकर )

श्रीशंकर

{ शक १६९५ पौष शु॥ १० इ. सन १७७३ डिसेंबर २३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री **चिंतोपंत तात्या** स्वामीचे शेवेसी पो। **सिवाजी विठ्ठल** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। पौष सुद्ध दशमी गुरुवार मु॥ सुनोडे जाणून स्वकीय कुशल लेखन करावे विशेष सांप्रत आपणाकडून पत्र येऊन कुशलार्थ कलत नाही तेणेकडून चित सापेक्षीत असे तरी येसे नसावे सदैव पत्र पाठऊन सांभालित जावे यानंतर येथील वर्तमान राजश्री **आनंदराव नाईक** यासी लिहिले आहे ते आपणास निवेदन करितील त्याजवरून ध्यानात येईल भोसल्याचे लढाईमुले नव्या फौजेच्या पेचात आलो खर्चाची आडचण येदंनिमित्य श्रीमंतास विनंतीपत्र लिहिले होते की कृपा करून कांहीं तूर्त सोय करून देवावी त्यास राजश्री **आनंदराव विनायक** विनंती करने समई प्रसंगीं आपण होता साहित्य केले परंतु श्रीमंती उत्तर दिल्ही नाही म्हणोन मशारनिलेही लिहिले आहे त्यास आमचे सरदारीचे प्रकार सर्व आपणा(स) माहीत आहे महाली आल्की पडली हेही वर्तमान लोपले नाही आपण श्रीमंतास विदित केलेच आहे राजश्री **साबाजी भोसले** याचा सलूख जाहाला तपसिले वर्तमान राजश्री **त्रिंबकराव मामा** लिहितील त्याजवरून कलो येईल अन:पर इकडील गुंता उरकला भेट सत्वर व्हावी हा हेत आहे ईश्वरसत्तेने घडून येईल तो सुदिन भोसल्याचे धामधुमीमुले नवी फौज हजार दीड हजार ठेविली सिवाय पागा मिलोन लाख सवा लाखाच्या पेचात आलो पुढे ईश्वर कसा परिणाम लावील पहावे सर्व प्रकार आम्हास आपला भरवसा आहे वारंवार काय ल्याहावे सदैव पत्र पाठऊन

+ हें पत्र देवाजीपंताचें असून तें समग्र स्वहस्तेंच लिहिलेलें आहे.

सांभालित जावे पदरी खर्चास पैसा येक नाहीं श्रीमंतांची आज्ञा दो शा रावतानसी यावें येसे होते त्यास त्यास दोशा रावताचे तरी संकटच होते त्यास भोसल्याचे मसलतीस जाणे म्हणोन श्रीमंताची पत्रे आली तेव्हा आज्ञेस तर उजूर करता न ये मसलतीस जाणे प्राप्तच जाहाले तेव्हां हजार दीड हजार फौज जमा केली परंतु खर्चास पैसा नाही नित्य उठोन धरण्यापारण्यासी समध जाहाला आहे सा साला छावण्या होऊन देशास आलो त्यास फौजेची रवानगी करावी तर माहाली आत्की तिसाला पडली त्यामुले पैसा वसूल नाही रवानगी घेतल्यासिवाय फौज कसी जाते तेव्हा कर्जवाम मेलऊन घरदार सर्व भरीस घालून थोडी बहुत समजावसि काढिली काही पैका फौजेचा देणे राहिलाच आहे कर्जदारही हाका मारीत राहिलेच आहेत सालमजकुरी माहाल झाडून नापेर पैशास ठिकाण नाही येसे असोन बेरजे मागील पेचात आलो आहो त धण्यापासी जाऊन निवेदन करावे येसा हेत त्यास दैवयोगाने भोसल्याचे मसलतीमुले पेचात घातले त्यास अतःपर बाकी राहिली नाही आम्ही आल्यावर सर्व ध्यानात येईल परंतु वर्तमानाचा धारेवाट आपणास विदित असावा येदंर्निमित्य लिहिले आसे पहिल्यापासून आपले लक्षासिवाय नाही आताही आपणासिवाय दुसरा अर्थ नाही कलेल त्या रीतीने आम्ही पेचातून निघो तो अर्थ करावा श्रीमंतांचे मानस शेदोनशे रावतानसी भेटीस यावे सालमजकूरचा सरंजामाचा पैका मागावा येसे लक्ष त्यास दो ती सालाचा नाकसा सालमजकुरी नापेर दुसरे फौज धरिली त्याचे पेचात आहो त्यास हे आर्थ आपले ध्यानात असावे येदंर्निमित्य लिहिले असे उमेद बहुत आहे* परंतु श्रीमंतांचे प्रकार उमजत चालले परंतु लौकिकात उणे न पडावे म्हणोन सर्व केले पो बरे आपले दैव आपण ममता करितातच भेटीनंतर सर्व श्रुत होईल वरकड कितेक मजकूर राजश्री आनंदराव विनायक विनंती करतील विशेष काये लिहिणे रुपा लोभ कीजे हे विनंती

---

**लेखांक ७६** (पेशवा दफ्तर)
पो छ २९ जिल्काद

{शक १६९५ माघ वा। ११
{इ. सन १७७४ फेब्रुवारी ७

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी पोष्य **यादवराव मोरेश्वर** व **धोंडो महादेव** साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। माघ वा। ११ येकादसी इंदुवासरी जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असले पाहिजे यानंतर नबाब **शेरजंग** याचा व आपला घरोबा पहिल्यापासून आहे प्रस्तुत आपण किले पुरंधरास गेल्याने

---

* अक्षर निराळें

राजकारण उपस्थित जाह्लेच आहे याअन्वये मागती स्नेहाची दृढता वाढवून कितेक गोष्टी बोलण्यांत आल्या सर्व प्रकारे आपले मायेत आहेत आपल्या कार्यासहि सहाय होतात ऐसे जाणोन स्वामीस लिहिले आहे जर नबाब निजाम आलीखान यासी सूत्र दृढ असोन आपल्या ममतेस आसिले आणि श्रीमंत राजश्री **दादासाहेब** याजकडे नबाबाचे लक्ष नसले तर उतमच जह्याले शेरजंग याणीही निश्चय केला आहे कीं नबाबासी कोणी बुद्धिभ्रंश केलाही तरी आपण सरकार कार्यास आनकूल करून जैसी मर्जी असेल त्याप्रो डौलावर आणितो म्हणोन बोलण्यात आन्वये ऐशियास आपण पहिलाच नबाबाकडील बंदोबस्त केलाच असेल व पुढेंही स्नेहाची दृढता अधिकोतर व्हावी हे मानस असल्यास आपल्या व राजश्री **सखारामपंत बापू** याच्या व राजश्री **मोरोबादादा** याच्या नावे पत्रे शेरजंग यास कीं पहिल्यापासून तुम्ही आपल्या स्नेहांत आहाच तर नबाबाकडील बंदोबस्त सर्व करून साहित्यास सिध असावे म्हणोन व नबाब **निजाम अलीखान** याच्या नावे स्नेहाचे पत्र त्यात शेरजंगावर हवाला कीं शेरजंग मजकूर सर्व लिहितील त्याजवरोन कलेल म्हणोन पत्रे पाठवावी म्हणजे शेरजंग आपल्या तोडजोडीचे उद्योगास लागतील लक्ष वाढ्याने सेरजंगच नबाबाकडे जातील दुसरा प्रकार त्याचे बोलण्याचा श्रीमंत दादासाहेब तुंगभद्रा उतरोन गेले आहेत इकडून राजश्री **त्रिंबकराव मामा** व **साबाजी भोसले** यास नबाबास सामील होण्याविसी मसलत असल्यास जिकडील तिकडे श्रीमंत राजश्री दादा यांचा परामर्ष होऊन कार्यसिधि परस्परेच घडोन येईल त्याजवरून तपसीलवार मजकूर सेवेसी लिहिला आहे आन्वयाचे मनन करून नबाबास व **शेरजंग** यास आपण त्रिवर्गांचे नावे पत्रे लिहून आम्हाकडे पाठवून द्यावी आपल्याजवळ पत्रं पावताच उत्तर व पत्रे चालणार कासिदाबरोबर अथवा सांडणिस्वाराबरोबर दो आडचा दिवसात येथें येऊन पावत ऐसी रवाना करावी दारमदाराची गोष्ट आपले विचारे कडूनच ठरणे ते ठरेल पत्र मनन करून फाडून टाकावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

**लेखांक ७७** ( पेशवा दफ्तर )

शक १६९६ माघ वा। १४
इ. सन १७७४ फेब्रुवारी ९

राजश्रिये विराजित राजमान्य राजश्री **बाळजी जनार्दन** स्वामी गोसावी यासी पोष्य **रघुनाथ बाजीराव** प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष पुण्याकडे काहीं गडबड जाली आहे म्हणून वर्तमान कळले त्यास तुम्ही तेथें असता गडबड व्हावी असे नाही तरी काय वर्तमान ते सविस्तर लेहून पाठविणें दुलड व्हावयाचे कारणे लिहिणे व त्याची पैरवी तुम्हास

होईल ते करणे खासा स्वारी जलद तिकडे येणार तुम्हास कलावे जाणिजे छ २७ जिल्काद हे विनंती

---

लेखांक ७८ ( वैद्य ) } श्री { शक १६९५ फल्गुन शुा ५ इ. स. १७७४ फेब्रुवारी १५

पाो फाल्गुन शु. १२ अर्बा जिल्हेज

श्रियासह चिरंजीव राजश्री बाबूरावजी यासी प्रति **लक्ष्मण बलाल** आसीर्वाद उपरी येथील क्षेम ताा फाल्गुन शुद्ध ५ मुकाम गंगातीर लष्कर नजीक नांदेड वर्तमान येथास्थित असे विशेष पेशजी आपली व राजश्री तात्याची पत्रे आली की त्वरा येण्याची व्हावी पत्रदर्शनीच याणी कूच करावे ऐसे होते परंतु मातुश्री **दर्याबाई** व राजश्री **रघोजी भोसले** वराड प्रांती जावयास निरोप घेऊन आली त्यास मार्गी तांब्याने परामृष केला पुढे राजश्री **मामानी** संदर्भ लावून समीप बोलाविली त्याचा दारमदार काही व्हावा तो ही पत्रे आली मामा संकटात पडले मातुश्री वराडांत गेली तरी फंद राहिला समागमे आली तरी आठ हजार फौज बदनिशेची उपयोगी काय तेव्हा परिछिन्नपणे वर्तमान सांगोन त्याणी समागमे यावे येसे ठरविले निशा करून घेतली उदयीक कूच करावे येसा निश्चय जाहला आहे याउपरी गुंता राहिला नाही मातुश्री वराडप्रांती जाती तरी यास पायबंद होता त्यास ईश्वरे कृपा केली प्रस्तुत समागमे येतात उदईक कूच आहे मजलदरमजल येऊन पोहचतात याउपरि किमपि गुंता नाही तात्याबरोबर पत्रे अलंकारयुक्त होती व कराराची यादी होती ती दाखविली त्यावरून बहुत संतोसी तात्यावर व नानावर जाहले तात्यास सर्व वर्तमान पुसिले याणीही सांगितले की आपणापासून गेलियादारभ्य श्रम फार केले ते कोठवर सांगावे परंतु सार्थक जाहले त्यावरून याची निशा जाहली की नानानी व तात्यानी हा समय रक्षिला येसे बहुतच संतोसी आहेत **देवाजीपंत** मामापासी आहेत मामाचे त्याचे गंगोदक जाहले आहे पुढे पहावे मामाची व बापूची येकवाक्यता बहुत दिसण्यात येते आपल्या येजमानाचे बोलण्यात चालण्यात प्रकार येत नाही आपल्या ग्रामस्ताच्याही बोलण्यातही तोच प्रकार दिसला श्रुत विचारे करावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे आसीर्वाद

---

लेखांक ७९ ( वैद्य ) } { शक १६९५ फाल्गुन शुा ५ इं. सन १७७४ फेब्रुवारी १५

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे सेवेसी पोष्य **भवानी सिवराम** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल फाल्गुन शुध पंचमी भौम...... मुा

नांदेड जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपणापासोन राजश्री **कृष्णराव तात्या** आले येजमानसाहेबास पत्रे आहेत त्याजवरून व मारनिलेच्या मुखोद्गत सविस्तर कलेल जलद पंढरपूरच्या सुमारे यावे म्हणोन लिा त्यास हेच लक्ष चार मास आहे राजश्री **नानानी** निवेदन केलेच असेल निजध्यास दुसरा नाहीं त्यास याउपरी उदईक कूच करून दर मजलीने येत असो हे सरदारी आपले कृपेची आणि सेवक स्थापित तेथे उपयोग न घडेल येसे होणारच नाहीं हे आपली निशाच असेल **राजश्री मामा** व आम्ही आज दोन मास येकत्र आहो आमचे लक्ष आपणाकडे मामाचा मात्र संदेह होता त्यास आपण त्याजकडे पत्रे पा त्यास खूण आमचीहि पुरली त्याजवरून त्याणी आम्हासी परिस्फोट गोष्ट केली मातुश्री दर्याबाई यांचा संदेह होता तोही उरकला या उपरी आपणाजवल येऊन पोहोचलोच येसे जाणावे स्थापित सेवक येथे असल्यास........मात्र संदेह कोणेविसी नाही बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती

---

**लेखांक ८०** ( वैद्य )
पो फाल्गुन शु. ११ तिसरा प्रहर मंगलवार

शक १६९५ फाल्गुन शुा ५
इ. सन १७७४ फेब्रुवारी १५

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **बाबूरावजी** स्वामीचे शेवेसी सेवक **भवानी शिवराम** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल फाल्गुन शुा ५ भौमवासर मुा नजीक नांदेड जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावे विशेष आपणापासोन राजश्री तात्या आले त्याचे मुखोद्गत व राजश्री **बापू** व राजश्री **नाना** व तात्या यांची येजमानास पत्रे त्याजवरून संतोष जाला चार मास आपण मेहेनत उभयताही केली त्याचे फल दिसणेयात आले देव उत्तमच करील याउपरी उदईक कूच करून राजश्री **त्रिंबकरावमामासुद्धां** दरमजल येत असो किमपि गुंता नाही सविस्तर राजश्री तात्यानी लिहिले आहे त्याजवरून कलो येईल वरचेवर आपणाकडील कुशलार्थ लिहीत जावा बहुत काय लिहिणे हे विनंती

---

**लेखांक ८१** ( पारसनीस )
पो छ ८ मोहरम सोमवार मुा किले पुरंदर

शक १६९६ चैत्र शुा ९
इ. सन १७७४ मार्च २१

श्रीमंत रावसाहेब यासी परमेश्वरी कृपेनें आपणा दोहोंत जी हार्दिक एकी आहे ती लेखनिविष्ट करण्याची आवश्यकता नाहीं. सध्यां आपल्या व **सखाराम-पंडित** यांच्या सूचनेप्रमाणें **त्रिंबकराव विश्वनाथ** यासी मुलाखत व हुजुराचें

दर्शन झालें. पूर्वींच्या लिखापटींत ज्या गोष्टी आल्या त्या प्रकट केल्या. त्यांत मतभेद नाहीं. राजे **साबाजी भोसले** सेनासाहेब सुभे यांची मुलाखत झाली. त्यांच्या कामावर लक्ष असून कैलासवासी **माधवराव** व **नारायणराव** यांना मंजूर असलेले जे मुद्दे **भवानी शिवरामानें** हुजुरास गुजरले त्यायोगें त्यांस मोठें समाधान वाटलें. या विश्वासूनेंहि त्यांस कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. आपल्या सेवेस लिहील दोहों बाजूंनी एकी आहे, काडीचीही तफावत नाहीं.*

---

**लेखांक ८२** ( पारसनीस ) { शक १६९५ फाल्गु. इ. सन १७७४ मार्च

*श्रीमंत **बालाजी जनार्दन** नाना यासी— पत्र आलें तें पावलें व **किशनराव बल्लालाचें** लिहिलें आलें मजकूर समजला. मराठी व फार्सी पत्रांच्या उत्तरीं निरनिराळीं मराठी व फार्सी पत्रें लिहिलीं आहेत. त्यांवरून उत्तम गोष्टी कोणत्या तें समजून येईल. दोस्तावर मनापासून कृपा असावी. दोस्ताचें मन व वाणी हीं आपलेंच मन व वाणी आहेत असें विश्वासपूर्वक समजावें. विजयी लश्कर लांब लांब मजलांनीं कलबरगे व हुमणाबाद यांमध्यें पोचलें आहे आणि लांब मजलांनीं लवकरच आवसा व तुळजापूर या जिल्ह्यांत पोचेल **त्रिंबकराव विश्वनाथ** व **साबाजी भोसले** यांस निरनिराळें लिहिलें आहे. ते बहुधा लवकरच त्याच्या आसपास येतील. साहेबांच्या पत्रांची हमेशा वाट पहात असतो. पुढें जें ठरवाल व कळवाल त्याप्रमाणें केलें जाईल. बाकी गोष्टी किशनराव बल्लालाच्या पत्रीं लिहिलें आहे त्यावरून ध्यानीं येईल. आपसांत जे करार झाले आहेत ते कायम आहेत त्यांत फरक करण्याची आवश्यकता नाहीं. या बाबतींत तपशिलवार माहिती **धोंडोपंत** वगैरेंच्या लिहिण्यावरून स्पष्ट होईल. अधिक काय लिहावें. आपल्या सर्व कामांत मी भागीदार आहे असें समजावें. मनें व प्राणें साहेबाबरोबर आहे.

---

* मूळ फार्शी पत्राचा हा मराठी तर्जुमा श्री. ग. ह. खरे यांनीं कृपेनें करून दिला. निजामाकडील कोणी तरी हें पत्र लिहिलेलें आहे.

**लेखांक ८३** ( पारसनीस )

{ शक १६९६ चैत्र वा १
{ इ. स. १७७४ मार्च २८

याच्या पूर्वी नमकहराम **त्रिंबकराव** ( याच्या विषयींची हकीकत ) लिहिली होती. आतां ता. ११ मोहरम रोजीं उपर्युक्त मनुष्य वीस हजार स्वार आणि लढाईंचे इतर सामान घेऊन पंढरपुरापासून.........असलेल्या कासेगांवीं जें ( गांव ) आमच्या फौजेपासून तीन कोसांच्या अंतरावर होतें तेथें आला. तेव्हां आमच्या लोकांनीं मुक्काम हलविला आणि त्यांच्या फौजेशीं मुकाबिला करूं लागले. शत्रूनीं खूप शौर्य दाखविलें, तरी दुर्दैवानें त्यांना जय मिळाला नाहीं. आणि थोड्याच वेळामध्यें तो नमकहराम कैद झाला आणि त्याच्याबरोबरचे लोकही आमच्या ताब्यांत आले. कांहीं लोकांनीं अभय मागितलें. नंतर नगारा, निशाण, हत्ती, घोडे व इतर सामानाची मोठी लूट आम्हांस मिळाली. परमेश्वरी कृपेनें आम्ही जय पावलों. हें कळावें यासाठीं तुम्हांस लिहिलें आहे.........शत्रूला यानंतर तंबी देण्याचा विचार आहे, कांहीं चिंता नाहीं.*

---

**लेखांक ८४** ( पारसनीस ) श्री

......पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें हैदर नाईकाकडील वकील येथें आला आहे त्यासी मामलतीचा मजकूर आम्ही बोलत नाही पाच हजार होनाचे गावची वगैरे किरकोलीची बोलणे मात्र बोलतो आम्हास हिंदुस्थानास जाणे मामलतीचा मजकूर तुम्हापासीच होणे तो होईल म्हणून विस्तारे पत्री आज्ञा जाहाली त्याजवरून फार अपूर्व वाटले स्वामी वडील सर्वही दौलतचे लक्ष स्वामीसि राखणे मजला स्वामीची आज्ञा मात्र प्रमाण हैदर नाईकाचे वकिलासी जो जाबसाल करणे व माझे स्वरूप ( दाखविणे ) .......... हे दोन्ही स्वामीकडेच आहे भोसले विरुध व **हैदर नाईक** विरुध याचा प्रकार सर्वही स्वामीचे ध्यानात आहेच शेरजंग येथे आले त्याचाही आशय कलला केवल आमचे बोलण्यानेच त्यांची निशा होते असे नाहीं ते स्वामीपासी येऊन आपली खातरजमा करून घेतील तेव्हा त्याची निशा होईल इतकेंही पेचपाच असता इकडील प्रकार ढालढाकलीवर टाकून हिंदुस्थानात जावयाचे लक्ष धाले तेव्हा येथे आमच्याने काय होतें मीही हिंदुस्थानात स्वामीसमागमे यावे हाच प्रकार बरासा दिसतो काल त्रितीया गुरुवारी मध्यरात्री मुहूर्त करून डेरेदाखल जाहालो येका दो दिवसात शेरजंगास स्वामीकडे रवाना करतो सर्व अर्थ......... विनंती करतील

---

* हें पत्र रघुनाथरावाचें कासेगांवच्या लढाईनंतरचें; इतकेंच मिळालें. मूळ फार्शी पत्राचा हा मराठी तर्जुमा श्री. ग. ह. खरे यांनीं कृपेनें करून दिला.

माझे मानस की वडिली हिंदुस्थानात ज्या पक्षी जावे त्यापक्षी दक्षिणेत शत्रू किनेक आहेत त्यात कितेकास मैत्र करून घ्यावे कितेकाचे पारपत्य करावे आणि दक्षणेचा बंदोबस्त ठीक करून मला शत्रूचे भये नाही असे केल्यास वडिलासही हिंदुस्थानात क्षुधानिद्रा उत्तम लागून खातरजमेने हिंदुस्थानचाही बंदोबस्त करील याप्रो मी वडील येथेच असता बोलत गेलो वडिलीही मजला आश्वासनाच्या गोष्टी सांगितल्य त्याजवरून वरवर सेवेसी लिहिनो.........

---

**लेखांक ८५** ( पारसनीस ) {

श्री

श्रीमंत राजश्री कृष्णरावजी दादास्वामींचे शेवेसी सेवक नरसिंगराव नीळकंठ निा राजश्री रामचंद्र गणेश साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। १८ जमा-वलपर्यंत मुा बीड जाणून स्वकीय लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष पा। बीड पाथरी येथील चौथाई सरदेशमुखीचा करार गुा चा आपले विद्यमाने जाहलाच होता त्याप्रो करारात आणून राजश्री भवानी येशवंत याजसागमे राजश्री तात्यानी व राजश्री चिंतोपंत याणी सरलस्करचे तर्फेचे कारकून व आम्हास रवाना येवजान्य वसुलास केले त्यास आज दहा महिने जाले अद्यापि निर्गम नाही येसे असोन साल मजकूरचे मामलतीबद्दल येणे म्हणोन श्रीमंतांची आज्ञा आम्हास आली आहे येसी-यास गुाचा पैका न पावला याचे अगत्य नाही तेव्हा पेस्तरचा परिणाम काय वकिलानी गुाचा परिणाम काय केला पुढे याचे हाते काय होणार हे कलतच आहे आम्ही तो गुाच्या पैकीयाबद्दल बहुत श्रमात आहो श्रीमंताची स्वारी या प्रांते आलीच आहे प्रसंगी आपण असोन आमचा उजूर काय वकिलाचा बंधु तेथे आले आहेत मामलतीचा तह करून सावकारी निशा करून घ्यावी गुा तह जाला त्याचा प्रकार लिहिलाच आहे ध्यानांत आणून जे करणे ते करावे राजश्री तात्या व आपण उभयेताही आम्हास धणी आम्ही आज्ञेप्रो वर्तणूक करणार जैसी आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक करू येविसी राजश्री तात्याची पत्रे वरचेवर येनात की श्रीमंतास विनंती करून व आपणास करून साल मजकूरचा बंदोबस्त करून घेणें त्यावरून सेवेसी लिहिले आहे आपणासही पत्रे परभारेही येत असतील त्याप्रो करारात आणून निशापत्र करून घ्यावी गुाप्रो विश्वासावर न जावे निचालकरी दरबारची वर्तणूक पूर्वीच्याप्रो नाही परस्परे विदित होत असेल आणि पुढेही कलेल आपण प्रसंगी असता आम्ही यावे ऐसे नाही सर्व प्रकारे आपण राजश्री तात्याचे ठाई असोन आम्हास पत्र श्रीमंतांचे यावे ऐसे नाही बहुत काय लिहिणे कृपा कीजे ही विनंति

---

**लेखांक ८६** ( पारसनीस ) श्री

याद्दी————————————

१ हैदरखान याणी महमद अलीखान व इंग्रज यांचा मुलूख घेतला आहे व पाडाव इंग्रजाकडील त्याजकडे गेले आहेत त्यास सरकारांतून खानास सांगितले जाईल त्याप्रो हैदरखानानी ऐकिले तर सरकारचे दोस्तीत खान राहतील तोंपर्यंत इंग्रजानी खानासी कोणेही प्रकारे खलष करू नये याप्रो अलाहिदा तहात ठरलेच आहे कदाचित खानानी न ऐकून विरुद्ध केल्यास सरकार व इंग्रज सामील होऊन खानाचे पारपत्य करावे आणि मुलूख सोडवावा त्याप्रो महमद अलीखान व इंग्रज यांचा मुलूख उभयताकडे राहील सरकारचा मुलूख कदीम सरकारात राहिल्यासिवाय मुलूख खानाचा सुटेल त्याप्रो निमे सरकार व निमे इंग्रज याप्रो मुलूख वाटून घ्यावा आणि आपले मुलखालगता यावा हैदरखान सलुखाचे तहास आले तर सरकारांतून इंग्रजास घेऊन तह केला जाईल परभारे इंग्रजासी खान बोलतील तर इंग्रजानी बोलू नये व सिलसिला राखू नये सरकारचे दोस्तीस इंग्रजानी शपतपूर्वक कायम असावे तहनाम्यात हाली इंद्रसेनाचे मार्फत कलमे ठरावात आलियाखेरजि ...... कलमे राहिली ती

१ तीर्थरूप कैलासवासी यांचे कारकीर्दीत तहनामे जाले आहेत त्याप्रो साबक दस्तूर जहाजे वगैरे दुतर्फा चालत आल्याप्रमाणे चालावे

---

**लेखांक ८७** ( वैद्य ) { शक १७९५ फाल्गुन शुा ५ / इ. सन १७७४ फेब्रुवारी १५ }

पौ फाल्गुन शुा ११

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेसी सेवक **कृष्णराव नारायण** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ताा फाल्गुन शुा ५ मुकाम लष्कर गंगातीरनजीक नांदेड जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असले पाहिजे विशेष आपला निरोप घेऊन स्वार जाहलो त्यास मार्ग दुर्घट लष्कर कोणे ठिकाणी हे पुर्तेपणी कलेना तेव्हा खर्डेयास आलो चिडाच्या सुमारे फौज असेल म्हणोन त्यास कुच होऊन इकडे आलो तेथे वर्तमान कलले की कोडलवडीकडे गेले तेव्हा चीडचा सुमार टाकून त्यासुमारे आंबेयास गेलो तो बातमी लागली की फौज नांदेडावर आहे तेव्हा परळीवरून काल लष्करात आलो राजश्री सेनासाहेबसुभा याची भेट जाहाली आज्ञेप्रो पत्रे दिल्ही मुखोद्गत सांगणे ते सांगितले वर्तमान आइकोन बहुत बहुत संतोसी जाहले भगवंताजवल प्रार्थना निजध्यास होता तेच आपण घडविले जलद जाऊन पोहोचावे हे उत्कंठा आहे पेशजी आपली व आमची पत्रे अली पत्रे अली तेव्हां कुच करून यावे परंतु मातुश्री **दर्याबाई** व राजश्री **रघोजी भोसले** हे तिकडून निरोप घेऊन सातआठ हजार फौजेनिसी नागपूर

प्रांते जावयाचे उद्देशे येत असता मार्गी तांव्राने काही फौजेचा परामृष केला हे वर्तमान आपण आईकिलेच असेल बाकी राहिले ते कोडलवाडीवर आले राजश्री **त्रिंबकराव मामा** यानी पूर्वीच त्याजकडे आनुसंधान लाविले होते कीं तुम्ही भेटोन जावे तुमची याची समजावीस करून द्यावी म्हणोन श्रीमंतानी लिहिले आहे त्यास तुमच्या मनोदयानुरूप समजावीस करून देतो मग जावे त्यास घाट उतरली नव्हती तो परयंत येण्याचाच संदर्भ होता घाट उतरलियावर लांब मजली करीत चालली तेव्हा मामानी राजश्री **त्रिंबकपंत वर्तक** त्याजकडे पाठविले त्यांनी जाऊन बहुताप्रकारे खातरजमा करून आणिली हे बीड प्रांतें होते यासही बोलाविले हेही पुढे बोलण्याचा प्रकार व्हावा तो आपली पत्रे आली जे त्वरित यावे तेव्हां मामास विचार पडला जे बाईस इमानप्रमाण देऊन आणिलियास समागमे घेता कठीण न घेता कठीण तेव्हा मातुश्रीचे मनोदयानुरूप समाधान करून त्याच्या याच्या भेटी केल्या आणि उभयेतानी समागमे चालावे येसा काल सिद्धात ठरविता उदयिक कूच करून लिहिल्याप्रो येतास या उपरात गुंता किमपि राहिला नाही आपण म्हणतील की मातुश्री जात होती तर जाऊ द्यावी होती अगर परामृष करावा होता आणि यावयाची त्वरा करावयाची होती त्यास हे दोन्ही गोष्टीस सिद्ध होने परंतु काम मामासी आणि संनिधानी गोष्ट पडली आपणच त्वरा करावी तर तूर्तच विपट दिसतो मसलत मोठी उपयोगी नाही यास्तव मामानी म्हटले तेच मान्य करून भेटले आणि गुंता उरकून यावयाची त्वरा केली आहे लक्ष सर्व आपणापासी लागले आहे प्रथम दिवसापासून कायावाचामनसा दुसरा प्रकार नाही तोच प्रकार आहे राजश्री वामनराव राजश्री **परशुरामपंतभाऊ** याजकडे पत्रे पाठवावी म्हणोन सांगितले होते त्याजवरून तिकडेही पत्रे पाठविली कीं येऊन पोहोचावे या उपर लांबलांब मजली करून पत्रामागेच पंढरपूरच्या सुमारे येऊन पोहचतात मामापासून विभक्त बीड प्रांतीं होते तेव्हा पत्रे आली असती तर याचा मनोदय होता की मामाची प्रतीक्षा न करावी आपण लांब लांब मजली करून पोहचावे मामाही येतील म्हणोन प्रतीक्षा करीत होते परंतु तेव्हा पत्रे न आली मामा संनिध आलियावरी दुसरे दिवसी त्वरेची पत्रे आली त्यास मामासभागमे येणे प्राप्त उपाय नाही या उपरी गुंता किमपि राहिला नाही उदईक दाहा कोशाचे कूच आहे दोन मजली पुढे आलियानंतर मागती पत्रे पाठवितो वरकड सविस्तर तीर्थरूप राजश्री नानाचे पत्री व राजश्री बाबूराव वैद्य याचे पत्री लिहिले आहे ते निवेदन करितील तदनरूप घडोन आले पाहिजे वाटेने च्यार दिवस अधिक लागले याचे कारण की शैन्याचा सुमार ठीक न सापडे याजकरिता हेलपाटे सात सात आलो कलावे बहुत काय लिहिणे लोभ करीत असावे हे विनंती.

[ पहिला भाग समाप्त ]

भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ७०

## हिंगणें दफ्तर २ रा खंड

**मराठ्यांच्या दिल्ली येथील वकिलातीचा पत्रव्यवहार**

संपादक—श्री. ग. ह. खरे

या पुस्तकात थोरले बाजीराव, बाळाजी बाजीराव, सदाशिवराव भाऊ, रघुनाथराव, शिंदेहोळकर व त्यांचे दिवाण महादेवभट हिंगणे व त्यांचे चार मुलगे इत्यादि पूर्व पेशवाईतील अनेक प्रमुख व्यक्तींचा पत्रव्यवहार आला असून तो तत्कालीन राजकारण समजण्यास अत्यंत उपयुक्त आहे. पृ. १२०; किं. तीन रुपये.

---

भा. इ. सं. मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ६७

## महाराष्ट्रांतील कांहीं प्राचीन ताम्रपट व शिलालेख

संपादक—डॉ. मो. गं. दीक्षित, पीएच्. डी.

या पुस्तकांत इ. सनाच्या ५–१३ या शतकांतले चार ताम्रपट व सहा शिलालेख असून हीं सर्व साधनें कांहींना कांहीं नवीन माहिती पुरवित आहेत. मध्ययुगीन इतिहासांतील अनेक मुद्यांवर या साधनांच्या योगानें अभिनव प्रकाश पडत आहे. पृ. १३३, किं. तीन रुपये.

---

## दत्तोपंत आपटे स्मारक ग्रंथ

भा. इ. सं. मंडळ सभासद व आपटे स्मारक मंडळ देणगीदार

यांस साडेपांच रुपये

या ग्रंथांत प्रा. श्री. व्यं. पुणतांबेकर, प्रि. वा. वि. मिराशी, डॉ. सुरेंद्रनाथ सेन, प्रा. दि. वि. काळे, आचार्य शं. द. जावडेकर, प्रा. चिं. रा. पोतनीस, प्रा. ना. अ. मावळंकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादि विद्वानांचे इतिहासशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांवर विद्वत्तापूर्ण निबंध आले आहेत. पृ. ३००, किं. सहा रुपये.

---

Our next Issue will be

## DELHI CONGRESS SPECIAL NUMBER

Containing a review of the activities of the Mandala during the last 30 years and more.

# भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकाचा पुढील अंक

**दिल्ली येथील अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या अधिवेशना-निमित्त खास अंक म्हणून निघेल.**

त्यांत डॉ. अळतेकर, श्री. रियासतकार सरदेसाई, श्री. नानासाहेब चापेकर प्रा. गोडे, डॉ. दिघे, श्री. बेंद्रे, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. ग. ह. खरे वगैरे विद्वानांचे लेख येतील.

खेरीज मंडळाच्या कार्यांचा आजतागायत धावता आढावा घेणारा एक लेख येईल.

आपले कार्याध्यक्ष महामहोपाध्याय प्रा. द. वा. पोतदार हे दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या संशोधन कार्याबद्दल माहिती देणारा लेखहि येईल.

या अंकाचा परप्रांतांतहि प्रसार व्हावा यासाठीं यांतील बरेच लेखन इंग्रजींत होईल.

संपादक

---

भा. इ. सं. मं. पुर Library IIAS, Shimla
MR 954.792 C 448.1 P-C 448.11

**चिमाज**

00008984

ले. कृष्णाजी...

आप्पांचें चरित्र सर्व उपलब्ध अस्सल साधनावरून प्रथमच तयार केलेलें.

**किंमत १ रु.**

( भा. इ. सं. मंडळ सभासदांस १-१२-० )